# एक वर्ष महाराष्ट्र सेवेचे महाविकास आघाडीचे

# महाराष्ट्र थांबला नाही. थांबणार नाही.







**श्री. उद्धव ठाकरे**
मा. मुख्यमंत्री

**श्री. अजित पवार**
मा. उपमुख्यमंत्री

**श्री. बाळासाहेब थोरात**
मा. मंत्री, महसूल

# महाराष्ट्राचा महाविकास



**श्री. उद्धव बाळासाहेब ठाकरे**
मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य

जनता-जनार्दनाच्या आशीर्वादाने महाविकास आघाडीला एक वर्ष पूर्ण झाले. वर्षाचा कालावधी म्हणजे खूप नाही किंवा एखाद्या शासनाच्या कामगिरीचे परीक्षण करण्याइतका मोठाही नाही. परंतु आमच्यासाठी हे आव्हानात्मक दिवस होते. कठीण प्रसंगातच खरी परीक्षा होते म्हणतात; मात्र सरकारचा प्रत्येक निर्णय हा सर्वसामान्य जनतेला डोळ्यासमोर ठेवून केल्याने आज एक विश्वासाचे वातावरण तयार झाले आहे.

खरोखरच सांगतो की, या महाविकास आघाडीतील माझ्या प्रत्येक सहकाऱ्याने एकदिलाने आणि एकजुटीने हे निर्णय घेण्यात साथ दिली. हे सरकार तीन पक्षांचे आणि समर्थन देणाऱ्या सहकाऱ्यांचे जरी असले तरी निर्णयांची अंमलबजावणी करताना कुठेही विसंवाद अथवा मतभेदही नव्हते. आमच्या या भागीदारीचा उद्देश राजकीय नाही, तर आम्ही सर्व पक्ष लोकांमधून आलो असल्याने जनतेचे सुख-समाधान हेच आमचे भांडवल आहे आणि मला खात्री आहे की, लोकांमध्ये सरकारविषयी आपलेपणाची भावना निर्माण करण्यात आम्हाला यश येत आहे.

आमच्यासमोर आव्हाने जरूर आहेत, मग ते कोरोनाचे संकट असो किंवा नैसर्गिक आपत्ती, शासन यंत्रणा खांद्याला खांदा लावून एकदिलाने सोबत काम करते आहे, उत्तम सहकार्य करते आहे. मी आणि माझ्या मंत्रिमंडळाने शिवतीर्थावर सर्वांसमक्ष शपथ घेतली आहे. हे जनतेचे सरकार आहे. कुठलीही लपवाछपवी न करता पारदर्शकपणे काम करताना आमचे उत्तरदायित्व जनतेप्रती आहे हे आम्ही कधीही विसरणार नाही. आम्हाला केवळ प्रसिद्धी प्रपंच करायचा नाही, तर योजना आणि कार्यक्रम यांची प्रत्यक्ष अंमलबजावणी कशी झाली आहे, यावर लक्ष द्यायचे आहे. महाराष्ट्राच्या मायबाप जनतेचा विश्वास, प्रेम आणि आशीर्वाद हीच या सरकारची खरी ताकद आहे. याच ताकदीच्या जोरावर आम्ही पुढील वाटचालही दमदारपणे करू.

माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या या पुस्तिकेच्या माध्यमातून महाविकास आघाडीच्या सरकारने समाजातील सर्व स्तरातील जनतेसाठी घेतलेल्या निर्णयांची समग्र माहिती मिळेल, अशी आशा व्यक्त करतो आणि या निमित्ताने सर्वांना शुभेच्छा देतो.

# समर्थ महाराष्ट्राचा निर्धार



**श्री. अजित पवार**
उपमुख्यमंत्री

सन्माननीय मुख्यमंत्री उद्धवजी ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील राज्य सरकारच्या वर्षपूर्तीच्या निमित्ताने सर्वप्रथम मी सर्व नागरिक, बंधुभगिनींना मन:पूर्वक शुभेच्छा देतो. सरकारवर दाखवलेल्या विश्वासाबद्दल सर्वांचे मन:पूर्वक जाहीर आभार मानतो.

पहिल्या वर्षात सरकारसमोर 'कोरोना'चे आव्हान सगळ्यात मोठे होते. राज्यातील जनतेला सोबत, विश्वासात घेऊन मंत्रिमंडळातील सर्व सहकाऱ्यांनी हे आव्हान यशस्वीपणे पेललं. सरकारमधील प्रत्येकानं उत्तमपणे आपली जबाबदारी पार पाडली. राज्यातील जनतेच्या आशा-आकांक्षा-अपेक्षांवर खरे उतरण्यात, सर्व घटकांना न्याय देण्यात आमचे सरकार यशस्वी ठरले. त्याबद्दल मंत्रिमंडळातील सहकाऱ्यांचे मी अभिनंदन करतो. सरकारला समर्थन दिलेल्या सहकारी पक्षांच्या विधिमंडळ सदस्यांचंही जाहीर आभार मानतो. लोकशाहीत विरोधी पक्षदेखील सत्ताधारी पक्षाइतकाच महत्त्वाचा असतो. राज्यातील विरोधी पक्षनेते, सदस्यांनीही सरकारला वेळोवेळी मार्गदर्शन केले, त्यांचेही सरकारच्या वर्षपूर्तीनिमित्तानं मी आभार व्यक्त करतो.

राज्यातलं सरकार वेगवेगळी विचारधारा असलेल्या पक्षांचं सरकार असलं तरी 'महाराष्ट्राचं हित' व 'समान विकास कार्यक्रम' हा आमच्यातला समान धागा आहे. गेल्या वर्षभरात राज्यातील जनतेशी प्रतारणा व महाराष्ट्राच्या हिताशी तडजोड करणारा एकही निर्णय या सरकारने घेतला नाही. जनतेच्या सुख-दु:खांशी समरस होत लोकहिताचे अनेक निर्णय घेतले. शेतकरी कर्जमाफी योजना, नैसर्गिक आपत्तिग्रस्तांना तत्काळ मदत व दिलासा दिला. कोरोना संकटाशीही यशस्वी लढा दिला. या संकटकाळातही विकास योजना, प्रकल्पांना पर्यायाने राज्याच्या प्रगतीला खीळ बसणार नाही, याची काळजी घेतली. यातून सरकारवरील जनतेचा विश्वास अधिक दृढ झाला.

राज्य सरकारची वर्षपूर्ती हा साजरा करण्याचा विषय नसून पुढील चार वर्षांच्या महाराष्ट्राच्या प्रगतीची पुनर्आखणी करण्याचा व त्या दिशेने दमदार वाटचाल करण्याची सुरुवात आहे. सर्वधर्म, जाती, पंथ, विचारांच्या समाजघटकांना सोबत घेऊन, सर्वांना विकासाची समान संधी उपलब्ध करून प्रगत, पुरोगामी, समर्थ, बलशाली महाराष्ट्र घडवण्याचा आमचा निर्धार आहे. तो पूर्ण करण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहेत.

# लोकाभिमुख कार्याची वर्षपूर्ती...



**श्री. बाळासाहेब थोरात**
महसूल मंत्री

महाराष्ट्र विकास आघाडीच्या कणखर आणि लोकाभिमुख कारभाराची वर्षपूर्ती साजरी होते आहे. अस्मानी संकट आणि कोरोनाची जागतिक आपत्ती येऊनही महाराष्ट्र स्थिर राहिला. परिस्थितीशी लढत राहिला आणि आम्हाला खात्री आहे, तो या संकटांवर विजय मिळवून पुन्हा वेगाने धावेल आणि जिंकेलही. हे सामूहिक प्रयत्नांचे यश आहे. गेली नऊ महिने प्रशासन न थकता अविरत कार्यरत आहे. लोकप्रतिनिधी, सामाजिक संघटना, नोकरदार, जनसामान्य माणूस सारेच एकजुटीने काम करत आहेत.

'माझे कुटुंब, माझी जबाबदारी' ही मोहीम व्यापक स्तरावर यशस्वीरीत्या कार्यरत झाली आहे. सरकार अपेक्षित सर्व प्रयत्न करत आहे. रुग्णांची संख्या सध्या कमी दिसत असली तरीही या हिवाळ्यात काळजी घेणे क्रमप्राप्त आहे.

आता महाराष्ट्र नव्या जोमाने उभा राहतोय. आजही सरकार म्हणून सर्वसामान्यांच्या आरोग्याची काळजी घेणे आमच्या केंद्रस्थानी आहे. तरीही जनसामान्यांच्या दैनंदिन जीवनाला गती मिळावी, यासाठी अनेक धोरणात्मक निर्णय शासन घेते आहे. कोविड संकटाच्या काळात सामान्य माणूस, लघुउद्योजक, व्यापारी सर्वच आर्थिक संकटात सापडले. त्यांनाही आधार देण्यासाठी सरकार प्रयत्नशील आहे. या काळात आलेल्या अस्मानी संकटातून शेतकऱ्याला वाचवण्यासाठी सरकार नेटाने सर्व प्रयत्न करत आहे. दहा हजार कोटी रुपयांचे मदत पॅकेज हा त्याचाच भाग आहे. आमची बांधिलकी सामान्य जनतेशी आहे आणि आम्ही ती विसरणार नाही.

संकटातून संधी निर्माण करणे हा महाराष्ट्राचा कायम स्वभाव राहिला आहे. यानिमित्ताने मी आवाहन करतो, राज्याला गतिमान करण्यासाठी सर्वांनी एकत्र मिळून प्रयत्नांची पराकाष्ठा करू या.

गेल्या नऊ महिन्यांहून अधिक काळ प्रशासन न थकता अविरत काम करत आहेत. लोकप्रतिनिधी, सामाजिक संघटना, नोकरदार वर्ग, सामान्य माणूस असे सगळेच एकजुटीने काम करत आहे. कोविड-१९ च्या संकटकाळात महसूल यंत्रणेने आरोग्य यंत्रणेबरोबर सतर्क राहून रात्रंदिवस काम केले आहे. या संकटाच्या काळात सामान्य माणूस, लघुउद्योजक, व्यापारी आणि सर्वसामान्यांना आधार देण्यासाठी हे शासन प्रयत्नशील आहे. महाराष्ट्राच्या विकासात आजपर्यंत या विभागाने महत्त्वाचे योगदान दिले असून यापुढील काळातही हा विभाग सर्वसामान्यांसाठी विविध योजना राबवण्यात पुढे राहील, असा विश्वास आहे.

# मंत्री

## महाराष्ट्राच्या विकासासाठी सदैव आघाडीवर !



**श्री. उद्धव ठाकरे**
मुख्यमंत्री



**श्री. अजित पवार**
उपमुख्यमंत्री




**श्री. बाळासाहेब थोरात**
मंत्री, महसूल



**श्री. एकनाथ शिंदे**
मंत्री, नगरविकास,
सार्वजनिक बांधकाम
(सार्वजनिक उपक्रम)




**श्री. जयंत पाटील**
मंत्री, जलसंपदा व
लाभक्षेत्र विकास



**श्री. सुभाष देसाई**
मंत्री, उद्योग, खनिकर्म,
मराठी भाषा



**श्री. अशोक चव्हाण**
मंत्री, सार्वजनिक बांधकाम
(सार्वजनिक उपक्रम वगळून)



**श्री. छगन भुजबळ**
मंत्री, अन्न, नागरी पुरवठा व
ग्राहक संरक्षण



**श्री. दिलीप वळसे-पाटील**
मंत्री, कामगार,
राज्य उत्पादन शुल्क



**श्री. नवाब मलिक**
मंत्री, अल्पसंख्याक विकास
व औकाफ, कौशल्य विकास,
रोजगार व उद्योजकता



**श्री. अनिल देशमुख**
मंत्री, गृह

# महाराष्ट्राच्या विकासासाठी सदैव आघाडीवर !



**डॉ. राजेंद्र शिंगणे**
मंत्री, अन्न व औषध प्रशासन



**श्री. राजेश टोपे**
मंत्री, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण



**श्री. हसन मुश्रीफ**
मंत्री, ग्रामविकास



**डॉ. नितीन राऊत**
मंत्री, ऊर्जा



**प्रा. वर्षा गायकवाड**
मंत्री, शालेय शिक्षण



**डॉ. जितेंद्र आव्हाड**
मंत्री, गृहनिर्माण



**श्री. सुनील केदार**
मंत्री, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास, क्रीडा व युवक कल्याण



**श्री. विजय वडेट्टीवार**
मंत्री, इतर मागास बहुजन कल्याण, खार जमिनी विकास, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन



**श्री. अमित देशमुख**
मंत्री, वैद्यकीय शिक्षण, सांस्कृतिक कार्य



**श्री. उदय सामंत**
मंत्री, उच्च व तंत्रशिक्षण



**श्री. दादाजी भुसे**
मंत्री, कृषी, माजी सैनिक कल्याण



**श्री. संजय राठोड**
मंत्री, वने, भूकंप पुनर्वसन

# महाराष्ट्राच्या विकासासाठी सदैव आघाडीवर !



**श्री. गुलाबराव पाटील**
मंत्री, पाणीपुरवठा व स्वच्छता



**ॲड. के.सी. पाडवी**
मंत्री, आदिवासी विकास



**श्री. संदिपानराव भुमरे**
मंत्री, रोजगार हमी, फलोत्पादन



**श्री. बाळासाहेब पाटील**
मंत्री, सहकार, पणन



**ॲड. अनिल परब**
मंत्री, परिवहन, संसदीय कार्ये



**श्री. अस्लम शेख**
मंत्री, वस्त्रोद्योग, मत्स्यव्यवसाय, बंदरे विकास



**ॲड. यशोमती ठाकूर**
मंत्री, महिला व बालविकास



**श्री. शंकरराव गडाख**
मंत्री, मृद् व जलसंधारण



**श्री. धनंजय मुंडे**
मंत्री, सामाजिक न्याय व विशेष साहाय्य



**श्री. आदित्य ठाकरे**
मंत्री, पर्यटन, पर्यावरण व वातावरणीय बदल, राजशिष्टाचार

# राज्यमंत्री

## महाराष्ट्राच्या विकासासाठी सदैव आघाडीवर !



**श्री. अब्दुल सत्तार**
राज्यमंत्री, महसूल, ग्रामविकास, बंदरे, खार जमिनी विकास, विशेष साहाय्य



**श्री. सतेज पाटील**
राज्यमंत्री, गृह (शहरे), गृहनिर्माण, परिवहन, माहिती तंत्रज्ञान, संसदीय कार्ये, माजी सैनिक कल्याण



**श्री. शंभुराज देसाई**
राज्यमंत्री, गृह (ग्रामीण), वित्त, नियोजन, राज्य उत्पादन शुल्क, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता, पणन



**श्री. ओमप्रकाश उर्फ बच्चू कडू**
राज्यमंत्री, जलसंपदा व लाभक्षेत्र विकास, शालेय शिक्षण, महिला व बालविकास, इतर मागास बहुजन कल्याण, कामगार



**श्री. दत्तात्रय भरणे**
राज्यमंत्री, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून), मृद् व जलसंधारण, वने, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय, सामान्य प्रशासन



**डॉ. विश्वजीत कदम**
राज्यमंत्री, सहकार, कृषी, सामाजिक न्याय, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण, अल्पसंख्याक विकास व औकाफ, मराठी भाषा



**श्री. राजेंद्र पाटील-यड्रावकर**
राज्यमंत्री, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण, वैद्यकीय शिक्षण, अन्न व औषध प्रशासन, वस्त्रोद्योग, सांस्कृतिक कार्य



**श्री. संजय बनसोडे**
राज्यमंत्री, पर्यावरण व वातावरणीय बदल, पाणीपुरवठा व स्वच्छता, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम), रोजगार हमी, भूकंप पुनर्वसन, संसदीय कार्ये



**श्री. प्राजक्त तनपुरे**
राज्यमंत्री, नगर विकास, ऊर्जा, आदिवासी विकास, उच्च व तंत्रशिक्षण, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन



**कुमारी आदिती तटकरे**
राज्यमंत्री, उद्योग, खनिकर्म, पर्यटन, फलोत्पादन, क्रीडा व युवक कल्याण, राजशिष्टाचार, माहिती व जनसंपर्क

# अनुक्रमणिका

## शेतकरी व ग्रामस्थ यांच्यासाठी


| | |
|---|---|
| कृषी | १६ |
| पणन | १९ |
| फलोत्पादन | २० |
| सहकार | २१ |
| खार जमिनी विकास | २२ |
| ग्रामविकास | २३ |
| पशुसंवर्धन आणि दुग्ध व्यवसाय | २७ |
| पाणीपुरवठा व स्वच्छता | २८ |
| मत्स्यव्यवसाय | ३० |
| मृद् व जंलसधारण | ३२ |


## विद्यार्थी व युवक यांच्यासाठी


| | |
|---|---|
| शालेय शिक्षण | ३४ |
| उच्च व तंत्र शिक्षण | ३७ |
| वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये | ४० |
| क्रीडा व युवक कल्याण | ४२ |


## सर्वसामान्यांसाठी


| | |
|---|---|
| सामाजिक न्याय व विशेष साहाय्य | ४४ |
| महिला व बालविकास | ४६ |
| इतर मागास बहुजन कल्याण | ४९ |
| अल्पसंख्याक विकास | ५० |
| आदिवासी विकास | ५१ |


## उद्योजक व कामगार यांच्यासाठी


| | |
|---|---|
| उद्योग | ५४ |
| कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता | ५६ |
| कामगार | ६० |
| रोजगार हमी | ६१ |

## कायदा व सुव्यवस्था


| | |
|---|---|
| गृह | ६४ |
| विधी व न्याय | ६६ |


## संरचनात्मक


| | |
|---|---|
| सार्वजनिक बांधकाम | ६८ |
| नगरविकास | ७० |
| गृहनिर्माण | ७३ |
| परिवहन | ७५ |
| ऊर्जा | ७८ |
| पर्यटन | ८० |
| जलसंपदा व लाभक्षेत्र विकास | ८२ |
| वने | ८५ |
| पर्यावरण आणि वातावरणीय बदल | ९० |
| बंदरे | ९१ |


## भाषा व संस्कृती


| | |
|---|---|
| सांस्कृतिक कार्य | ९५ |
| मराठी भाषा | ९६ |


## अन्न आणि आरोग्य


| | |
|---|---|
| सार्वजनिक आरोग्य | ९८ |
| अन्न व औषध प्रशासन | १०२ |
| मदत व पुनर्वसन, आपत्ती व्यवस्थापन | १०३ |
| अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण | १०५ |


## प्रशासन


| | |
|---|---|
| महसूल | ११० |
| वित्त | ११० |
| नियोजन | १११ |
| राज्य उत्पादन शुल्क | ११२ |
| संसदीय कार्य | ११३ |
| सामान्य प्रशासन | ११३ |
| माहिती तंत्रज्ञान | ११४ |

# शेतकरी व ग्रामस्थ यांच्यासाठी

# कृषी

- 'विकेल ते पिकेल' अभियानांतर्गत जिल्हा व पिकनिहाय १३४५ मूल्य साखळी विकासाचे प्रकल्प. सध्याच्या योजनांची सांगड घालून क्लस्टरनिहाय हे प्रकल्प राबवण्याचे नियोजन.
- शेतमालाला बाजारपेठ मिळवून देण्यासाठी व मूल्यसाखळ्यांच्या निर्मितीसाठी 'मा. बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन प्रकल्पास' मान्यता. प्रकल्पाची किंमत २१०० कोटी रुपये व प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू.
- एकाच अर्जाद्वारे सर्व योजनांचा लाभ देण्यासाठी महा-डीबीटी पोर्टल विकसित. नोव्हेंबरअखेर ६.८१ लाख शेतकऱ्यांची नोंदणी. सुमारे १४ लाख बाबींसाठी एकूण सुमारे ६ लाख अर्ज प्राप्त.



- 'प्रधानमंत्री पीक विमा योजनेंतर्गत' सुमारे ८४ लाख शेतकऱ्यांना पिकांच्या नुकसानीपोटी ५४९४ कोटी विमा रकमेचे वाटप.
- फळ पीक विमा योजनेत या वर्षी २.४३ लाख शेतकऱ्यांना पिकांच्या नुकसानीपोटी ७१९ कोटी रुपये विमा रकमेचे वाटप.
- विमा योजनेत पारदर्शकता येण्यासाठी पीक विमा पोर्टल व महा-भूलेख पोर्टलचे संलग्नीकरण.

- पीक विमा सुलभीकरणासाठी मोबाइल ॲप.
- फळ पीक विमा योजनेत पहिल्यांदा स्ट्रॉबेरीचा समावेश.
- विविध पिकांसाठी सर्वसमावेशक व स्पर्धात्मक मूल्य साखळ्यांच्या विकासाद्वारे शेतकऱ्यांना थेट शेतमालाचे खरेदीदार / प्रक्रिया उद्योजक / निर्यातदार यांच्याशी जोडण्यात येणार.
- प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये सरपंचांच्या अध्यक्षतेखाली स्वतंत्र ग्राम कृषी विकास समिती स्थापन करण्याचा निर्णय.
- पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर भाजीपाला रोपवाटिका योजनेंतर्गत राज्यात भाजीपाला रोपवाटिकांच्या स्थापनेसाठी अर्थसाहाय्य, ५०० भाजीपाला रोपवाटिकांच्या स्थापनेचा लक्ष्यांक.



- महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी अंतर्गत मौजेकाष्टी, ता. मालेगाव, जि. नाशिक येथे कृषी विज्ञान संकुल स्थापना करणे त्याअंतर्गत शासकीय महाविद्यालये स्थापन करण्यास मान्यता.
- राज्यातील शेतमजुरांना कौशल्याधारित प्रशिक्षण.

## रानभाज्या महोत्सव

- आदिवासी क्षेत्रातील रानभाज्यांना व्यावसायिक बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी रानभाज्या महोत्सवाचे आयोजन.
- राज्यभरात सुमारे ९६ प्रकारच्या भाज्यांच्या प्रकारांची नोंद.
- सुमारे १४ लाख रुपयांची उलाढाल. ११९ ठिकाणी रानभाज्या विक्री सुविधा निर्माण.

## कृषी विस्ताराची नवी दिशा

- राज्यात ३२ हजार शेती शाळांचे आयोजन करून ८ लाखांहून अधिक शेतकऱ्यांना आधुनिक पीक उत्पादन तंत्रज्ञान.
- महिला शेतकऱ्यांसाठी ७०१ शेती शाळांद्वारे मार्गदर्शन.
- सुमारे ५ हजार प्रगतिशील शेतकऱ्यांची रिसोर्स बँक तयार, शासकीय योजनांमधील शेतकरी प्रशिक्षणासाठी या प्रगतिशील शेतकऱ्यांचा सहभाग.
- तालुकास्तरावर शेतकरी समन्वय समिती व कृषी विभागाच्या कार्यालयामध्ये शेतकरी सन्मान व मार्गदर्शन कक्ष स्थापन.
- पिकाची उत्पादकता, गुणवत्ता व शेतकऱ्यांची उत्पन्नवाढ ही त्रिसूत्री अवलंबण्यास प्राधान्य देण्यासाठी 'कृषी संजीवनी सप्ताहा'चे आयोजन.

## कोविड काळात दिलासा

- कोरोना लॉकडाऊन काळामध्ये शेतकऱ्यांच्या बांधावर निविष्ठांचे वाटप आणि थेट शेतकरी ते ग्राहक फळे व भाजीपाल्यांचा पुरवठा.
- सुमारे ९.४२ लाख शेतकऱ्यांना ७५ हजार १३८ गटांच्या माध्यमातून खते, बियाणे वाटप.
- २ लाख ७९ हजार मे.टन रासायनिक खतांचे वाटप.
- १ लाख ९७ हजार क्विंटल बियाण्यांचे वाटप.



- ६ लाखांहून अधिक कापूस बियाणांच्या पाकिटांचे वाटप.
- शेतकऱ्यांच्या ३,७९० गटांच्या माध्यमातून सुमारे १.३७ लाख मे. टन फळे व भाजीपाल्यांचा थेट शहरातील ग्राहकांना पुरवठा.

# पणन

## विक्रमी कापूस खरेदी

- **शेतकऱ्यांकडून हमी भावाने गेल्या दहा वर्षांतील विक्रमी कापसाची खरेदी.**
- **शेतकऱ्यांच्या हितासाठी पावसाळ्यातदेखील मान्सून शेड उभारून कापूस खरेदी.**
- **बहुतांश कापूस हा खरीप २०२०-२१ च्या पेरणीपूर्वी खरेदी करून शेतकऱ्यांना वेळेत देयके.**
- **कापूस खरेदीसाठी १८०० कोटी रुपयांच्या शासन हमीस मान्यता.**



- कृषी उत्पन्न बाजार समित्यांच्या निवडणुकीत पूर्वीप्रमाणेच सहकारी संस्थांच्या माध्यमातून संचालकपदाची निवड. बाजारकार्यक्षेत्रातील विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थांच्या व्यवस्थापन समितीच्या सदस्यांमधून ११ सदस्य बाजार क्षेत्रातील ग्रामपंचायतीच्या सदस्यांनी निवडून दिलेले ४ सदस्य अशा एकूण १५ शेतकरी प्रतिनिधींची निवड करण्याची तरतूद.
- जानेवारी ते जून २०२० अखेर सुविधा केंद्रावरून सुमारे १० हजार मे.टन शेतमाल आखाती व युरोपीय देशांमध्ये निर्यात.
- भाजीपाला व फळांच्या परराज्यातील वाहतुकीस येणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी कृषी पणनमंडळाच्या मार्केटयार्ड येथील मुख्यालयात २४ तास 'आंतरराज्यीय फळे व भाजीपाला वाहतूक नियंत्रण कक्ष' कार्यान्वित.
- आशियाई विकास बँक अर्थसाहाय्यित महाराष्ट्र ॲग्रीबिझनेस नेटवर्क (MAGNET) या प्रकल्पास मान्यता. १०० कोटी रकमेच्या या प्रकल्पास राज्य शासनाचा ३० टक्के स्वतःचा निधी. त्यामुळे फळे व भाजीपाला उत्पादनास मोठ्या प्रमाणावर प्रोत्साहन मिळेल.

## कोविड काळात दिलासा

- राज्य वखार महामंडळ आणि राज्य सहकारी बँक यांचे संयुक्त विद्यमाने शेतकऱ्यांसाठी ऑनलाइन तारण कर्ज योजना. मराठीमध्ये अर्ज करण्याची सुविधा उपलब्ध. ऑनलाइन कर्जाची सुविधा फक्त एक ते दोन दिवसात पूर्ण. शेतमालाच्या किमतीच्या ७० टक्के कर्ज.
- लॉकडाऊन कालावधीत 'थेट शेतकरी ते थेट ग्राहक' या उपक्रमांतर्गत फळे व भाजीपाल्याची ग्राहकांच्या गरजेनुसार खरेदीविक्रीसाठी bs.msamb.com पोर्टल कार्यान्वित.
- आंतरराज्यीय फळे व भाजीपाला वाहतूक नियंत्रण कक्ष स्थापन. महाराष्ट्रातून शेतमाल बाहेरील राज्यात पाठवण्यात यश. शेतकऱ्यांच्या अडचणी/ तक्रारींचे निराकरण.

## बाजार समितीमार्फतच्या उपाययोजना

- कोविड काळात मोठ्या महानगरात भाजीपाला-धान्य-फळांचा तुटवडा निर्माण होऊ नये आणि शेतकऱ्यांचे नुकसान होऊ नये म्हणून बाजार समिती आवारात स्वच्छता व सर्व नियमांचे पालन. बाजार आवारात येणाऱ्या व्यक्तीसाठी प्रवेश द्वाराजवळ, तसेच बाजार आवारात ठिकठिकाणी पुरेशा प्रमाणात हात धुण्यासाठी व्यवस्था, पाण्याचा नळ आणि निर्जंतुकीकरणासाठी सॅनिटायजरची व्यवस्था करून बाजार समित्यांचे कामकाज सुरू.



# फलोत्पादन

- निसर्ग चक्रीवादळामुळे कोकण विभागातील नुकसानग्रस्त फळबागांचे फळबाग योजनेंतर्गत पुनर्लागवड व पुनरुज्जीवन कार्यक्रम हाती घेण्याचा निर्णय.
- राज्य रोजगार हमी योजनेशी निगडित फळबाग योजना पुढे चालू ठेवण्यास मान्यता. २०२०-२१ करिता ५० कोटी रुपयांच्या निधीची तरतूद.

# सहकार

## महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना

- **१ एप्रिल २०१५ ते ३१ मार्च २०१९ पर्यंतच्या कालावधीत शेतकऱ्यांनी घेतलेल्या सर्व अल्पमुदत पीककर्ज, पुनर्गठीत / फेर पुनर्गठीत झालेले पीककर्ज, ज्यांची थकबाकी ३० सप्टेंबर २०१९ रोजी २ लाख रुपयांपर्यंत होती, असे सर्व थकीत पीककर्ज शासनाच्या वतीने भरण्याचा निर्णय घेण्यात आला.**
- **कर्जमुक्तीची रक्कम शेतकऱ्यांच्या बँक खात्यात डीबीटी (DBT) च्या माध्यमाने थेट जमा करण्यात आली.**
- **पाच महिन्याच्या विक्रमी कालावधीत ३०.७७ लाख शेतकऱ्यांच्या कर्जखात्यात १९,६४३ कोटी रुपयांचा लाभांश जमा करण्यात यश मिळाले आहे.**
- **एकूण ९७ टक्के लाभार्थ्यांना जुलै २020 पर्यंत राज्यात लॉकडाऊन असतानादेखील लाभ देण्याची कार्यवाही पूर्ण करण्यात आली.**
- जुलै व ऑगस्ट २०१९ या कालावधीत कोल्हापूर, सांगली, सातारा, पुणे, सोलापूर, अहमदनगर, औरंगाबाद, अमरावती आणि नागपूर जिल्ह्यांत अतिवृष्टीमुळे पिकांचे नुकसान झाले. त्यामुळे बाधित शेतकऱ्यांना पीक कर्जमाफ. सुमारे ४५० कोटी रुपये वितरित.
- खरीप २०२० मधील पीक कर्ज वाटपाचे प्रमाण ७६.२६ टक्के असून ते मागील वर्षाच्या तुलनेत २७ टक्के अधिक आहे.
- साखर कारखान्यांना पुरेशा प्रमाणात कर्ज पुरवठा उपलब्ध करून देण्यासाठी महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेमार्फत आत्मनिर्भर योजना. जास्तीत जास्त सहकारी साखर कारखाने सुरू होण्यास मदत. आतापर्यंत बँकेकडे १९ कारखान्यांचे प्रस्ताव प्राप्त.



- ३२ सहकारी साखर कारखान्यांना सुमारे ५१६ कोटी इतके अल्पमुदत कर्ज बँकेकडून थकबाकीद्वारे घेण्यास मान्यता.
- २०१४-१५ मध्ये गाळप हंगाम घेतलेल्या ५४ साखर कारखान्यांना ऊस पुरवणाऱ्या शेतकऱ्यांची एफआरपीची रक्कम अदा करण्यासाठी दीर्घ मुदतीच्या कर्जासाठी २३ कोटी ४३ लाख रक्कमेचे व्याज अनुदान.

## कोविड काळात दिलासा

- कोविड–१९ संकटाच्या काळात सहकारी पतसंस्थांना दिलासा देण्यासाठी थकीत कर्जाच्या एनपीए वर्गवारीसाठी सध्या असलेला ६ महिन्यांचा कालावधी ९ महिन्यांपर्यंत वाढवण्याचा निर्णय.
- नागरी सहकारी बँका व पतसंस्थांमार्फत विविध प्रकारचे व्यावसायिक व नोकरदार यांनी काही विशिष्ट परिस्थितीत कर्जाची विहित कालावधीत परतफेड न केल्यास, थकीत कर्जाची वसुली होण्यासाठी एकरकमी कर्ज परतफेड योजना लागू. या योजनेस ३१ मार्च २०२१ पर्यंत मुदतवाढ.
- सहकारी संस्थांच्या निवडणुका सहा महिने पुढे ढकलण्याचा निर्णय. आणि सहकारी संस्थांचे लेखापरीक्षण करणे व वार्षिक साधारण सभा घेण्यास मुदतवाढ.
- महाराष्ट्र सहकार विकास महामंडळामार्फत माफक दरात थेट फळे व भाजीपाला पुरवठा.



- लॉकडाऊनच्या कालावधीत महाराष्ट्र सहकार विकास महामंडळामार्फत ७५ शेतकरी उत्पादक कंपन्या/सहकारी संस्थांच्या सहकार्याने ४१४ सहकारी गृहनिर्माण संस्थांमधील १२ हजार सभासदांना माफक दरात थेट फळे व भाजीपाला पुरवठा.
- कोविडमुळे सहकारी संस्थांमधील महत्त्वाच्या विषयांना मंजुरी देण्यासाठी संचालक मंडळांना अधिकार.

# खार जमिनी विकास

- नारवेल, बेनवले, ता. पेण, जि. रायगड, काचली पीटकारी ता. अलिबाग, जि. रायगड आणि पालघर येथील खारभूमी योजनांची कामे सुरू. दिड वर्षात पूर्ण करण्याचे नियोजन. यामुळे २०५२ हेक्टर क्षेत्राचा पुनर्वापर होणार.
- पालघर जिल्ह्यातील कोल व बापाने ता. वसई योजनांच्या नुतनीकरणाची कामे सुरू. माणकुले, सोनकोठा, हाशीवरे या तीन योजनांची कामे दोन वर्षांत पूर्ण करण्याचे नियोजन. यामुळे ९१८ हेक्टर क्षेत्राचा पुनर्वापर होणार.

# ग्रामविकास

- **महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत (मनरेगा) ग्रामीण भागामध्ये १ लाख किलोमीटर पाणंद रस्ते व इतर खडीकरणाचे रस्ते निर्माण करण्याचा संकल्प.**
- **महाआवास अभियान (ग्रामीण)चा शुभारंभ. २० नोव्हेंबर २०२० ते २८ फेब्रुवारी २०२१ पर्यंत महाआवास अभियान – ग्रामीण अंतर्गत विविध घरकूल योजनांमधून ८ लाख ८२ हजार घरकुले बांधली जाणार.**
- ग्रामीण गृहनिर्माण कार्यक्रमातील घरकुलांची गुणवत्ता सुधारण्यासाठी मुंबई आयआयटी संस्थेशी सहयोग करण्याची कार्यवाही सुरू.
- ग्रामीण गृहनिर्माण कार्यक्रमात कॉर्पोरेट संस्थांचा सहभाग घेण्यासाठी ग्राम सामाजिक परिवर्तन फाऊंडेशनसोबत समन्वय.
- सरपंचाची निवड आता पूर्वीप्रमाणेच सदस्यांमधून करण्यात येणार.
- स्मार्ट ग्राम योजनेचे 'आर.आर. आबा पाटील सुंदर गाव पुरस्कार योजना' नामकरण. योजनेतील बक्षिसांच्या रकमेत वाढ. तालुकास्तर गावासाठी १० लाखांऐवजी २० लाख रुपये. जिल्हास्तरावर ४० लाखांऐवजी ५० लाख रुपयांचा पुरस्कार.



- मनरेगामधून 'हरघर गोठे – घरघर गोठे' उपक्रम राबवण्याचा निर्णय. यामधून मनरेगांतर्गत बंधनकारक असलेले कुशल–अकुशल कामावरील खर्चाचे प्रमाण राखले जाणार असून गावांमध्ये रोजगार निर्मिती आणि शेतकऱ्यांसाठी मत्ता निर्मिती होणार.
- मोठ्या गावांमध्ये सांडपाणी, घनकचरा व्यवस्थापनासाठी शहरी दर्जाच्या सुविधा देण्याचा निर्णय. मोठ्या गावांना जिल्हा वार्षिक योजनेतून मिळणार २ कोटी रुपयांपर्यंत निधी. घनकचरा व्यवस्थापनासाठी आवश्यक उपाययोजना करणे व यंत्रसामग्री खरेदी करणे या बाबीचा समावेश.

- स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीसाठी जातवैधता प्रमाणपत्र सादर करण्यास मुदतवाढ. २८ फेब्रुवारी २०२१ पर्यंत राखीव जागांवर निवडणूक लढवणाऱ्या उमेदवारांना हे लागू.
- ग्रामपंचायतींच्या उपसरपंचांना प्रथमच मानधन. उपसरपंचांच्या खात्यावर पहिल्यांदाच १५.७२ कोटी रुपये जमा.
- आदिवासी गावांच्या विकासासाठी पेसामधून १६० कोटी रुपयांचा निधी वितरित.
- जिवाची पर्वा न करता देशाचे संरक्षण करणाऱ्या आजी, माजी सैनिकांना ग्रामपंचायत मालमत्ता कर माफ करण्याचा निर्णय.
- ग्रामस्थांना घराच्या मालमत्तेवर बोजा चढवून बँका, पतसंस्था किंवा इतर अधिकृत वित्तसंस्थांकडून कर्ज घेता येईल. मालमत्ता कर आकारणी पत्रक नमुना ८ वर कर्जाच्या बोजाची नोंद करण्यास मनाई करण्यात आली होती. पण आता हा आदेश रद्द.
- गावांतर्गत मूलभूत सुविधा पुरवणे या योजनेंतर्गत लोकप्रतिनिधींनी सुचवलेल्या कामांमध्ये गावात सौर ऊर्जा, विद्युत ऊर्जेवर आधारित पोलरसहित विद्युत रोहित्रे, बसवणे या नवीन कामांचा समावेश.
- मजूर सहकारी संस्थांना आता ३० लाख रुपयांपर्यंत कामे.
- जुनी निवृत्तिवेतन योजना लागू नसलेल्या जि.प. कर्मचाऱ्याचा सेवेत मृत्यू झाल्यास कुटुंबीयांस १० लाख रुपये सानुग्रह अनुदान.
- उमेद अभियानांतर्गत बचतगटांची ३३ नवीन उत्पादने ॲमेझॉनवर, तर ५० उत्पादने जीईएम या ई-कॉमर्स प्लॅटफॉर्मवर उपलब्ध.
- ग्रामीण व दुर्बल भागातील लोकांच्या दारात बँक पोहोचण्यासाठी उमेद अभियानांतर्गत ५५८ बीसी सखी व ५०३ डीजी-पे सखी कार्यरत. या माध्यमातून कोविड-१९ च्या पार्श्वभूमीवर प्रधानमंत्री गरीब कल्याण योजना व इतर निधी मिळून २२२ कोटी रुपये रकमेचे ४.९३ लाख आर्थिक व्यवहार.



- ग्रामीण भागातील स्वयंसाहाय्यता गटातील महिलांना फायनान्स कंपन्यांच्या चक्रव्यूहातून सोडवण्यासाठी व त्यांचे आर्थिक प्रश्न सोडवण्यासाठी राज्यस्तरीय अभ्यास गटाची स्थापना.
- १५व्या वित्त आयोगाचा निधी आता ग्रामपंचायतींबरोबर जिल्हा परिषद व पंचायत समित्यांनाही मिळणार. एकूण निधीपैकी १० टक्के निधी जिल्हा परिषदांना, १० टक्के निधी पंचायत समित्यांना आणि ८० टक्के निधी ग्रामपंचायतींना मिळणार.

## ग्रामीण गृहनिर्माणची वर्षभरातील घरकुले

- प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) अंतर्गत १ लाख ४८ हजारहून अधिक घरकुले पूर्ण
- रमाई आवास योजनेंतर्गत २८ हजार हून अधिक घरकुले पूर्ण
- शबरी आवास योजनेंतर्गत १२ हजारहून अधिक घरकुले पूर्ण
- पारधी आवास योजनेंतर्गत ७०८ घरकुले पूर्ण
- आदिम आवास योजनेंतर्गत ९९४ घरकुले पूर्ण



- पंडित दीनदयाळ उपाध्याय जागा खरेदी अर्थसाहाय्य योजनेंतर्गत ३५० लाभार्थ्यांना जमीन खरेदीसाठी अर्थसाहाय्य.
- अतिक्रमण नियमानुकूल धोरणांतर्गत ७ हजार ५०० अतिक्रमणधारकांची अतिक्रमणे नियमानुकूल.

## कोविड काळात दिलासा

- ग्रामीण भागातील सुमारे ५ कोटी नागरिकांना प्रतिकार शक्ती सुधारण्यासाठी अर्सेनिक अल्बम हे होमिओपॅथिक औषध ३० व संशमनीवटी या आयुर्वेदिक औषधाचे मोफत वितरण.
- कोरोनामुक्तीसाठी काम करणाऱ्या ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना वेतनासाठी करवसुलीच्या टक्केवारीची अट शिथिल.
- कोरोनामुक्तीसाठी काम करणारे ग्रामपंचायत कर्मचारी, संगणक परिचालक, आशा वर्कर, अंगणवाडी सेविका, आशा गटप्रवर्तक, स्त्री परिचर यांना १ हजार रुपये प्रोत्साहनपर अनुदान.
- कोरोनामुक्तीसाठी काम करणारे जि. प. अधिकारी, कर्मचारी, आशा वर्कर, अंगणवाडी सेविका या सर्वांना ५० लाख रुपयांचे विमा संरक्षण.
- कर्तव्य बजावताना कोरोनामुळे मृत्यू झालेल्या १८ अधिकारी–कर्मचारी यांच्या वारसांना प्रत्येकी ५० लाख रुपयांची विमा रक्कम देण्यास मान्यता.



- ग्रामीण भागात कोरोनामुळे मृत्यू झालेल्या व्यक्तीच्या मृतदेहावर अंत्यसंस्कार करणाऱ्या सामाजिक संस्था, संघटनेच्या कर्मचाऱ्यांना २५ लाख रुपयांचे विमा कवच.
- स्वयंसाहाय्यता गटांकडून कोविड–१९ च्या काळात कापडी मास्क, पीपीई कीट्स तयार करण्यात आले. विक्रीतून गटातील महिलांना ११ कोटी रुपयांचे उत्पन्न.
- उमेदच्या ५० लाख स्वयंसाहाय्यता सदस्यांना कोविड–१९ची जनजागृती करण्यासाठी ऑनलाइन प्रशिक्षण.
- मुदत संपलेल्या ग्रामपंचायतींच्या निवडणुका पुढे ढकलल्या. प्रशासक नियुक्त.

# पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास

- आदिवासी विभागाच्या भारतरत्न डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम अमृत आहार योजनेतील ६ लाख ५१ हजार मुलांना प्रतिदिन प्रतिविद्यार्थी १८ ग्रॅम याप्रमाणे तर १ लाख २१ हजार गरोदर आणि स्तनदा मातांना १ वर्षाकरिता प्रतिदिन प्रति महिला २५ ग्रॅम याप्रमाणे मोफत दूधभुकटी उपलब्ध करून देण्याचा निर्णय.
- पशुपालक शेतकऱ्यांच्या दारापर्यंत पशु आरोग्य सेवा पोहोचवण्यासाठी मुख्यमंत्री पशु स्वास्थ्य योजनेंतर्गत प्रत्येक तालुक्यात 'फिरते पशू चिकित्सालय'. पहिल्या टप्प्यात ८१ पथके स्थापन करणार.
- हेट्टीकुंडी जि.वर्धा येथील जमिनीवर चराईचे अधिकार वन विभागाकडून पशुसंवर्धन विभागास प्राप्त. येथील अधिकार शेतजमिनीसह एमएलडीबीकडे हस्तांतर करण्यात आले.



- नागपूरहून दुबईला दोन कार्गोमधून जिवंत शेळ्या, मेंढ्यांची निर्यात करण्यात आल्याने ग्रामीण भागातील अर्थव्यवस्थेला चालना.
- मांस निर्यातीकरिता राज्यातील अधिकृत कत्तलखान्यांमध्ये, नोंदणीकृत असलेल्या खासगी पशुवैद्यकांना, संबंधित कत्तलखान्याकरिता महाराष्ट्र प्राणी रक्षण कायदा अंतर्भूत असणाऱ्या प्राण्यांच्या कत्तलीसंदर्भात, कत्तलपूर्व तपासणी करण्यासाठी सक्षम प्राधिकारी म्हणून घोषित, यामुळे मांस निर्यातीस चालना मिळेल.
- पशुसंवर्धनाशी निगडित स्वयंरोजगाराच्या उद्देशाने राबवण्यात येणाऱ्या जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत दुग्धव्यवसाय, शेळीपालन आणि कुक्कुटपालन या शासन अनुदानित विविध योजनांमध्ये ऑनलाइन पद्धतीने लाभार्थ्यांकडून अर्ज मागवून, संगणकीय प्रणालीद्वारे निवड करण्यात येणार.
- कुक्कुट व विषाणू लस उत्पादन प्रयोगशाळांची 'टर्न की' बेसिसवर उभारणी पूर्ण.
- शासकीय दूध योजनेंतर्गत अतिरिक्त होणारे एकूण १३७.९३ लक्ष लीटर दूधाचे दूध भुकटीमध्ये रुपांतरण करण्यात येऊन उत्पादित दूधभुकटी व देशी कुकिंग बटर यांची ई-पोर्टलद्वारे विक्री करून एकूण २०७.१४ कोटी रुपये महसूल शासनास प्राप्त झाला आहे.

## कोविड काळात दिलासा

- दूध उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी प्रतिदिन १० लाख लीटर मर्यादेपर्यंत दूध स्वीकृत करून या दूधाचे भुकटीत रूपांतर. एप्रिल ते ऑक्टोबर २०२० या कालावधीत ही योजना राबवली. आतापर्यंत २२५ कोटी रुपये निधी वितरित.
- कोरोना प्रादुर्भावकाळात कुक्कुटपालनाबाबत चुकीचा प्रचार करणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई. विविध प्रसारमाध्यमांद्वारे लोकांचे संभ्रम दूर करण्यासाठी जनजागृती.
- पशुधनाचे आरोग्य सुव्यवस्थित राखणे, दूध उत्पादनात सातत्य राखणे, पशुवैद्यकीय सेवा, लसीकरण, कृत्रिम रेतन अशा विविध सेवा अखंडितपणे सुरू ठेवणे, चारा-वैरणीची उपलब्धता व वाहतूक सुरळीत राखणे, लंपीस्किन रोगाचा प्रादूर्भाव रोखणे यांसारख्या कामांना प्राधान्य.
- महाराष्ट्र पशू व मत्स्यविज्ञान विद्यापीठात कोविड चाचणीसाठी प्रयोगशाळा स्थापन.

# पाणीपुरवठा व स्वच्छता

- केंद्र शासनपुरस्कृत जल जीवन मिशन राबवण्यास मान्यता; ग्रामीण भागातील प्रत्येक कुटुंबाला वैयक्तिक नळ जोडणीद्वारे दरडोई ५५ लीटर प्रतिदिन गुणवत्तापूर्ण पाण्याचा पुरवठा करण्याचे उद्दिष्ट; १३ हजार ६६८ कोटी ५० लाख रुपयांचा खर्च अपेक्षित. राज्य शासनाचा ५० टक्के हिस्सा.
- वैयक्तिक शौचालय बांधकाम योजनेंतर्गत ३ लाख ३९ हजार ४७२ कुटुंबांना शौचालय उपलब्ध.



- भूजल पातळी वाढवण्यासाठी केंद्र शासनपुरस्कृत अटल भूजल योजनेची (अटल जल) राज्यात अंमलबजावणी. योजनेसाठी ९२५.७७ कोटी रुपयांच्या अनुदानाची तरतूद. पाणलोट क्षेत्रातील १३ जिल्ह्यांच्या ३८ तालुक्यांमधील १३३९ ग्रामपंचायती आणि १४४३ गावांची यासाठी निवड.
- मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत पाणी पुरवठा योजनांची कामे पूर्ण करण्यासाठी योजनेस दोन वर्षे (२०२१-२२) मुदतवाढ. यासाठी ४३० कोटी रुपयांचा निधी.

- वर्षभरात सुमारे २०४६ ग्रामीण पाणीपुरवठा योजनांना मंजुरी.
- ठाणे जिल्ह्यातील शहापूर तालुक्यातील ९७ आदिवासी गावे व २७९ पाड्यांसाठी २७६ कोटी रुपयांच्या पाणीपुरवठा योजनेस मंजुरी.
- कोल्हापूर जिल्ह्यातील कसबा सांगाव येथील १२ कोटींच्या ग्रामीण पाणीपुरवठा योजनांना मंजुरी.
- अमरावती जिल्ह्यातील १५६ गावे प्रादेशिक पाणीपुरवठा योजना बळकटीकरणासाठी ३.७७ कोटी मंजूर.
- सातारा जिल्ह्यातील उंडाळे १७ गावे प्रादेशिक पाणीपुरवठा योजना पुनरुज्जीवनासाठी सुमारे सहा कोटींहून अधिक निधी मंजूर.

## स्वच्छतेचे पुरस्कार

- सामुदायिक शौचालय अभियानांतर्गत राज्याचा देशात दुसरा क्रमांक.
- गंदगी मुक्त अभियानात श्रमदान प्रकारात राज्याला तिसऱ्या क्रमांकाचा पुरस्कार.
- सामुदायिक शौचालय अभियानांतर्गत जळगाव जिल्ह्याला देशातील तिसऱ्या क्रमांकाचा, तर भंडारा जिल्ह्यातील २ ग्रामपंचायतींना द्वितीय व तृतीय क्रमांक.
- जागतिक शौचालय दिनानिमित्त झालेल्या केंद्रस्तरीय कार्यक्रमांमध्ये महाराष्ट्रातील कोल्हापूर आणि नाशिक जिल्ह्याला राष्ट्रीय स्तरावरील पुरस्कार.

## कोविड काळात दिलासा

- कोविड–१९ चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी २७ जिल्ह्यांतील स्वच्छाग्रहींसाठी हातमोजे, सॅनिटायझर तसेच मास्क खरेदीसाठी प्रत्येक जिल्ह्याला दहा लाख रुपयांचे अर्थसाहाय्य. राज्यात कार्यरत स्वच्छताग्रहींना ३१ मार्च २०२१ पर्यंत मुदतवाढ.
- कोविड–१९ विषाणूचा प्रादुर्भाव असलेल्या जिल्ह्यात मुबलक व स्वच्छ पाणी पुरवठा. पाणी शुद्धीकरणासाठी आवश्यक रसायने तसेच जैविक पाणी गुणवत्ता चाचणी संच खरेदीसाठी प्रत्येक जिल्ह्याला १० लाख रुपयांचा विशेष निधी.

# मत्स्यव्यवसाय

- **अरबी समुद्रात निर्माण झालेल्या क्यार व महा या दोन चक्रीवादळामुळे मच्छीमारांना मासेमारी न करता आल्यामुळे झालेल्या नुकसानीबद्दल ६५ कोटी इतके विशेष सानुग्रह अनुदान.**
- **२०२०-२१ या आर्थिक वर्षासाठी केंद्र शासनाने प्रधानमंत्री मत्स्यसंपदा योजनेंतर्गत राज्यासाठी १६०.६९ कोटी रुपये इतक्या प्रकल्प किंमतीच्या मत्स्य आराखड्यास मान्यता दिली आहे. तसेच केंद्र शासनाने २०२०-२१ ते २०२४-२५ या पाच वर्षाच्या कालावधीकरिता ३४५ कोटी रुपये इतक्या रकमेचे तात्पुरते वाटप केले आहे. याद्वारे ८९२ कोटी रुपये इतकी संभाव्य गुंतवणूक होणार आहे.**
- मत्स्यव्यवसाय क्षेत्रातील पायाभूत सुविधा विकास निधी योजनेची राज्यात अंमलबजावणी करण्याचा निर्णय. या योजनेत राज्यातील सागरी भागात जेट्टीसह मत्स्यबंदरांचे बांधकाम व मासळी उतरवण्याची ठिकाणे विकसित करण्यात येणार. यासाठी पाच वर्षात ७५२२.४८ कोटींचा निधी प्रस्तावित.
- राज्यातील सागरी जलायशय क्षेत्रात अवैध मासेमारी रोखण्यासाठी जेट्टी व प्रमुख मासळी उतरवण्याच्या केंद्रावर सीसीटीव्ही बसवण्याचा निर्णय.



- मासेमारी नौकांवर सीसीटीव्ही व व्हीटीएस यंत्रणा बसवण्यात येणार.
- एल.ई.डी. दिव्यांच्या साहाय्याने होणारी अवैध पर्ससीन मासेमारी तसेच प्रतिबंधित असलेल्या मांगूर माशाच्या उत्पादनाविरुद्ध कारवाई.
- राज्याच्या किनारी भागात आनंदवाडी (ता. देवगड, जि. सिंधुदुर्ग) व करंजा (ता. उरण, जि. रायगड) येथे मत्स्यबंदराचे बांधकाम सुरू असून, या आर्थिक वर्षात दोन्ही बंदरांसाठी एकूण ६४.७२ कोटी रुपये निधी वितरित केला असून, दोन्ही मत्स्यबंदरांचे काम प्रगतिपथावर आहे.

## कोविड काळात दिलासा

- मच्छीमार नौकांसाठीच्या डिझेल परताव्याच्या रकमेतून कर्जाची वसुली न करण्याचा निर्णय.
- तलाव ठेका रक्कम भरण्यास व मासेमारी परवान्यांच्या नूतनीकरणाला सहा महिन्यांची मुदतवाढ.
- इष्टतम मत्स्य बोटुकली संचयनाची १० टक्के आगाऊ रक्कम भरण्यासाठी तसेच भाडेपट्टीने देण्यात आलेल्या मत्स्यबीज केंद्राची लॉकडाऊन कालावधीत येणारी चालू वर्षाची भाडेपट्टीची रक्कम भरणे या दोहोंसाठी सहा महिन्यांची मुदतवाढ.



- सागरी मासेमारी क्षेत्रातील यांत्रिकी व बिगर यांत्रिकी नौकांचा मासेमारी परवाना टाळेबंदीच्या काळात संपला असल्यास नूतनीकरणासाठी सहा महिन्यांची मुदतवाढ देण्यात आली.
- पिंजरा पद्धतीने मत्स्य संवर्धनासाठी देण्यात आलेल्या ठेक्याची रक्कम या कोविड कालावधीत आल्यास ती भरण्यास मुदतवाढ.
- निमखारे पाणी मत्स्यसंवर्धन / कोळंबी संवर्धन प्रकल्पाच्या परवान्याच्या नूतनीकरणास सहा महिन्याची मुदतवाढ देण्यात आली होती.
- लॉकडाऊन कालावधीत मासे, मत्स्यबीज व मत्स्यखाद्याचा समावेश अत्यावश्यक बाबींमध्ये करून वाहतुकीस परवानगी. मत्स्य व्यावसायिकांना मोठा दिलासा.
- मासेमारी हंगामाच्या शेवटच्या दिवशी (३१ मे) परराज्यांतील मच्छीमार/खलाशांना गावी जाता यावे, यासाठी रेल्वे प्रशासनाशी समन्वय साधून उत्तरप्रदेश व आंध्रप्रदेशमधील मच्छीमारांना गावी पाठवण्याची व्यवस्था.

# मृद् व जलसंधारण

- मुख्यमंत्री जलसंवर्धन योजनेमधून जलसंधारण, जलसंपदा, कृषी, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग आणि जिल्हा परिषदांकडील सुमारे १६ हजार जलसंधारण प्रकल्पांची दुरुस्ती करून मूळ पाणी साठवण क्षमता पुनर्स्थापित करण्याचा निर्णय.



- पहिल्या टप्प्यात मुख्यमंत्री जलसंवर्धन योजनेतील ७९१६ प्रकल्पांच्या दुरुस्तीकरिता १३४१ कोटींचा आराखडा. सर्व प्रकल्पांच्या दुरुस्तीची विशेष मोहीम.
- मुख्यमंत्री जलसंवर्धन योजनेंतर्गत विशेष दुरुस्तीसाठी २०२०-२१ करिता ३०० कोटी रुपये इतक्या निधीची तरतूद.

# विद्यार्थी व युवक यांच्यासाठी

# शालेय शिक्षण

- केंद्र शासनातर्फे देण्यात येणारे पीजीआय (परफॉर्मन्स ग्रेडिंग इंडेक्स) मध्ये महाराष्ट्र राज्याचा श्रेणी ४ मधून श्रेणी १ मध्ये समावेश.
- इयत्ता १० वी व १२ वी च्या निकालाचे काम वेळेत पूर्ण. कोविड काळात इयत्ता १० वी व १२ वी परीक्षेच्या उत्तरपत्रिका या परीक्षण व नियमन करण्यासाठी परीक्षक व नियमकांना घरी देण्याचा निर्णय.
- राज्यातील सर्व परीक्षा मंडळाचे अभ्यासक्रम असलेल्या, सर्व माध्यमांच्या शासकीय व खासगी व्यवस्थापनांच्या सर्व शाळांमध्ये मराठी भाषेचे इयत्ता १०वी पर्यंत अध्यापन व अध्ययन सक्तीचे करण्यात आले.
- माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळांतर्गत सर्व शाळांमधील मुलांना समान आंतरराष्ट्रीय दर्जाचे शिक्षण मिळण्यासाठी, तसेच राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार बालभारती/राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे यांच्या अभ्यासक्रमात सुधारणा करण्यासाठी राज्य आंतरराष्ट्रीय अभ्यासक्रम सल्लागार समितीची स्थापना करण्यात आली आहे.
- पाच हजारांपेक्षा जास्त शिक्षकांची 'पवित्र' प्रणालीमार्फत भरती.
- पुस्तकांची संख्या कमी व्हावी व दप्तराचे ओझे कमी व्हावे यासाठी प्रायोगिक तत्त्वावर द्विभाषिक व एकात्मिक पाठ्यपुस्तकांचे वाटप.
- प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक अशा एकूण २१६५ शाळांना २० टक्के व याआधीच २० टक्के अनुदान घेणाऱ्या २४१७ शाळांना २० टक्क्यांवरून ४० टक्के अनुदान देण्याचा निर्णय.
- शालेय पोषण आहार योजनेंतर्गत प्री-पॅक स्वरूपात कोरडा शिधा वितरित.
- ३०० शाळांना आदर्श शाळा म्हणून विकसित करण्याचा निर्णय.



- शाळा बंद.. पण शिक्षण आहे.. या अभ्यासमालेच्या साहाय्याने ‘दीक्षा’ ॲप आधारित विद्यार्थ्यांना स्वयं अध्ययन करण्यासाठीचा उपक्रम. देशात राज्याची सर्वोत्तम कामगिरी.
- कोविड काळात विद्यार्थ्यांच्या स्वयंशिक्षणासाठी पर्यायी शैक्षणिक दिनदर्शिका विकसित.
- जिओ टी.व्ही.वर चार माध्यमांमधून इयत्ता तिसरी ते १२ वीच्या विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक कार्यक्रमाचे प्रसारण.
- जून २०२० अखेरपर्यंत पाठ्यपुस्तके १०० टक्के विद्यार्थ्यांना वितरित.
- बालभारतीद्वारे उपलब्ध करून दिलेली ऑनलाइन पुस्तके सर्वाधिक डाऊनलोड करून वापरली गेली.
- यु–ट्यूब वाहिनीवर विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक साहित्याचे व्हिडिओ चॅनेल.
- सह्याद्री वाहिनीवर ‘टीली मिली’ हा शैक्षणिक कार्यक्रम इयत्ता पहिली ते आठवीसाठी सुरू.
- शिक्षकांना घरातून विद्यार्थ्यांना ऑनलाइन अध्यापन करता यावे, यासाठी गुगल क्लासरूमची सुविधा.
- गुगलच्या सहकार्याने गुगल क्लासरूम उपक्रम राबवणारे देशातील पहिले राज्य.
- ‘थँक अ टीचर’ शिक्षक दिनानिमित्ताने गुरुजनांप्रति आदर व्यक्त करण्यासाठी अभियान. राज्यभरातून लाखो लोकांचा सक्रिय सहभाग.




- पंडित जवाहरलाल नेहरूंच्या जन्मदिनी साजरा केला जाणारा बाल दिवस आता सप्ताह साजरा करण्याचा निर्णय.
- विद्यार्थ्यांचे आरोग्य जपण्यासाठी पाणी पिण्याची आठवण करून देणारी ‘वॉटर बेल’ प्रत्येक शाळेत वाजवण्याचा निर्णय.
- शालेय जीवनातच देशप्रेमाची भावना आणि लोकशाही मूल्यांची रुजुवात करण्यासाठी शाळांमधून ‘संविधान दिन’ साजरा करण्याचा निर्णय; संविधान उद्देशिकेचे वाचन.

## कोविड काळात दिलासा

- कोविड काळात अध्ययन – अध्यापन प्रक्रिया सुरू राहण्यासाठी 'लर्निंग फ्रॉम होम' ही संकल्पना राबवण्यात आली.
- कोविड–१९ या विषाणूमुळे उद्‌भवलेल्या परिस्थितीमध्ये शैक्षणिक वर्ष २०२०–२१ साठी कोणतेही शुल्क वाढ करू नये, अशा सूचना राज्यातील सर्व शैक्षणिक संस्थांना देण्यात आल्या.
- इयत्ता नववी व ११ वी च्या द्वितीय सत्राच्या परीक्षा न घेता प्रथम सत्र परीक्षेमधील तसेच चाचण्या, प्रात्याक्षिके व अंतर्गत मूल्यमापनातील प्राप्त गुणांचा विचार करून त्या आधारे विद्यार्थ्यांना वर्गोन्नती.
- बृहन्मुंबई महानगरपालिका शाळातील मोफत ऑनलाइन शिक्षणाचा लाभ राज्यातील इतर विद्यार्थ्यांना.



- पूर्व प्राथमिक ते इयत्ता १२ वीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना ऑनलाइन शिक्षण देण्याबाबत मार्गदर्शक सूचना. यानुसार इयत्ता नववी ते १२ वी च्या विद्यार्थ्यांना प्रत्येक दिवशी ४५ मिनिटांच्या चार सत्रांमध्ये ऑनलाइन शिक्षण.
- इयत्ता नववी व ११ वी मध्ये अनुत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना शाळेत प्रत्यक्ष बोलवून किंवा व्हिडिओ कॉन्फरन्सच्या माध्यमातून तोंडी परीक्षा घेऊन १० वी व १२ वी च्या वर्गात प्रवेश देण्याचा निर्णय.

# उच्च व तंत्र शिक्षण

- व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी अधिकाधिक विद्यार्थ्यांना प्रवेश मिळण्याकरिता प्रवेशासाठी पात्रतेच्या गुणांमध्ये ५ टक्के सवलत देण्याचा निर्णय (खुल्या प्रवर्गासाठी ५० टक्के ऐवजी आता ४५ टक्के, मागास प्रवर्ग, आर्थिक दुर्बल घटक व दिव्यांगांसाठी ४५ टक्के ऐवजी आता ४० टक्के.
- राज्यातील ग्रामीण डोंगराळ व आदिवासी भागामधील विद्यार्थ्यांना दर्जेदार उच्च शिक्षण सहज उपलब्ध व्हावे यासाठी नवीन सॅटेलाईट केंद्राची निर्मिती. या शैक्षणिक वर्षापासून नवीन सॅटेलाईट केंद्र मंजुरीसाठी कार्यपद्धती व निकष जाहीर.
- राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात सुचवल्याप्रमाणे Online व Open Distance Learning (ODL) पद्धतीचा वापर वाढणवण्यासाठी सॅटेलाईट केंद्राचा उपयोग व्हावा म्हणून आवश्यक माहिती तंत्रज्ञान व्यवस्था सॅटेलाईट केंद्रामध्ये उपलब्ध करून देणे अनिवार्य.
- हार्वर्ड तसेच ऑक्सफर्ड विद्यापीठाच्या धर्तीवर फोर्ट कॅम्पसचे वर्ल्ड क्लास हेरिटेज सेंटर म्हणून मुंबई विद्यापीठ, फोर्ट कॅम्पस वारसा संवर्धनासाठी २०० कोटींचा निधी.




- राज्यातील महानगरांमध्ये जागेची उपलब्धता विचारात घेऊन स्वयंअर्थसाहाय्यित विद्यापीठ (व्हर्टिकल युनिर्व्हसिटी) धोरण.
- कोकणाच्या सागरी संसाधनांच्या सुयोग्य वापरासाठी महाराष्ट्र ओशन अप्लॉईड सायन्सेस युनिव्हर्सिटी रत्नागिरी येथे स्थापन करण्यासाठी समिती गठित.
- आजी माजी सैनिकांच्या पाल्यांना व्यवसायिक अभ्यासक्रमाच्या प्रवेशाकरिता ५ टक्के आणि कमाल ५ जागांची अट रद्द करून एकूण प्रवेश क्षमतेच्या ५ टक्के जागा आरक्षित.
- पैठण येथे संतपीठ स्थापन, पुढील शैक्षणिक वर्षापासून प्रवेश. संत, परंपरा आणि वारकरी संप्रदायाचे संस्कार पुढील पिढ्यांना मिळण्याकरिता डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठामार्फत अभ्यासक्रम तयार. संतपीठ कार्यान्वित करण्यासाठी रक्कम १ कोटी रुपये उपलब्ध.

- महाराष्ट्र – कर्नाटक सीमाभागातील मराठी विद्यार्थ्यांसाठी नवीन शासकीय मराठी महाविद्यालय सुरू करण्याचा निर्णय. शैक्षणिक वर्ष २०२०–२१ पासून किमान उपलब्ध मनुष्यबळाच्या आधारे मराठी भाषक विद्यार्थ्यांसाठी काही निवडक अभ्यासक्रम ऑनलाइन सुरू होणार.
- आंतरराष्ट्रीय दर्जाचे संगीत महाविद्यालय सुरू करण्याचा निर्णय.
- केंद्र शासन सेवांमध्ये मराठी विद्यार्थ्यांचे प्रमाण वाढवण्यासाठी रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग येथे भारतीय प्रशासकीय सेवापूर्व प्रशिक्षण संस्था सुरू करणार.
- सर जे. जे. कला महाविद्यालय, सर जे. जे. वास्तुविशारद महाविद्यालय व सर जे. जे. उपयोजित कला या तिन्ही महाविद्यालयांचे अभिमत विद्यापीठ करण्याचा निर्णय.
- गोंडवाना विद्यापीठास विद्यापीठ अनुदान आयोगाकडून १२ बी दर्जा प्राप्त. गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली येथे नवीन पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी शिक्षकीय पदे निर्मिती. तसेच गोंडवाना विद्यापीठात डेटा सेंटर उभारणी.
- नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण – २०२० धोरणाचा अभ्यास करून महाराष्ट्रामध्ये सुसंगत शैक्षणिक धोरण राबवण्याकरिता कार्यबल गटाची स्थापना.
- शिक्षणाचा दर्जा उंचावणे, गुणवत्ता वाढवणे व बळकटीकरण करण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मध्ये सुधारणा करण्यासाठी कार्यबल गटाची स्थापना.
- सर्व अकृषिक विद्यापीठे, अभिमत विद्यापीठे, सर्व स्वयं अर्थसाहाय्यित विद्यापीठे, सर्व शासकीय, अशासकीय, अनुदानित, विनाअनुदानित, कायम विनाअनुदानित तसेच मॉडेल डिग्री महाविद्यालये, परीसंस्था तसेच तंत्र शिक्षण संचालनालयाच्या व कला संचालनालयाच्या आधिपत्याखालील अभियांत्रिकी महाविद्यालये, तंत्र निकेतने व तत्सम शैक्षणिक संस्थांमध्ये लावण्यात येणारे नामफलक मराठी भाषेत लावणे बंधनकारक.
- राष्ट्रीय भावना जोपासण्यासाठी महाविद्यालये आणि शैक्षणिक संस्थांमध्ये विद्यार्थ्यांचे दैनंदिन अध्ययन वर्ग सुरू होण्यापूर्वी राष्ट्रगीत म्हणणे बंधनकारक.
- छत्रपती शिवाजी महाराज चरित्र साधने प्रकाशन समिती तसेच लोकमान्य टिळक चरित्र साधने प्रकाशन समिती स्थापन.

- अध्यापकांच्या व्यावसायिक क्षमतेची वृद्धी व सुधारणेसाठी महाराष्ट्र राज्य अध्यापक विकास संस्थेची (महाराष्ट्र स्टेट फॅकल्टी डेव्हलपमेंट ॲकेडमी) स्थापना. कंपनी कायदा, २०१३ अन्वये स्थापन करण्यात आली असून संस्थेस शैक्षणिक व वित्तीय स्वायत्तता प्रदान करण्यात आली आहे. संस्थेच्या खर्चासाठी ६० कोटी रुपयांची तरतूद.
- अध्यापकांच्या प्रशिक्षणासाठी महाराष्ट्र राज्य शिक्षक विकास प्रबोधिनीच्या इमारतीचे बांधकाम अंतिम टप्प्यात आहे.
- पारंपरिक प्रशिक्षण पद्धतीमध्ये सुधारणा करून शैक्षणिकदृष्ट्या प्रगत देशांमधील व इतर राज्यातील शैक्षणिक पद्धतीचा अभ्यास करून अद्ययावत तंत्रज्ञानाधिष्ठित व रोजगाराभिमुख कौशल्याधारित प्रशिक्षण देणार.
- अकृषी विद्यापीठे व शासकीय व अशासकीय महाविद्यालयातील शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सातवा वेतन आयोग लागू.

## कोविड काळात विद्यार्थ्यांचे हित

- कोरोनाच्या पार्श्वभूमीवर सर्व सुरक्षिततेचे नियम पाळून व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी सामायिक प्रवेश परीक्षा कक्षामार्फत विद्यार्थ्यांची ऑनलाइन परीक्षा प्रक्रिया यशस्वी.



- अतिवृष्टी, पूरपरिस्थिती व कोविडमुळे बाधित झालेल्या विद्यार्थ्यांकरिता परीक्षेची संधी उपलब्ध करून देण्यात आली.
- कोरोनाच्या पार्श्वभूमीवर अंतिम वर्षाव्यितिरिक्त इतर वर्षाच्या विद्यार्थ्यांना त्यांच्या पूर्वीच्या सत्रातील कामगिरी आणि अंतर्गत मूल्यमापनाच्या आधारे प्रवेश देण्यात आला.
- विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मार्गदर्शक सूचनानुसार अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांच्या परीक्षा ऑनलाइन / ऑफलाइन / मिश्र पद्धतीने सुरळीतपणे पार पाडण्यात आल्या.

# वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये



- कोविड–१९ परिस्थितीशी यशस्वी मुकाबला.
- शासकीय वैद्यकीय महाविद्यालयद्वारे स्थापित २० कोविड रुग्णालयात सुमारे ६००० हून अधिक खाटा कोविड रुग्णांसाठी उपलब्ध व यापैकी १६०० हून अधिक खाटा अतिदक्षता (आयसीयू) साठी राखीव. ९५ टक्क्यांहून अधिक खाटा ऑक्सिजनसह.
- सेंट जॉर्ज रुग्णालय, मुंबई येथे कोविड अतिदक्षता कक्षात १०० खाटांची व्यवस्था.
- कोविड–१९ चाचणीसाठी विक्रमी वेळेत खासगी व शासकीय १९६ प्रयोगशाळांची उभारणी.
- सुमारे १ कोटीहून अधिक नागरिकांची कोविड चाचणी. सर्व शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये कोविड–१९ चाचण्या करण्यासाठी साथरोग प्रयोगशाळा कार्यान्वित.
- कोविड–१९ साठी चाचणी किटचा पुरवठा १ सप्टेंबर २०२० पासून केंद्र शासनाकडून मिळणार नसल्याने राज्यातील प्रयोगशाळांना आरटीपीसीआर (RTPCR) किट, आरएनए (RNA) एक्स्ट्रॅक्शन किट व व्हिटिएम (VTM) किटचे वितरण.
- मुख्यमंत्री व वैद्यकीय शिक्षण मंत्री यांच्या हस्ते प्लाझ्मा डोनेशन बँकेचे डिजिटल उद्घाटन. राज्यातील २३ शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयांमध्ये प्रोजेक्ट प्लॅटिना प्रकल्पासाठी आवश्यक असलेली यंत्रसामग्री, साधनसामग्रीसाठी मुख्यमंत्री साहाय्यता निधीतून १६.८५ कोटी रुपये इतका निधी उपलब्ध.
- नंदुरबार येथे १०० एमबीबीएस (MBBS) क्षमतेचे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय २०२० साली सुरू.
- अलिबाग येथे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व पुणे महानगरपालिकेने भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी १०० एमबीबीएस (MBBS) क्षमतेचे वैद्यकीय महाविद्यालय स्थापन करणेबाबत शासनाच्या मान्यतेने केंद्र शासनास प्रस्ताव सादर.

- राज्यातील १८ शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, ३ दंत महाविद्यालय व ५ शासकीय आयुर्वेदिक महाविद्यालयातील निवासी डॉक्टरांच्या सध्याच्या विद्यावेतनात १० हजार रुपयांची वाढ. १ मे २०२० पासून अंमलबजावणी.

- आरोग्य विज्ञान पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशाकरिता प्रादेशिक कोटा (७०:३०) आरक्षण पद्धत रद्द. प्रादेशिक आरक्षण रद्द झाल्याने सर्व भागातील विद्यार्थ्यांना आरोग्य विज्ञान पदवी अभ्यासक्रमासाठी शिक्षणाची समान संधी उपलब्ध होणार.

- बी.जे. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय पुणे व शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर येथे आयसीएमआर (ICMR) पुरस्कृत कोविड-१९ व्हॅक्सिनची क्लिनिकल ट्रायल करण्यास मान्यता.




- हाफकिन संस्थेतील बीसीजी (BCG) लसीची कोविड-१९ रुग्णावर क्लिनिकल ट्रायल ससून रुग्णालय, पुणे येथे सुरू.

- धुळे येथील भाऊसाहेब हिरे शासकीय महाविद्यालयात पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरू. या अभ्यासक्रमाच्या ४६ जागांमध्ये वाढ.

- लातूर शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे 'विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय विज्ञान संस्था लातूर' असे नामकरण.

# क्रीडा व युवक कल्याण

- क्रीडा क्षेत्रात गुणवत्ता निर्माण करण्यासाठी आंतरराष्ट्रीय दर्जाचे क्रीडा विद्यापीठ स्थापन करण्याचा निर्णय.
- गुवाहाटी येथे जानेवारीमध्ये झालेल्या तिसऱ्या खेलो इंडिया क्रीडा स्पर्धेत महाराष्ट्र राज्याने ७८ सुवर्ण, ७७ रौप्य व १०२ कांस्य अशी एकूण २५७ पदके मिळवून पदक तालिकेत प्रथम स्थान संपादन केले. पदक विजेत्या ३१९ खेळाडूंचा ३.२५ कोटी रुपयांची रोख रक्कमेची बक्षिसे देऊन गौरव.



- जागतिक, भारतीय फूटबॉल संघटनेच्या संयुक्त विद्यमाने व राज्य शासनाच्या सहकार्याने १७ वर्षांखालील मुलींच्या फीफा वर्ल्डकप फूटबॉल स्पर्धांचे आयोजन. यातील अंतिम व उपांत्य फेरीचे सामने राज्यात होणार.
- शिवछत्रपती राज्य क्रीडा जीवन गौरव पुरस्कार,उत्कृष्ट क्रीडा मार्गदर्शक पुरस्कार, शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार (खेळाडू), शिवछत्रपती राज्य क्रीडा दिव्यांग पुरस्कार, शिवछत्रपती राज्य क्रीडा साहसी क्रीडा पुरस्कार वितरण भव्य स्वरूपात संपन्न.
- मुलींमध्ये तंदुरुस्तीबाबत व आहार आणि आरोग्यविषयक जागरूकता निर्माण करणे, तसेच खेळांकडे आकर्षित करून राज्य, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय खेळाडू निर्माण करण्याच्या प्रक्रियेस चालना. राज्यात इयत्ता पहिली ते बारावीमधील ६ ते १८ वयोगटातील मुलींसाठी 'गो गर्ल गो' मोहिमेचा शुभारंभ.

# सर्वसामान्यांसाठी

# सामाजिक न्याय व विशेष साहाय्य

- जात वैधता प्रमाणपत्र पडताळणीसाठी संपूर्ण ऑनलाइन पद्धतीने व दुप्पट वेगाने प्रक्रिया.
- लोकनेते स्व. गोपीनाथराव मुंडे ऊसतोड कामगार कल्याण महामंडळ नोंदणी, रचना, स्थापना, कार्यालय इत्यादीबाबत कार्यवाहीला वेग.
- राज्यपुरस्कृत संजय गांधी निराधार अनुदान योजना, श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्ती योजना, केंद्र पुरस्कृत इंदिरा गांधी राष्ट्रीय वृद्धापकाळ निवृत्तिवेतन योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्तिवेतन योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय दिव्यांग निवृत्तिवेतन योजनेतील ३५ लाख लाभार्थ्यांना आतापर्यंत ३१९२ कोटी रुपयांचे अर्थसाहाय्य.
- अनुसूचित जाती आणि नवबौद्ध घटकातील मुला–मुलींना परदेशात विशेष अध्ययन करण्यासाठी राजर्षी शाहू महाराज शिष्यवृत्ती योजनेंतर्गत नियमानुसार पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेताना त्याच अभ्यासक्रमाच्या पदवीऐवजी आता विद्यापीठाने अन्य शाखेच्या पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी प्रवेश दिला असल्यास विद्यार्थ्याला या शिष्यवृत्ती योजनेचा लाभ मिळणार.
- शासकीय वसतिगृहात प्रवेशास पात्र असूनही प्रवेश न मिळू शकलेल्या ११ वी व त्यापुढील उच्च शिक्षण घेणाऱ्या अनुसूचित जाती व नवबौद्ध विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या स्वाधार योजनेचा विस्तार तालुकास्तरापर्यंत करण्याचा व शहरापासून ५ कि.मी. हद्दीपर्यंत महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना लागू असलेल्या योजनेतील सवलती १० कि.मी.पर्यंत वाढवण्याचा प्रस्ताव.



- केंद्र पुरस्कृत राष्ट्रीय सामाजिक साहाय्य कार्यक्रमाखालील राष्ट्रीय कुटुंब लाभ योजनेंतर्गत दारिद्र्यरेषेखालील कुटुंबीयांना अर्थसाहाय्य मिळण्याबाबतचे अर्ज स्वीकारण्यास मुदत. कर्ती स्त्री किंवा कर्ता पुरुष मृत्यू पावल्यानंतर एक वर्षाच्या आत ऐवजी ती आता वाढवून तीन वर्षे इतकी करण्यात आली आहे.
- अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना मॅट्रिकोत्तर व फ्रीशिपच्या शिष्यवृत्तीसाठी ८३७ कोटी ६९ लाख रुपये वितरित.
- मुंबईस्थित पीपल्स एज्युकेशन सोसायटीच्या सिद्धार्थ महाविद्यालयास विविध विकासकामांसाठी १२ कोटी ७९ लाख रुपये निधी.

- तृतीयपंथीयांच्या समस्या/तक्रारी याचे निवारण करण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय तक्रार निवार समितीची स्थापना.

## कोविड काळात दिलासा

- परदेश शिष्यवृत्तीचे लाभार्थी विद्यार्थी भारतात किंवा परदेशात राहून ऑनलाइन पद्धतीने त्या त्या विद्यापीठाचे शिक्षण घेत असतील त्यांना कोरोना प्रादुर्भाव संपेपर्यंत अनुज्ञेय फी व शिष्यवृत्ती देण्याचा निर्णय. यासाठी १२ कोटी रुपये निधी वितरित.
- पुणे येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण (बार्टी) संस्थेमार्फत एम.पी.एस.सी. परीक्षेसाठी ऑनलाइन कोचिंग सुरू करण्याचा निर्णय. यु-ट्यूब या सोशल मीडियाद्वारे बहुसंख्य विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षा मार्गदर्शनाचा लाभ.
- लॉकडाऊनच्या काळात राज्याच्या विविध भागांत अडकलेल्या एक लाख ४१ हजार ऊसतोड मजुरांना त्यांच्या घरी पोहोचविण्यात यश.



- कर्णबधिर प्रवर्गातील दिव्यांग व्यक्तींना कोविड-१९ ची योग्य माहिती पोहोचवण्याच्या दृष्टीने सांकेतिक भाषेमध्ये व्हिडिओ निर्मिती.
- हालचाल करू न शकणाऱ्या दिव्यांग-ज्येष्ठ नागरिकांसाठी जिल्ह्याच्या दिव्यांग कल्याण निधीतून एक महिन्याचे रेशन, आवश्यक किराणा तसेच आरोग्यविषयक जीवनावश्यक वस्तू यांचे किट वाटप.
- मुंबई, पुणे, बुलडाणा यांसह काही जिल्ह्यांमध्ये कम्युनिटी किचनच्या माध्यमातून हजारो दिव्यांग व एकटे राहणारे ज्येष्ठ नागरिक यांना मोफत जेवण.
- कोरोना विषाणू संसर्गाबाबत तत्काळ माहिती देण्यासाठी सर्व महानगरपालिका व जिल्हा समाज कल्याण कार्यालयांमध्ये दिव्यांग, ज्येष्ठ नागरिक यांच्यासाठी स्वतंत्र मदत कक्ष स्थापन.
- दिव्यांग कर्मचाऱ्यांना कोविड विषाणूच्या बाधेची जास्त भीती असल्यामुळे वाहतूक सुविधा सुरळीत होईपर्यंत शासकीय कार्यालयामधील उपस्थितीतून सूट देण्याचा निर्णय.
- पीएच.डी. व एम.फिलचे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना दिली जाणारी डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती (BANRF) कोरोनामुळे या वर्षी १०५ ऐवजी पात्र सर्व ४०८ विद्यार्थ्यांना देण्याचा निर्णय.

# महिला व बालविकास

- 'नव तेजस्विनी–महाराष्ट्र ग्रामीण महिला उद्यम विकास प्रकल्प' राबवण्याचा निर्णय, आंतरराष्ट्रीय कृषी विकास निधी साहाय्यित ५२३ कोटी रुपये खर्च अपेक्षित; यामुळे ग्रामीण महिलांच्या उन्नत उपजीविकेकरिता मूलभूत बदलाचा हा कार्यक्रम १० लाख कुटुंबांपर्यंत पोहोचणार.
- पोषण महिना राष्ट्रीय कार्यक्रमात देशात सर्वाधिक उपक्रम राबवत राज्याचा पहिला क्रमांक.
- बचतगटाच्या महिलांचे सक्षमीकरण करण्याकरिता माविम 'ई–बिझनेस प्लॅटफॉर्म'चे अनावरण. यामध्ये त्यांच्या शेतमालाला उत्कृष्ट बाजार व भाव मिळवून देण्यासाठी तंत्रज्ञानाची जोड. २.५ लाखांपेक्षा जास्त महिला शेतकऱ्यांची माहिती संकलित आणि त्यांना लाभ मिळण्यास सुरूवात.



- अति गरीब व कर्जबाजारी कुटुंबाना बँकिंग सेवाद्वारे नवीन कर्ज व क्षमता बांधणी करून त्यांना गरिबीतून मुक्त करण्यासाठी तेजश्री फायनान्शिअल सर्व्हिसेस' सुरू करण्यात आली. ३ वर्षांमध्ये ६३.५३ कोटी खर्च अपेक्षित व मानव विकास मिशन अंतर्गत जिल्ह्यांना प्राधान्य.
- जिल्हा मुख्यालय ठिकाणची विभागाची कार्यरत विविध कार्यालये एकाच छताखाली आणण्यासाठी महिला व बालविकास भवन स्थापन करण्याचा निर्णय.
- बालकांच्या कल्याणासाठी राज्यातील बाल कल्याण संस्थामधील मुलांचे कल्याण व पुनर्वसन करण्याकरिता राज्य बाल निधी निर्माण करण्यासाठी दोन कोटी रुपयांची तरतूद.
- 'Juvenile Justice Information System' च्या डॅशबोर्ड व माहिती व्यवस्थापन पद्धतीद्वारे बालकांची काळजी घेणाऱ्या संस्था (सीसीआय), बाल कल्याण समिती (सीडब्ल्यूसी), बाल न्याय बोर्ड (जेजेबी) यांचे संनियंत्रण व संबंधित प्रत्येक बालकाची नोंद व पाठपुरावा करण्यात येणार.

- बालकांची काळजी घेणारी संस्थांचा (सीसीआय) नोंदणीचा कार्यक्रम हाती घेऊन अपात्र संस्था बंद करण्यात आल्या. संस्थांच्या कामकाजात पारदर्शकता व संनियंत्रणात सुलभता. या अंतर्गत विभागाने ३७ सरकारी संस्था व ४१३ अशासकीय संस्थाच्या नोंदणीला मान्यता.
- गर्भवती स्त्रिया, स्तनदा माता यांना अंगणवाडी केंद्रामध्ये अंगत-पंगत पद्धतीने सहभोजनाचा लाभ देणारी 'यशोदा माता अंगत-पंगत योजना' राबवण्याचा निर्णय.
- अंगणवाडी सेविका, मदतनीस यांच्या रिक्त पदांपैकी ५० टक्के पदे भरण्यास तसेच नवीन ९८ अंगणवाडी आणि ७८५ मिनी अंगणवाडी केंद्रे सुरू करण्यास मान्यता.
- अंगणवाडी केंद्रांच्या जागा भाड्यात भरीव वाढ; खासगी जागेत भरणाऱ्या ग्रामीण, आदिवासी क्षेत्रातील अंगणवाडी, मिनी अंगणवाडी केंद्राचे भाडे १००० रुपये, नागरी क्षेत्रातील (नगरपालिका, परिषद, महानगरपालिका)- ४००० रुपये, महानगर क्षेत्रात ६००० रुपये.
- बालविवाहांना प्रतिबंध करण्यासाठी बालविवाह प्रतिबंध नियम, २००८ मध्ये सुधारणा करण्याचे ठरविण्यात येऊन त्यासाठी तज्ज्ञांची मसुदा समिती गठित करण्यात आली.
- बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम, २०१५ अन्वये गठित बालकल्याण समितीचे कामकाज प्रभावीपणे करण्याच्या अनुषंगाने आदर्श कार्यनियमावली तयार करण्यात आली आहे.
- राज्यातील सर्व अंगणवाड्यांचे 'जिओ-टॅगिंग' करण्यात आले.

## कोविड काळात मदत

- वेश्या व्यवसाय करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करणाऱ्या महिलांना कोविड-१९ चा प्रादुर्भाव संपेपर्यंतच्या कालावधीत प्रत्येक महिन्याला कोरडे अन्नधान्य पुरवणे; तसेच या महिलांना प्रतिमहिना ५ हजार रुपये; तसेच ज्या महिलांची मुले शाळेत जातात, अशा महिलांना अतिरिक्त २ हजार ५०० रुपये रोख स्वरूपात मुख्यमंत्री साहाय्यता निधीतून ऑक्टोबर, २०२० पासून अर्थसाहाय्य देण्याचा निर्णय. ५१ कोटी १८ लाख रुपये निधी उपलब्ध करून देण्यास मान्यता.
- ३ ते ६ वर्षे वयोगटातील लाभार्थ्यांना गरम ताजा आहारऐवजी 'टेक होम रेशन' अंतर्गत कच्चे धान्य व किराणा मालाचे वाटप. स्थलांतरित बालकांनाही लाभ देण्याचा निर्णय घेतल्याने लाभार्थ्यांची संख्या ६५ लाख वरून वाढून ७५ लाख लाभार्थ्यांना लाभ.

- पोषण व बालकांच्या सर्वांगीण विकास संबंधित पालकांचे समुपदेशन सुरू राहण्याकरिता तरंग सुपोषित महाराष्ट्राचा या डिजिटल प्लॅटफॉर्मची सुरुवात करण्यात आली. यामध्ये पालक ८०८०८०९०६३ या मोबाइल क्रमांकावर थेट किंवा व्हॉट्सॲपद्वारे संपर्क साधल्यास माहिती उपलब्ध होते. या प्लॅटफॉर्मद्वारे ३.५ लाखांपेक्षा जास्त पालकांचे समुपदेशन करण्यात आले आहे.



- माविमअंतर्गत २९ लोकसंचालित साधन केंद्राद्वारे (सीएमआरसी) १२ जिल्ह्यांमध्ये शिवभोजन केंद्रांचे संचालन. ४.७४ लाख थाळीवाटप आणि २.१३ कोटी रुपयांची उलाढाल.
- ३५ जिल्ह्यांतील बचतगटांनी २.०४ लाख कुटुंबांपर्यंत धान्य व जीवनावश्यक वस्तूंची मदत पोहोचवली.
- टाळेबंदी कालावधीत बचत गटांमार्फत २७ जिल्ह्यांमध्ये अल्पदरात २१०० मे.टन. भाजीपाल्याचा पुरवठा.
- २९ सीएमआरसींच्या सहभागाने २५.४३ लाख मास्कची निर्मिती; ४.५७ कोटी रुपयांची उलाढाल.
- कोविड-१९ च्या काळात माविमअंतर्गत अन्नसुरक्षेच्या दृष्टीने सामाजिक सहभागातून धान्य बँक स्थापित करण्यात आल्या. लॉकडाऊनच्या काळात यामुळे गरजू कुटुंबांना विशेष मदत मिळाली. यामध्ये कुटुंबांना बँकेकडून धान्याचे व्याज स्वरूपात काही काळाकरिता धान्य मिळते.

# इतर मागास बहुजन कल्याण

- इमाव, विजाभज आणि विमाप्र प्रवर्गातील विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी महात्मा जोतिबा फुले संशोधन प्रशिक्षण संस्थेची (महाज्योती) नागपूर येथे स्थापना. संस्थेसाठी ५० कोटी रुपये निधी.
- खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील युवक–युवती व इतर उमेदवारांसाठी विविध योजना राबवण्यासाठी महाराष्ट्र संशोधन उन्नत व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत) संस्थेची नाशिक येथे स्थापना.
- इमाव प्रवर्गातील (ओबीसी) मुला–मुलींसाठी ७२ वसतिगृह सुरू करण्याचा निर्णय. प्रत्येक जिल्ह्यात मुलांचे व मुलींचे एक अशी दोन वसतिगृहे बांधण्यात येणार.
- इयत्ता १० वी व १२ वीच्या परीक्षेत सर्वप्रथम आलेल्या विमुक्त जाती–भटक्या जमाती प्रवर्गाच्या ४० गुणवंत विद्यार्थी, विद्यार्थिनींना आणि परीक्षेत सर्वप्रथम आलेल्या इतर मागास प्रवर्गाच्या ४१ गुणवंत विद्यार्थी, विद्यार्थिनींना गेल्या दोन वर्षातील स्व. वसंतराव नाईक गुणवत्ता पुरस्कार प्रदान करण्यास मान्यता.
- विजाभज विमाप्र व इमाव या मागासवर्गीय व्यक्तींना शासकीय सेवेतील आणि शैक्षणिक प्रवेशासाठी आवश्यक असणाऱ्या नॉन–क्रिमिलेअर प्रमाणपत्र काढताना उत्पन्नाचा दाखला देण्याच्या कार्यपद्धतीमध्ये सुलभता.
- भटक्या जमाती – क या प्रवर्गातील धनगर समाजासाठी विविध १३ योजना लागू; ५५०० गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांना इंग्रजी माध्यमाच्या नामांकित शाळेमध्ये प्रवेश देण्याचा निर्णय.
- भटक्या जमाती 'क' प्रवर्गातील धनगर समाजासाठी घरे बांधण्याच्या योजनेला पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांचे नाव.

## कोविड काळात दिलासा

- व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेणाऱ्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना नोंदणी करतेवेळी जात पडताळणी प्रमाणपत्र सादर करण्यासाठी कोरोना काळात ६ महिन्याची वाढीव मुदत.
- शैक्षणिक संस्थांना शिष्यवृत्ती शासनाकडून अप्राप्त आहे, या सबबीखाली कोणत्याही विद्यार्थ्याचे प्रवेश रद्द करण्यात येऊ नये. त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांना आवश्यक असलेले सर्व दाखले, प्रमाणपत्र, व आवश्यक दस्तवेज त्वरित उपलब्ध करून देण्यात यावे, असे निर्देश सर्व शैक्षणिक संस्थांना देण्यात आले.

# अल्पसंख्याक विकास

- अल्पसंख्याक समाजातील महिलांचे आर्थिक सक्षमीकरण करण्यासाठी त्यांना बचतगटाच्या माध्यमातून संघटित करून उद्योग व्यवसाय करण्यासाठी प्रोत्साहित करण्याच्या योजनेला ३१ मार्च २०२५ पर्यंत ५ वर्षांची मुदतवाढ.
- महिला आर्थिक विकास महामंडळामार्फत ८ हजार ८०० महिलांचे संघटन करून ८०० बचतगट स्थापन करण्यात येणार.
- सध्या कार्यरत असलेल्या ३ हजार २०० बचतगट व नव्याने स्थापन होणाऱ्या ८०० बचतगटातील सदस्यांना कौशल्यवृद्धीचे प्रशिक्षण, त्यांची बँकांशी जोडणी व कर्ज उपलब्धता करून देऊन बचतगटांच्या उपक्रमांना चालना.
- अल्पसंख्याक समाजाचे शासकीय सेवेतील प्रमाण वाढवण्याकरिता युपीएससी स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण योजना. प्रशिक्षण घेणाऱ्या उमेदवारांच्या विद्यावेतनात २ हजारांवरून ४ हजार रुपये इतकी वाढ.
- वक्फच्या जमिनी, मालमत्ता कवडीमोल दराने भाड्याने देण्यास आळा. मुंबईतील एका वक्फ मालमत्तेच्या भाड्यात अडीच हजारावरून २.५५ लाख रुपयांपर्यंत वाढ करण्यास मान्यता. वाढीव उत्पन्नाचा उपयोग मुस्लीम समाजातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी करण्याचे आवाहन.
- डॉ. झाकीर हुसेन मदरसा आधुनिकीकरण योजनेतून १६८ मदरशांना शिक्षकांच्या मानधनासाठी २.३१ कोटी रुपये वितरित.
- राज्यातील शासकीय आणि खासगी ८४ आयटीआयमध्ये अल्पसंख्याक विद्यार्थ्यांसाठी वर्ग. ८ हजार ३४८ विद्यार्थ्यांना यंदा मिळणार प्रशिक्षण.
- राज्यातील १५ शासकीय पॉलिटेक्निकमध्ये अल्पसंख्याक विद्यार्थ्यांसाठी यंदाही दुसऱ्या पाळीतील वर्ग.
- अल्पसंख्याक समाजातील मुलींच्या उच्च शिक्षणाला चालना देण्यासाठी राज्यात २३ ठिकाणी शैक्षणिक संकुलांमध्ये वसतिगृहे. प्रवेशप्रक्रिया होणार सुरू.
- पोलीस भरतीच्या तयारीसाठी अल्पसंख्याक तरुणांसाठी विविध जिल्ह्यांमध्ये प्रशिक्षण योजना.

# आदिवासी विकास

## खावटी अनुदान योजना

- आदिवासी बांधवांच्या मदतीसाठी खावटी अनुदान योजना. कोविड काळात ११.५५ लाख लाभार्थ्यांना लाभ मिळणार. लाभार्थ्याला ४ हजार रुपये अनुदान. ४८६ कोटी रुपये खर्च अपेक्षित.




- अनुसूचित जमातीतील कुटुंबांना रेशन कार्ड काढण्यासाठी व जातपडताळणी प्रमाणपत्र काढण्यासाठी येणारा खर्च न्यूक्लिअस बजेट योजनेतून करण्याचा निर्णय.
- यूपीएससी मुख्य परीक्षा व मुलाखतीची तयारी करणाऱ्या अनुसूचित जमातीमधील विद्यार्थ्यांना मिळणार २६ हजार रुपयांचे आर्थिक साहाय्य.
- शबरी आदिवासी घरकूल योजनेत दिव्यांग लाभार्थ्यांना ५ टक्के आरक्षण, दिव्यांग महिलांना प्राधान्य.
- पंतप्रधान वनधन विकास योजनेंतर्गत राज्यात ६४ वनधन केंद्रांची स्थापना. ५०० वनधन विकास केंद्रे स्थापन करण्याचे उद्दिष्ट.

## कोविड काळात दिलासा

- कोविड विषाणूच्या प्रादुर्भावामुळे विद्यार्थ्यांना शाळेपर्यंत आणण्याऐवजी शिक्षण विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवण्याचे नियोजन.
- शिक्षकांच्या ११ उपसमित्यांच्या माध्यमातून नियोजनबद्ध आराखडा; असलेल्या संस्थांमधील ४ लाख ७६ हजार ५९४ विद्यार्थ्यांना या उपक्रमाचा लाभ. तसेच इयत्तानिहाय कार्यपुस्तिका व कृतिपुस्तिका तयार.

- शासकीय आश्रमशाळा, अनुदानित आश्रमशाळा, एकलव्य निवासी शाळा व खासगी नामांकित शाळांमधील विद्यार्थ्यांना घरपोच कार्यपुस्तिका, कृतिपुस्तिका व शैक्षणिक साहित्याचे वाटप. विद्यार्थ्यांचा अभ्यास होत आहे की, नाही हे पाहण्यासाठी आठवड्याला गावभेटी. शिक्षकांकडून विद्यार्थ्यांच्या अभ्यासाचा आढावा घेऊन मार्गदर्शन सुरू.

- भारतरत्न डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम अमृत आहार योजनेंतर्गत महिला व लाभार्थी बालकांना घरपोच आहार. लॉकडाऊन काळात गरोदर स्त्रिया व स्तनदा माता यांना एकवेळ चौरस आहार तसेच ७ महिने ६ वर्ष वयोगटातील बालकांना पोषक आहाराचे घरपोच वाटप. एक महिना पुरेल इतकी पाकिटे तसेच ७ महिने ते ६ वर्षे वयोगटातील बालकांना ७ दिवस पुरतील इतकी अंडी घरपोच वितरित.



- कोविड-१९ संसर्गामुळे उद्‌भवलेल्या परिस्थितीत राज्यातील आदिवासी मजुरांना मूळ गावी आणण्यासाठी होणारा खर्च भागवण्यासाठी न्यूक्लिअस बजेट योजनेंतर्गत खर्च करण्यास मंजुरी. तसेच यासाठी गटनिहाय आर्थिक मर्यादेची अट शिथिल, वित्तीय अधिकारात वाढ.

# उद्योजक व कामगार यांच्यासाठी

# उद्योग

## मॅग्नेटिक महाराष्ट्र २.०

- जागतिक पातळीवर मंदीसदृश परिस्थिती असतानाही महाराष्ट्रात ५२ हजार कोटी रुपयांच्या गुंतवणुकीचे सामंजस्य करार. याव्यतिरिक्त सुमारे १४ हजार कोटी रुपये औद्योगिक गुंतवणुकीचे प्रस्ताव.

## ईज ऑफ डुईंग बिझनेस

- राज्यात येणाऱ्या सर्व थेट परकीय गुंतवणुकीच्या व ५० कोटी व त्यापेक्षा अधिक गुंतवणुकीच्या प्रस्तावांना अत्यंत तातडीने व स्वयंचलित प्रणालीद्वारे एकाच ठिकाणी 'महापरवाना' देण्याचा निर्णय.
- सामूहिक प्रोत्साहन योजना २०१९ अंतर्गत कृषी व अन्नप्रक्रिया क्षेत्रातील मोठ्या व विशाल प्रकल्पांच्या गुंतवणूक निकषांमध्ये बदल. त्यानुसार राज्यातील आकांक्षित जिल्ह्यातील उद्योगांना ११० टक्के, मराठवाडा, विदर्भ, धुळे, रत्नागिरी आणि सिंधुदुर्गमधील उद्योग घटकांना १०० टक्के व उर्वरित महाराष्ट्रातील ड/ड+ तालुक्यांमधील उद्योगांना १०० टक्के व उर्वरित तालुके जे अ/ब/क प्रवर्गात येतात त्यांच्या कृषी आधारित व अन्न प्रक्रिया उद्योगांशी संबंधित प्रकल्पांना भांडवली गुंतवणुकीच्या मर्यादेत अनुक्रमे ५० टक्के, ७५ टक्के प्रोत्साहने.
- एक खिडकी योजनेद्वारे 'मैत्री'मार्फत या वर्षामध्ये ५१,७०० ना-हरकत प्रमाणपत्रे / परवाने देण्यात आले.
- उद्योग घटकांना सामूहिक प्रोत्साहन योजनेंतर्गत या वर्षी २६०० कोटी रुपये वित्तीय भांडवल व इतर प्रोत्साहने देण्याची लक्षणीय कामगिरी.
- महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे उद्योगांसाठी 'प्लग ॲण्ड प्ले' सुविधा तयार. गाळे उपलब्ध.
- मोठ्या गुंतवणुकदारांना त्यांचे उद्योग सुरू करण्यासाठी 'उद्योग मित्र' संकल्पना राबवण्याचा निर्णय.
- नव्या उद्योगांसाठी राज्यात ४० हजार एकर जमीन राखीव. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ लॅन्डबँक तयार करणार.
- उद्योग उभारणीसाठी भाडेतत्वावर जमिनीची उपलब्धता. कमी कालावधीसाठी लीजवर जमिनी उपलब्ध.
- मुख्यमंत्री रोजगार योजना नोव्हेंबर, २०१९ पासून लाभार्थी निवडीची प्रक्रिया सुरू.

आतापर्यंत ३८१७ घटक मंजूर. २० ते २२ हजार रोजगार निर्मिती. पुढील पाच वर्षांमध्ये तरुण व नव उद्योजकांसाठी एक लाख घटक. ८ ते १० लाख रोजगार निर्मितीचे लक्ष्य.

## निर्यात प्रचालन परिषदेची स्थापना

- महाराष्ट्रातून या वर्षी जवळपास ८१ हजार कोटींची माहिती तंत्रज्ञान घटकाद्वारे निर्यात. ४ नवीन माहिती तंत्रज्ञानाचे विशेष आर्थिक क्षेत्र (एसईझेड) आणि दोन नवीन फ्री ट्रेड वेअर हाऊसिंग झोन विकसित होत आहेत. त्यामध्ये सुमारे ३ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक.
- सूक्ष्म, लघू व मध्यम उद्योगासाठी स्मॉल इंडस्ट्रिज डेव्हलपमेंट बँक ऑफ इंडिया (SIDBI) सोबत सामंजस्य करार.
- राज्यात महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्रामार्फत (एमसीईडी) सुशिक्षित उमेदवारांना प्रशिक्षण देण्याचा नावीन्यपूर्ण कार्यक्रम. महिला, अनुसूचित जाती / अनुसूचित जमाती अशा दहा हजार जणांना उद्योजक बनण्याचे प्रशिक्षण.
- या प्रशिक्षणार्थींना शासनाच्या वेगवेगळ्या कर्ज योजनांमधून (जसे मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम, जिल्हा उद्योग केंद्र कर्ज योजना) वित्तीय साहाय्य मिळणार. या योजनेला जानेवारी २०२० मध्ये प्रतिष्ठेचे 'स्कॉच अॅवॉर्ड-२०२०' हे पारितोषिक मिळाले.
- महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्रामार्फत ऑनलाइन प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत १४०० महाविद्यालयांसोबत सामंजस्य करार.

## कोविड काळात उद्योगवाढीला चालना

- कोविड-१९ महामारीतील स्थलांतरामुळे उद्योगांना आवश्यक मनुष्यबळ मिळण्यासाठी व स्थानिकांना रोजगाराची संधी उपलब्ध करून देण्यासाठी 'महाजॉब्स' पोर्टल सुरू. सुमारे २ लाख व्यक्तींची पोर्टलवर नोंदणी.
- लॉकडाऊन काळात परमिशन पोर्टलद्वारे उद्योग सुरू करण्यासाठी ऑनलाइन परवानग्या. कर्मचारी/कामगार वाहतुकीसाठी ऑनलाइन पद्धतीने पास वितरण. या पोर्टलचा लाभ घेऊन राज्यात ६६ हजारांपेक्षा जास्त उद्योग कार्यान्वित. सुमारे १६ लाख कामगार पुन्हा कामावर रुजू झाले.
- औरंगाबाद येथे २५० खाटांच्या कोविड केअर सेंटरच्या उभारणीत उद्योग विभागाचा पुढाकार.
- लॉकडाऊन कालावधीत विभागामार्फत मोफत अन्नधान्यांचे वितरण, सामाजिक दायित्वांतर्गत व्हेंटिलेटर्सचे वाटप.



# कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विकास

- जिल्ह्याजिल्ह्यांमध्ये आयोजित केलेले ऑनलाइन रोजगार मेळावे व इतर उपक्रमांमधून जानेवारी ते ऑक्टोबर २०२० पर्यंत राज्यात १ लाख ४८ हजार ३४३ बेरोजगारांना मिळाला रोजगार.
- महास्वयम वेबपोर्टलवर उद्योजक व उमेदवारांसाठी ऑनलाइन सुविधा उपलब्ध. उमेदवारांना रोजगारसंबंधी ऑनलाइन समुपदेशन. ५ हजार प्रशिक्षण केंद्रांचे महास्वयम पोर्टलवर जीआयएस मॅपिंग. त्यामुळे प्रशिक्षण केंद्राची अचूक व वास्तविक माहिती मिळणे शक्य.
- कंपलसरी नोटिफिकेशन ऑफ व्हॅकेन्सी ॲक्ट अधिनियमाची प्रभावी अंमलबजावणी केल्याने आणखी ४० हजार उमेदवारांना नोकरी उपलब्ध.



- 'कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विकास' असे विभागाचे नामकरण.
- महाराष्ट्र राज्य व्यवसाय शिक्षण परीक्षा मंडळाचे नाव महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास परीक्षा मंडळ करण्याचा निर्णय.
- महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित यांच्याकडे अनुकंपा तत्त्वावर नियुक्त करावयाच्या उमेदवारांना आयटीआयमध्ये तारतंत्री म्हणून प्रशिक्षण देण्याची व्यवस्था.
- राज्यात अर्थसाहाय्यित, स्वयंअर्थसाहाय्यित तत्त्वावर कौशल्य विद्यापीठांची स्थापना करण्याच्या अनुषंगाने समितीची स्थापना.
- स्किल इंडिया पोर्टलवर सर्व शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांची प्रशिक्षण संस्था म्हणून नोंदणी.
- आयटीआयमधील कर्मचाऱ्यांच्या बदल्या ऑनलाइन पद्धतीने.
- व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयामार्फत प्रवेश प्रक्रिया सुलभ करण्याकरिता महाआयटीआय हे मोबाइल ॲप्लिकेशन विकसित.

- संचालनालयामार्फत ग्रीन आयटीआय संकल्पना.
- नॅशनल अॅप्रेंटिस प्रोग्रॅममध्ये ७० हजार विद्यार्थ्यांना शिकाऊ उमेदवार म्हणून संधी. ही कामगिरी देशात सर्वोत्तम.
- संचालनालयाकडून जीआयएस बेस (GIS Based DVET HRMS) मोबाइल ॲप्लिकेशन तयार. राज्यातील सर्व अधिकारी, कर्मचाऱ्यांना त्यांची दैनिक हजेरी नोंदवणे शक्य.
- महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटीमार्फत महाराष्ट्र स्टार्टअप विक २०२० चे आयोजन. २४ उत्कृष्ट स्टार्टअप्स सन्मानित.
- केंद्र सरकारने जाहीर केलेल्या राज्यांच्या स्टार्टअपमध्ये महाराष्ट्र लिडर.
- केंद्रीय वाणिज्य व उद्योग मंत्रालयाच्या व्यापार आणि उद्योग संवर्धन विभागाच्यावतीने राज्यांच्या स्टार्टअप संस्थांसाठीच्या साहाय्यक कामगिरीच्या क्रमवारीत महाराष्ट्राचा नेतृत्व श्रेणीत (लिडर्स) देशात दुसरा क्रमांक.
- राज्याला स्टार्टअप सुधारणांच्या श्रेणीमध्ये अन्य तीन स्थाने.
- स्टार्टअप सुधारणांमध्ये नवीन उद्योजक तयार करणे, नावीन्यपूर्ण विस्तार करणे, जनजागृती व प्रचार या तीन वेगवेगळ्या निकषांवरही या निकालात उत्तम गुण मिळवून महाराष्ट्राची बाजी.
- नावीन्यता सोसायटीतर्फे स्टार्टअप्स, उद्योजकांना मार्गदर्शन करण्याकरिता विविध वेबीनार्स व व्हर्च्युअल मेन्टरिंग सत्राचे आयोजन.
- विभागीय व जिल्हास्तरीय कौशल्य विकास समित्यांचे पुनर्गठन.
- औद्योगिक आस्थापनांच्या मागणीनुसार प्रशिक्षण व रोजगाराच्या अधिकाधिक संधी उपलब्ध होण्यासाठी इंडस्ट्रीज असोसिएशनच्या सहकार्याने कौशल्य विकास कार्यक्रम राबवण्यासाठी प्राथमिक कृती आराखडा तयार.



- शासनाच्या इतर विभागांशी समन्वय ठेऊन कौशल्य व रोजगार क्षमता वृद्धिंगत करण्यासाठी प्रयत्न.
- राज्यातील सर्व जिल्ह्यांचा मायक्रो लेवल स्कील गॅप स्टडी अहवाल तयार.
- अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळामार्फत नोव्हेंबर २०१९ ते ऑक्टोबर २०२० या काळात लाभार्थ्यांना व गटांना एकूण ४३ कोटी ५४ लाख ८३ हजार ५५२ एवढ्या रकमेचे अर्थसाहाय्य.
- विधवा, परित्यक्त्या, घटस्फोटित महिलांना कौशल्य विकास प्रशिक्षणाद्वारे स्वयंरोजगार उपलब्ध करून देण्यासाठी एका विशेष योजनेची अंमलबजावणी.
- इयत्ता दहावी व बारावी उत्तीर्ण न होऊ शकलेल्या विद्यार्थ्यांकरिता कौशल्य सेतू कार्यक्रम योजनेची अंमलबजावणी.



- २०२०-२१ पासून पूर्व व्यावसायिक अभ्यासक्रम व अधिक २ स्तरावरील द्विलक्षी व्यवसाय अभ्यासक्रमाच्या नवीन संस्था व अधिकच्या तुकड्यांना कायमस्वरूपी विनाअनुदानित तत्त्वावर व्यवसाय अभ्यासक्रम सुरू करण्यास मान्यता.
- नॅशनल स्किल क्वॉलिफिकेशन फ्रेमवर्कप्रमाणे माध्यमिक स्तरावरील इयत्ता नववी व इयत्ता १० वी पूर्व व्यवसाय अभ्यासक्रम व द्विलक्षी व्यवसाय विषयासंदर्भात धोरणांचा अभ्यास करण्यासाठी समितीची स्थापना.
- कौशल्य विकास परीक्षा मंडळ अधिनियम तयार करण्यासाठी समितीची स्थापना.
- राज्यातील सर्व औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये इन्स्टिट्यूट मॅनेजमेंट कमिटी स्थापन करण्याचा निर्णय.

## कोविड काळात दिलासा

- लॉकडाऊनच्या काळात ऑनलाइन रोजगार मेळावे व इतर उपक्रमांमधून १ लाख १५ हजार ९२८ बेरोजगारांना रोजगार.
- वैद्यकीय क्षेत्रात कौशल्य प्रशिक्षण घेतलेल्या सुमारे १० हजार ८१५ युवकांच्या याद्या कोविड–१९ कालावधीत सर्व आयुक्त, मनपा आयुक्त, जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी–जिल्हा परिषद यांना नियुक्तीसाठी सुपुर्द.
- महाराष्ट्र राज्य नावीन्यता सोसायटीमार्फत सीएसआर देणगी समन्वयाकरिता काम. कॉर्पोरेटर्स आणि खासगी देणगीदारांकडून ५० कोटी रुपयांपेक्षा जास्त मदत मिळूवन दिली.
- राज्यातील विविध रुग्णालयांमध्ये विविध उपकरणांची आवश्यकता. प्रामुख्याने पीपीई कीटस, एन ९५ मास्क, ३ प्लाई मास्क, व्हेंटिलेटर्स यांचा समावेश. सीएसआरमधून हे साहित्य मिळवण्यासाठी समन्वय.
- स्थलांतरित लोक, दैनंदिन मजुरी करणारे, झोपडपट्टीवासीय, कन्टेन्मेंट झोनमधील नागरिक तसेच कामगारांना अन्न पुरवणे यांसारख्या कामात समन्वय करण्यासाठी नावीन्यता सोसायटीमार्फत ऑपरेशन धैर्य.



- नावीन्यता सोसायटीमार्फत इंडियन ऑईल कॉर्पोरेशन लि. व इंडियन ह्युम पाईप कंपनी लि. यांच्या सहकार्यातून जे.जे. हॉस्पिटलमध्ये कोरोना चाचणी प्रयोगशाळेची स्थापना.
- स्थलांतरित कामगारांच्या समस्येवर लक्ष केंद्रित करून नावीन्यता सोसायटीमार्फत युनिसेफच्या मदतीने जीवनरथ उपक्रमाची अंमलबजावणी.
- श्रमिक रेल्वे तसेच एसटी बसेसने प्रवास करणाऱ्या कामगारांच्या कुटुंबीयांना १.५ कोटी रुपयांपर्यंतच्या पौष्टिक अन्नाची उपलब्धता.

# कामगार

- टाळेबंदी काळात मदतीचा हात.
- लॉकडाऊन काळात नोंदणीकृत असलेल्या बांधकाम कामगारांना दोन टप्प्यात ५ हजार रुपयांचे आर्थिक साहाय्य.
- महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कल्याणकारी मंडळामार्फत पहिला दोन हजार रुपयांचा हप्ता सुमारे ९ लाख २५ हजार बांधकाम कामगारांना, तर दुसरा हप्ता सुमारे ९ लाख २५ हजार बांधकाम कामगारांना देण्यात आला. यासाठी मंडळाकडून एकूण ४६२.६० कोटी रुपयांहून अधिक रकमेचे वाटप.
- माथाडी कामगारांना ५ हजार रुपयांपर्यंत आर्थिक मदत. २६ माथाडी मंडळातील सुमारे ७५ हजार माथाडी कामगारांना ३१ कोटी रुपयांची आर्थिक मदत.



- सुरक्षा रक्षकांना अतिरिक्त प्रवास भत्ता देण्यास मान्यता. ९ सुरक्षा रक्षक मंडळातील २४,१७० सुरक्षा रक्षकांना सुमारे ७ कोटी रुपये अदा.
- लॉकडाऊन नंतर 'मिशन बिगीन अगेन' अंतर्गत उद्योग व्यवसाय सुरू. यामुळे कारखान्यांना १२ तासांच्या २ पाळ्यांमध्ये काही अटींच्या अधीन राहून कारखाने चालवण्यास परवानगी.

- कारखाने व आस्थापनामध्ये काम करणाऱ्या कामगारांना लॉकडाऊन काळात वेतन अदा न करणे, कामावरून कमी करणे अशा तक्रारींचे निराकरण करण्यासाठी नियंत्रण कक्ष स्थापन.
- लॉकडाऊन काळात मुंबई, पुणे, ठाणे आणि नागपूर येथील सुमारे ५३० बांधकामाच्या ठिकाणी अडकलेल्या ८२ हजार कामगारांना भोजन.
- लॉकडाऊन काळात वेतनापासून वंचित ठेवण्यात आलेल्या २५ हजारांपेक्षा जास्त कामगारांना सुमारे ४८ कोटी रुपये लाभ मिळाला.
- कोविड –१९ परिस्थितीमुळे बाष्पक मालकांना बाष्पकांच्या दहा वर्षानंतरच्या उघड्या स्वरूपातील निरीक्षणामध्ये (बेअर इन्स्पेक्शन) एक वर्ष सूट.
- कोविड–१९ पार्श्वभूमीवर बॉयलर ड्रॉईंग्जला मान्यता देण्यासाठी 'नवीन ऑनलाइन प्रणाली' संकेतस्थळावर उपलब्ध.

# रोजगार हमी

- महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये ग्रामपंचायतीच्या लोकसंख्येच्या प्रमाणात नवीन सिंचन विहिरींची कामे सुरू करण्याचा निर्णय; यामुळे सिंचन विहिरींची मर्यादा ५ वरून २० पर्यंत वाढवण्याचा निर्णय.
- निसर्ग चक्रीवादळामुळे कोकण विभागातील नुकसानग्रस्त फळबागांचे रोजगार हमी योजनेशी निगडित फळबाग योजनेंतर्गत पुनर्लागवड व पुनरुज्जीवन लागवड कार्यक्रम हाती घेण्याचा निर्णय. २०२०–२०२१ करिता ५० कोटी रुपयांच्या निधीची तरतूद.



## कोविड काळात दिलासा

- कोविड–१९च्या प्रादुर्भावामुळे निर्माण झालेल्या असाधारण स्थितीत मजुरांना दिली कामे. राज्यात या काळात ५५,११८ कामांवर, ७,०४,७३२ मजुरांना रोजगार उपलब्ध.

# कायदा
# व
# सुव्यवस्था

# गृह

- पोलीस शिपायांची सुमारे १२ हजार ५२८ रिक्त पदे भरण्याचा ऐतिहासिक निर्णय.
- महिला व बालकांवर होणाऱ्या अत्याचाराच्या घटनांना आळा घालण्याच्या उद्देशाने आंध्रप्रदेशमध्ये करण्यात आलेल्या दिशा कायद्याच्या धर्तीवर महाराष्ट्रामध्ये शक्ती हा नवीन कायदा करणार. त्यादृष्टीने सीआरपीसी (CRPC), आयपीसी (IPC), व पोक्सो (POCSO) या विद्यमान कायद्यातील शिक्षा अधिक कठोर करणार. यासाठी अनन्यसाधारण न्यायालय प्रस्थापित करणार.
- राज्यात तपासासाठी सी.बी.आय. (CBI) ला राज्य शासनाची पूर्व परवानगी घेणे आता आवश्यक.
- कोरेगाव भीमा प्रकरणातील ६४९ पैकी ३४८ गुन्हे. मराठा आंदोलनातील ५४८ पैकी ४६० गुन्हे आणि नाणार आंदोलनातील ३ गुन्हे मागे घेण्यात आले.
- राज्यातील सर्व पोलीस स्टेशनमध्ये सीसीटीव्ही बसवण्याच्या कामाला सुरुवात.
- चाईल्ड पोर्नोग्राफी विरोधात ब्लॅकफेस नावाने मोहीम. गुन्हेगारांवर कठोर कारवाईचे निर्देश.
- मीरा–भाईंदर, वसई–विरार पोलीस आयुक्तालय सुरू करण्यात आले.
- राज्याचा सागरी किनारा सुरक्षा अधिक भक्कम व्हावी, या हेतूने पोलीस दलासाठी २३ मिटर लांबीच्या वेगवान व अत्याधुनिक अशा ६ नवीन बोटी घेण्यात येणार.
- लॉकडाऊनच्या काळात वाढलेल्या घरगुती हिंसाचार आणि महिला अत्याचारांच्या तक्रारींची गंभीर दखल. कठोर कारवाई करण्याचे निर्देश.
- कुसडगाव, ता.जामखेड, जि.अहमदनगर व वरणगाव, जि.जळगाव येथे राज्य राखीव पोलीस बल गट निर्माण करण्यास मान्यता. तसेच काटोल येथे एसआरपीएफ बटालियन अंतर्गत पहिल्या महिला बटालियनची स्थापना करण्यास तत्वत: मान्यता.
- साहाय्यक उपनिरीक्षक ते पोलीस उपनिरीक्षक पदांवरील पदोन्नतीचा प्रलंबित विषय मार्गी. १०६६ जणांना पदोन्नतीचा लाभ.
- मुंबई मरीन ड्राईव्ह येथे सुरक्षेच्या दृष्टीने गस्तीकरिता पोलिसांसाठी सेग–वे प्रणालीची सुरुवात. ५० सेल्फ बॅलेसिंग इलेक्ट्रिक स्कुटरचे वाटप.





## कोविड काळात दिलासा

- कोविड संसर्गामुळे मृत्यू झाल्यास कर्तव्यावरील पोलीस अधिकारी, कर्मचारी यांच्या कुटुंबास ५० लाखांचे सानुग्रह अनुदान.
- राज्य पोलीस दलातील अधिकारी व कर्मचाऱ्यांचे कोविड-१९ मुळे निधन झाल्यास सरकारी निवासस्थाने त्यांच्याकडेच ठेवण्याची मुभा.
- कोरोना संसर्ग तुरुंगात होऊ नये, म्हणून जवळपास ११ हजार कैद्यांची तात्पुरत्या जामिनावर (पॅरोल) सुटका.
- पोलीस अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात कोविड सेंटर स्थापन.
- महाराष्ट्र पोलीस कुटुंब योजनेंतर्गत राज्यातील नामांकित रुग्णालयात कोविड-१९ साठी रोकडविरहित उपचार.

# विधी व न्याय

- 'नॅशनल मिशन फॉर सेफ्टी ऑफ वुमन' अंतर्गत बलात्कार व पॉक्सो (POCSO) कायद्यांतर्गतची प्रलंबित प्रकरणे चालवून त्वरित निकाली काढण्यासाठी राज्यात १३८ विशेष जलदगती न्यायालये स्थापन करण्यास मान्यता.



- १४ कौटुंबीक न्यायालयांपैकी आतापर्यंत १२ न्यायालये कार्यान्वित. त्यापैकी सांगली, यवतमाळ, बीड, भंडारा ही न्यायालये नोव्हेंबर २०१९ ते ऑक्टोबर २०२० या कालावधीत कार्यान्वित.
- ठाणे येथे १ अतिरिक्त कौटुंबिक न्यायालय स्थापन करणे व त्याकरिता न्यायाधीश व साहाय्यक कर्मचारी यांची अस्थायी पदे निर्माण करण्यास मान्यता.
- रत्नागिरी जिल्ह्यातील चिपळूण व गुहागर या महसुली तालुक्यांकरिता चिपळूण येथे अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालय सुरू.
- अंबड, जिल्हा जालना येथे जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालय आणि दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर स्थापन करण्यास मान्यता.

# संरचनात्मक

# सार्वजनिक बांधकाम

- महाराष्ट्र समृद्धी महामार्गाचे 'हिंदु हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्ग' असे नामकरण करण्याचा निर्णय. या प्रकल्पासाठी विविध वित्तीय संस्था तसेच महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ आणि नागपूर मुंबई सुपर कम्युनिकेशन एक्सप्रेस वे लि. यांच्यातील वित्तीय करारांच्या नोंदणीसाठी मुद्रांक शुल्क आकारणीमध्ये सूट. महामार्गाच्या भागभांडवलापोटी ३५०० कोटी रुपयांची अतिरिक्त तरतूद.



- राज्यातील आशियाई विकास बँक अर्थसाहाय्यित रस्ते विकास प्रकल्पांच्या (२% पेक्षा कमी व्याज दराने व १,७५० कोटी रुपयांची कामे) कामांना मंजुरी व सुरुवात.
- ३२५० कोटी रुपयांचे टप्पा १ चे फेज दोन व तीनचे काम सुरू होण्याचे प्रस्तावित. दुसऱ्या व तिसऱ्या टप्प्यासाठी १००० मि.डॉलरचे कर्ज घेऊन २५०० कि.मी.चे नवीन रस्ते प्रस्तावित.
- अतिवृष्टीमुळे खराब झालेल्या रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी २६३५ कोटींचे पॅकेज.
- नाबार्डच्या अर्थसाहाय्यातून ग्रामीण भागातील रस्त्यांवरील पुलांची कामे करण्यास प्राधान्य. नाबार्ड २६ मध्ये ९३० कोटींची नवीन कामे प्रस्तावित.
- केंद्रिय रस्ते निधी अंतर्गत १२०० कोटी रुपयांची नवीन कामे प्रस्तावित.
- कोकणच्या विकासाला गती देणारा अत्यंत महत्त्वाचा मुंबई–गोवा चार पदरी सागरी काँक्रीट मार्ग उभारणार.
- न्यायालयीन प्रकरणांचे संनियंत्रण करण्यासाठी संगणकीय प्रणाली विकसित.
- राज्यातील राष्ट्रीय महामार्ग प्रकल्पाच्या भूसंपादनासाठी नगरपंचायत व क वर्ग नगरपालिका क्षेत्रातील भूधारक आणि ग्रामीण क्षेत्रातील भूधारकांना देण्यात येणाऱ्या मोबदल्यामधील तफावत दूर. तसेच नव्याने झालेल्या अविकसित नगरपंचायत व क वर्ग नगरपालिका क्षेत्रातील भूसंपादनासाठी ग्रामीण भागाप्रमाणेच वाजवी मोबदला.

- लोकप्रतिनिधींना लागणारे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या ना देय प्रमाणपत्रासाठी एक खिडकी योजना कार्यान्वित.
- पुलांच्या देखभाल, दुरुस्ती व पुनर्निर्माणासाठी नियमावली विकसित.
- मार्च २०२० च्या अर्थसंकल्पात प्रथमच मोठ्या प्रमाणात २९ कार्यालयीन व १९ अनिवासी इमारतीच्या दुरुस्ती आणि बांधकामासाठी ६५० कोटी रुपयांचा निधी अर्थसंकल्पित करण्यात आला.
- सार्वजनिक बांधकाम विभागाच्या विद्युत विभागाचे बळकटीकरण.

## कोविड काळात दिलासा



- कोरोनाविरुद्धच्या वैद्यकीय उपचारासाठी ४३ हजार १४० खाटांची सुविधा असलेल्या १२ हजार २८५ खोल्यांचे बांधकाम. त्यामध्ये ७६२ वॉर्ड, ऑक्सिजन सुविधा असलेल्या १०६३ खाटांचा समावेश.
- नागपूरमध्ये फक्त ३० दिवसांत १२८० खाटांच्या सुसज्ज रुग्णालयाची उभारणी. सर्वसाधारण उपचारासाठी, कोविड रुग्णांसाठी अतिदक्षता विभाग, इत्यादी सुविधा.
- पुण्यातील ससून रुग्णालयाच्या इमारतीचे कोविड रुग्णालयात रुपांतराचे काम पूर्ण करून हस्तांतरित करण्यात आला यामध्ये ५० खाटांचे अतिदक्षता (आयसीयू) कक्ष व १०० आयसोलेशन खाटांचे वॉर्डस तयार करण्यात आले. एकंदरीत ४७५ खाटा बांधकाम विभागामार्फत पुरविण्यात आल्या आहेत. तसेच अतिरिक्त ३०० खाटांचा पुरवठा आदेश देण्यात आले असून एकूण ८०० खाटांची सोय येथे होणार आहे.
- ससूनमधील युद्धस्तरावर सांडपाणी यंत्रणा, ऑपरेशन थिएटर, आयसीयू कक्ष, मायक्रोबायोलॉजी प्रयोगशाळेत कोरोना लॅब तयार करण्यात आले. तसेच सेंट्रल स्टराइल सप्लाय सिस्टीम, बायोमेडिकल च्युटस् इत्यादी कामेही पूर्ण.
- कोविड काळात ससून रुग्णालयात मेडिकल गॅस पाईपलाइनचे काम विक्रमी ११ दिवसात पूर्ण.
- १३ जिल्ह्यांत आरोग्यविषयक १६ प्रयोगशाळांची उभारणी सुरू. काही प्रयोगशाळा पूर्ण.

# नगरविकास

- नागरी भागातील सांडपाण्यावर १०० टक्के प्रक्रिया करणे सर्व नागरी स्थानिक संस्थांना बंधनकारक करण्याचा निर्णय.
- सर्व महानगरपालिका, नगरपरिषद क्षेत्रामध्ये २०२४ पर्यंत १०० टक्के मलप्रक्रिया क्षमता प्रकल्प निर्माण करण्याचे निश्चित. बृहन्मुंबईसाठी ही मर्यादा २०२८ अशी आहे.
- कल्याण–डोंबिवली मनपा हद्दीतून वगळलेल्या १८ गावांची नगर परिषद.
- महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियमात सुधारणा करण्याचा निर्णय.
- भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे इंदू मिल येथील आंतरराष्ट्रीय दर्जाचे भव्य स्मारक उभारताना पुतळ्याची ऊंची वाढवून पादपीठ ३० मीटर (१०० फूट) ऊंच व पुतळा १०६.६८ मीटर (३५० फूट) वाढवण्यास मान्यता देण्यात आली आहे. म्हणजेच आता पुतळा १३६.६८ मीटर ऊंचीचा (४५० फूट) करण्याचा निर्णय; स्मारक उभारण्यासाठी मुंबई महानगर विकास प्राधिकारण ही कार्यान्वयीन यंत्रणा.



### इमारत बांधकामासाठी नियम शिथील

- मुंबई वगळता राज्यभरात एकात्मिक विकास नियंत्रण नियमावली (युनिफाइड डीसीआर)
- एसआरए, क्लस्टर आदी पुनर्विकास योजना राज्यभरात लागू
- १५० चौमीपर्यंतच्या भूखंडधारकांना बांधकाम परवानगीची आवश्यकता नाही. यामुळे चटईक्षेत्र निर्देशांकाच्या (एफएसआय) गैरवापराला चाप बसणार.

- नागरी स्वच्छता अभियानातील कामगिरीत महाराष्ट्राचे सातत्य. स्वच्छ सर्वेक्षण २०२० च्या १२ राष्ट्रीय पुरस्कारांपैकी सर्वाधिक ४ पुरस्कार राज्याला. मोठ्या राज्यांच्या मानांकनात महाराष्ट्र दुसरा.
- नागरी भागातील पायाभूत सुविधा प्रकल्पांच्या गुणात्मक अंमलबजावणी सक्षम नगरपरिषद प्रशासन संचालनालयाच्या मुख्यालय, विभागीय व जिल्हास्तरीय आकृतिबंधात सुधारणा करण्याचा निर्णय.

- राज्यातील सर्व महानगरपालिका, नगरपालिका, नगरपंचायती, क्षेत्राचे विकास आराखडे तयार करण्यासाठी खासगी सल्लागारांची नियुक्ती.
- महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीनुसार महानगरपालिकेच्या एका प्रभागातून एका सदस्याची निवड (एक सदस्य प्रभाग पद्धत) करण्याचा निर्णय.
- महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियमातील सुधारणेनुसार नगरपरिषद प्रभागातून एका सदस्याची निवड (एक सदस्य प्रभाग पद्धत) करण्याचा निर्णय.
- महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम सुधारणेनुसार नगराध्यक्षांची निवड नगरसेवकांमधून करण्याचा निर्णय.
- सेंटर ऑफ एक्सलन्सच्या टप्पा १ आणि टप्पा २ च्या विकासासाठी सिडकोकडून १६५.४७ कोटींच्या आकस्मिक आणि १७९ .५३ कोटी आकस्मिक परिस्थितीसह खर्चास मान्यता.
- ठाण्याच्या क्लस्टर योजनेला अंतिम मंजुरी.
- महापालिका निवडणुकांमधील पॅनल पद्धत रद्द.

## नागपूर शहर व परिसरात वातानुकूलित ब्रॉडगेज मेट्रो ट्रेन्स



- नागपूर मेट्रो मार्गिकेला उपमार्ग सेवेने (फिडर सर्व्हिस) जोडण्यासाठी नागपूर शहर आणि परिसरातील भारतीय रेल्वेच्या मार्गांवर सध्या असलेल्या पॅसेंजर ट्रेन्स ऐवजी रेल्वे आधारित आधुनिक वातानुकूलित बी.जी (ब्रॉडगेज) मेट्रो ट्रेन्स सुरू करण्यासाठी महामेट्रोच्या सुमारे ३३३ कोटी रुपये खर्चाच्या प्रस्तावास तत्त्वत: मान्यता.
- या प्रकल्पाच्या अंमलबजावणीकरिता राज्य शासनाचे साहाय्य म्हणून २१.३० कोटी रुपयांची रक्कम बिनव्याजी दुय्यम कर्ज साहाय्य स्वरूपात देण्यास तत्वत: मान्य.
- या प्रकल्पामुळे नागपूर शहराला जोडणाऱ्या शहरांची (रामटेक, वर्धा, भंडारा, नरखेड) रेल्वे प्रवासी वाहतूक गतिमान होण्यास मदत होईल त्यामुळे सहाजिकच रस्ते वाहतुकीवरील ताण कमी होण्यासही मदत.
- या प्रकल्पाचा खर्च नागपूर मेट्रो रेल्वे टप्पा १ साठी केएफडब्ल्यू या वित्तीय संस्थेने मंजूर केलेल्या कर्ज साहाय्यातून बचत झालेल्या सुमारे ३०५ कोटी रुपयांमधून करण्याचे प्रस्तावित.

## मुंबई नागरी परिवहन प्रकल्प ३

- मुंबई नागरी परिवहन प्रकल्प टप्पा ३ (एमयुटीपी III) या १०,९४७ कोटींचा प्रकल्प पूर्णत्व किमतीच्या प्रकल्पास केंद्रीय मंत्रिमंडळाची व रेल्वे मंत्रालयाचीही मान्यता.
- एमयूटीपी प्रकल्प ३ हा भारतीय रेल्वेच्या सहभागाने मुंबई रेल्वे विकास महामंडळाकडून मुंबई नागरी परिवहन प्रकल्प टप्पा १ व टप्पा २ च्या धर्तीवर राबवण्यास मान्यता. प्रकल्प खर्चात राज्य शासनाचा हिस्सा ५० टक्के.



- **एमयूटीपी प्रकल्प टप्पा ३ मध्ये एकूण सहा घटकांचा समावेश** : पनवेल–कर्जतदरम्यान नवीन उपनगरीय रेल्वे मार्गिका टाकणे (रेल्वे मार्गाचे दुपदरीकरण), ऐरोली–कळवादरम्यान उन्नत रेल्वे मार्ग बांधणे, विरार–डहाणूदरम्यान रेल्वे मार्गाचे चौपदरीकरण करणे (तिसरी आणि चौथी मार्गिका टाकणे), नवीन रेल्वे गाड्या खरेदी करणे (५६५ रेल्वे डबे), मध्य व पश्चिम रेल्वे मार्गाच्या मध्य विभागात ट्रेस पास कंट्रोल, तांत्रिक साहाय्य.
- एमयुटीपी ३ प्रकल्प अंमलबजावणी संदर्भात मुंबई रेल्वे विकास महामंडळ राज्य शासन, एमएमआरडीए व सिडको यांच्यादरम्यान वित्तीय करारनामा.

## कोविड काळात दिलासा

- कोविड प्रादुर्भावाची परिस्थिती विचारात घेऊन डिसेंबर २०२० अखेरपर्यंत मुद्रांक शुल्क अधिभार जो अर्धा टक्का होता तो शून्य टक्के करण्यात आला.
- कोरोनावरील उपचारांसाठी राज्यातील प्रमुख शहरांमध्ये, विशेषतः मुंबई आणि एमएमआर प्रदेशात आरोग्याच्या जम्बो सुविधांची निर्मिती.
- मुंबई पालिकेचा भांडवली मूल्य सुधारणा करण्याचा कालावधी वाढवला. २०२०–२१ मध्ये सुधारित होणारे इमारत किंवा जमिनीचे भांडवली मूल्य आता २०२१–२२ मध्ये सुधारित करण्याचा निर्णय. लोकांचे दैनंदिन रोजगार बंद झाल्याने सर्व प्रकारच्या आर्थिक व्यवहारांवर विपरित परिणाम झाल्याचे दिसून आल्याने हा निर्णय.

# गृहनिर्माण

## धोकादायक इमारतीतील रहिवाशांना दिलासा

- मुंबई शहरातील उपकरप्राप्त इमारतीतील लाखो रहिवाशांना दिलासा देण्यासाठी म्हाडा अधिनियमात सुधारणा. यामुळे मुंबईतील जीर्ण व धोकादायक उपकरप्राप्त इमारतीच्या मालक/नियोजित सहकारी गृहनिर्माण संस्था/म्हाडा यांना विहित कालावधीत पुनर्विकास करण्याची टप्प्याटप्प्याने मिळणार संधी.
- तीन वर्षात भाडेकरू रहिवाशांना घर उपलब्ध करून देण्याचे म्हाडावर बंधन.
- पुनर्विकासाकरिता नवीन मार्गदर्शक सूचना जारी.
- रहिवाशांच्या आगाऊ भाड्याकरिता एस्क्रो खाते उघडणे, बांधकामावर लक्ष ठेवण्यासाठी दक्षता समिती आदींची तरतूद.


## झोपडपट्टीवासियांसाठी महत्त्वाचे पाऊल

- **सर्वसामान्य गोरगरीब जनतेचे घराचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी मुंबई महानगर क्षेत्रातील (मुंबई शहर वगळता) आठ महानगरपालिका आणि सात नगरपालिका / नगरपरिषद मिळून ठाणे मुख्यालय असलेल्या स्वतंत्र झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाची (बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्र वगळता) स्थापना.**



- म्हाडा वसाहतीचे अभिन्यास मंजुरीकरिता गती देणार.
- चतुर्थ श्रेणी शासकीय कर्मचारी आणि पोलिसांसाठी म्हाडाच्या सोडतीमध्ये प्रत्येकी दहा टक्के घरे राखीव.
- राज्यातील प्रमुख शहरातील झोपडपट्ट्यांना झोपडपट्टी पुनर्वसन योजना लागू करण्यासाठी प्रधान सचिव (गृहनिर्माण) यांच्या अध्यक्षतेखाली अभ्यासगट स्थापन.

- मुंबईतील कामाठीपुऱ्याचा समूह पुनर्विकास म्हाडाच्या माध्यमातून. येथील इमारतींपैकी ७०० इमारती आणि चाळी १०० वर्ष जुन्या व धोकादायक अवस्थेत. या ठिकाणी मुंबईतील सर्वात मोठे व्यापारी केंद्र बनवण्याचा मानस.
- वेश्म (अपार्टमेंट्स) मालकीबाबत प्रतिज्ञापत्र करताना मालकांना कोणतेही अधिकार राहत नाहीत. म्हणून महाराष्ट्र वेश्म मालकी अधिनियम १९७० मध्ये सुधारणा व अपार्टमेंट्स मालकांना किंवा मालकांच्या संघटनेस अपिलाचा अधिकार.



- झोपडपट्टी पुनर्वसन योजनेकरिता आशयपत्र (लेटर ऑफ इंटेंड) जारी केल्यानंतर देकारपत्र (इंटिमेशन ऑफ ॲप्रुव्हल) करिता अर्ज करावा लागत असल्याने बराच कालावधी लागत होता. आता आशयपत्र व देकारपत्र एकाच वेळी देण्यात येतील व आता बांधकाम पूर्णत्वाचे प्रमाणपत्र (सीसी) सात दिवसात दिले जाईल. आशयपत्र मंजुरीच्या प्रस्तावाची तपासणी ६ टप्प्याऐवजी ३ टप्प्यात होईल. त्यामुळे मंजुरीचा कालावधी कमी.
- झोपडपट्टी पुनर्वसन योजनेमध्ये सध्या एलओआय स्तरावर (आशयपत्र) १५ टक्के, सीसी स्तरावर २५ टक्के व सेल सीसी स्तरावर ६० टक्के जमीन अधिमुल्य आकारण्यात येते. आता एलओआय स्तरावर १० टक्के, सीसी स्तरावर १० टक्के व सेल सीसी स्तरावर ८० टक्के याप्रमाणे अधिमुल्य भरण्यास सवलत.
- प्रत्येक झोपडपट्टी पुनर्वसन योजनेत सार्वजनिक आरोग्य केंद्र अनिवार्य.

# परिवहन

## एसटीची मालवाहतूक



- सर्वसामान्य शेतकरी, छोटे उद्योजक, व्यावसायिक, कारखानदार यांच्या मालाची किफायतशीर दराने सुरक्षित व वक्तशीर वाहतूक करण्याच्या उद्देशाने एसटी महामंडळाने व्यावसायिक स्तरावर मालवाहतूक सुरू.
- सध्या एसटीची १०५० मालवाहू वाहने तयार आहेत व येत्या काळात ही संख्या २००० पर्यंत नेण्याचे प्रस्तावित.
- ३१ ऑक्टोबर अखेर या मालवाहू वाहनांद्वारे ४१ हजार फेऱ्यांतून तब्बल २१ कोटी रुपये उत्पन्न.
- सध्या राज्यांतर्गत आंब्याची रोपे, काजूची बोंडे,बी-बियाणे, खते अशा कृषिजन्य पदार्थापासून रंगाचे डबे, लोखंडी पाईप अशा अनेक वस्तूंची मालवाहतूक सुरू.
- राज्य मार्ग परिवहन महामंडळाला थकीत वेतन आणि सहा महिन्याच्या आर्थिक नियोजनासाठी शासनाकडून एक हजार कोटींचे पॅकेज.
- राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या ६०८ बसस्थानकांवर प्रवाशांसाठी माफक दरात दर्जेदार आणि शुद्ध पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्यासाठी नाथजल योजना.
- राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या निवडक ३० जागांवर पेट्रोल आणि डिझेल पंप. पाच जागांवर सीएनजी/एलएनजी पंपाची उभारणी, इंडियन आईल कॉर्पोरेशन यांच्याशी सामंजस्य करार.
- आर्थिक स्रोत निर्माण व्हावा, यासाठी एस.टी. बसेसच्या टायर रिमोल्डिंगसाठी (पुनर्स्थिरीकरण) राज्यभरात महामंडळाचे ९ रिमोल्डिंग प्लांट सुरू. बाजारभावापेक्षा कमी भावात टायर रिमोल्डिंगचे काम.

## प्रवासी माहिती प्रणाली

- या प्रणालीमुळे प्रवाशांना त्यांच्या अपेक्षित एस.टी.चे प्रत्यक्ष ठिकाण कळत आहे
- एवढ्या मोठ्या स्तरावर प्रकल्प राबविणारी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ ही देशातील सर्वात मोठी परिवहन संस्था ठरली.
- महाराष्ट्रातील सर्व लहानमोठ्या बस थांब्यांचे /गावांचे जीपीएस तंत्रज्ञानाद्वारे अक्षांशरेखांशासह स्थान निश्चित करण्याची कार्यवाही.
- मुंबईच्या पश्चिम उपनगरीय रेल्वे मार्गावरील मुंबई सेंट्रल टर्मिनसला नाना शंकरशेठ यांचे नाव देण्यास मान्यता.
- नागपूर – नागभिड या नॅरोगेज रेल्वे मार्गाचे ब्रॉडगेज रेल्वे मार्गात रूपांतर करण्याकरिता राज्य शासनाचा सहभाग देण्याबाबत शासनाच्या आर्थिक सहभागास मान्यता.
- एसटी महामंडळाकडून प्रवाशांसाठी कॅशलेस स्मार्ट कार्ड योजना कार्यान्वित. सुट्ट्या पैशाची चणचण संपल्याने आणि कोविड प्रादुर्भावाच्या काळात शारीरिक अंतराचे पालन करण्यामुळे हे शक्य झाले आहे. कार्डामध्ये १०० रुपयांच्या पटीत ऑनलाइन भरणा करण्याची सुविधा उपलब्ध.

## कोविड काळात दिलासा

- लॉकडाऊन काळात सार्वजनिक वाहतूक बंद असल्याने वाहतूक क्षेत्राला नुकसान भरपाई म्हणून सार्वजनिक आणि माल वाहतूक करणाऱ्या वार्षिक कर भरणाऱ्या वाहनांना एप्रिल ते सप्टेंबर २०२० या सहा महिन्यांसाठी वाहन कर माफी देण्याचा निर्णय.
- कोरोना प्रादुर्भावामुळे राज्य मार्ग परिवहन महामंडळाचा चालक, वाहक, वाहतूक नियंत्रक, साहाय्यक वाहतूक नियंत्रक, सुरक्षा रक्षक यांचा दुर्दैवाने मृत्यू झाल्यास ५० लाख रुपयांचे सानुग्रह अनुदान देण्याचा निर्णय.
- मुंबईत लोकल रेल्वे सेवा मर्यादित स्वरूपात धावत असल्यामुळे बेस्टवर प्रवाशांचा ताण पडत होता. त्यामुळे एस.टी. महामंडळाच्या १ हजार बसेस बेस्टच्या ताफ्यात समाविष्ट.
- मुंबईतील अत्यावश्यक सेवेतील



कर्मचाऱ्यांच्या वाहतुकीसाठी एस.टी. ची सेवा उपलब्ध.



- स्थलांतरित मजुरांना एस.टी. महामंडळाच्या बसेसद्वारे रेल्वेस्टेशनपर्यंत किंवा त्यांच्या राज्याच्या सीमेपर्यंत नेऊन पोहोचवण्यात आले.
- या काळामध्ये ४४ हजार १०६ बसेसद्वारे सुमारे ५ लाख ३७ हजार ५९३ स्थलांतरित मजुरांना त्यांच्या राज्यात जाण्यासाठी महाराष्ट्राच्या सीमेपर्यंत/ रेल्वेस्टेशनपर्यंत मोफत बसची सोय उपलब्ध करून देण्यात आली.
- मध्य प्रदेश, तेलंगणा, गुजरात, छत्तीसगड, कर्नाटक यांसारख्या राज्यांच्या सीमेपर्यंत धावून एस.टी.ने स्थलांतरित कामगारांना त्यांच्या घरी सुखरूप जाण्यास मदत.
- राजस्थान येथील कोटा शहरात शिक्षणासाठी गेलेल्या परंतु लॉकडाऊनमुळे तिथेच अडकून पडलेल्या राज्यातील १४०० विद्यार्थ्यांना ७२ बसेसच्या माध्यमातून आपापल्या घरी सुखरूप पोहचवले.
- ग्रामीण भागातील संशयित कोरोना रुग्णांना जिल्हा रुग्णालयात घेऊन जाण्यासाठी एसटी बसेस उपलब्ध.
- लॉकडाऊनमुळे हंगाम संपण्यापूर्वी पश्चिम महाराष्ट्रात अडकलेल्या १ हजार ऊसतोड मजुरांना ४८ बसेसच्या माध्यमातून त्यांच्या मूळ गावी पोहोचवले गेले.
- अत्यावश्यक सेवेसाठी मुंबई, ठाणे, पालघर, या तीन विभागात कोविड योद्धा म्हणून कार्य केलेल्या २ हजार एस.टी कर्मचाऱ्यांना त्यांच्या वेतनाव्यतिरिक्त ३०० रुपये प्रतिमहा प्रोत्साहन भत्ता देण्यात आला.
- वैद्यकीय कारणास्तव ऑक्सिजनची वाहतूक करणाऱ्या वाहनांना रुग्णवाहिकेचा दर्जा; राज्य परिवहन महामंडळास मालवाहतूक करण्याची परवानगी.

# ऊर्जा

## कृषिपंप वीज जोडण्यांसाठी नवीन धोरण

- लघुदाब वाहिनी, उच्चदाब वाहिनी व सौर कृषिपंप याद्वारे वीज जोडणीचे पर्याय.
- दरवर्षी १ लाख कृषिग्राहकांना सौर कृषिपंपाद्वारे वीज जोडणी देणार.
- सर्व कृषी ग्राहकांना पुढील ३ वर्षात टप्प्याटप्प्याने कायमस्वरूपी दिवसा ८ तास वीज पुरवठा करण्याचे नियोजन.
- कृषी वीज देयक थकबाकी वसुली योजनेंतर्गत कृषिपंपधारकांना वीज देयकांची थकबाकी भरण्यासाठी मूळ थकबाकी व्याज व विलंब आकारामध्ये सवलत देण्यात येणार.
- कृषी ग्राहकांकडून वसुल झालेली रक्कम ग्रामीण भागात वीजेच्या पायाभूत सुविधा व सेवा सुधारण्यासाठी ३३ टक्के ग्रामपंचायत क्षेत्रात, ३३ टक्के जिल्ह्यामध्ये खर्च करणार आणि उर्वरित रक्कम खर्च करण्याचे अधिकार महावितरणला.



- उद्योगांना प्रोत्साहित करण्यासाठी वीज शुल्क ९.३० टक्क्यांवरून ७.५० टक्के इतके कमी करण्याबाबत निर्णय.
- शासकीय वीज कंपन्यांना आर्थिक तरलता राखण्यासाठी २० हजार कोटी रुपये कर्ज उभारणीसाठी शासनाची हमी.
- प्रलंबित कृषिपंप वीज जोडण्या पूर्ण करण्यासाठी उच्च दाब वितरण प्रणाली (एचव्हीडीएस) योजनेसाठी एशियन डेव्हलपमेंट बँकेकडून २,२४८ कोटी रुपये इतके कर्ज उभारण्याचा निर्णय. महावितरण द्वारे २,८०० कोटी रुपये इतकी रक्कम खर्च करण्याची शासन हमी.
- 'महानिर्मिती' कंपनीकडून पर्यावरणपूरक १८७ व ३९० मेगावॅट क्षमतेचे सौर ऊर्जा प्रकल्प स्वबळावर केएफडब्ल्यू या संस्थेकडून कर्ज घेऊन उभारण्याचा निर्णय.
- कोराडी व चंद्रपूर येथील औष्णिक विद्युत केंद्रांमध्ये पर्यावरणपूरक व प्रदूषणमुक्त प्रकल्प बसवण्याचा निर्णय.



- 'महापारेषण' (एसटीयू) कंपनीद्वारे मुंबई शहराच्या भविष्यातील विजेची गरज भागवण्यासाठी विक्रोळी मुंबई येथे ४०० केव्ही, विक्रोळी–खारघर व ४०० केव्ही, कळवा–तळेगाव लिलो वाहिन्या उभारण्याचा निर्णय.
- 'महापारेषण'च्या वाहिन्यांचे परिरक्षण व निरीक्षण करण्यासाठी पारंपरिक तंत्रज्ञानाऐवजी ड्रोन कॅमेरासारख्या आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग करण्यास सुरुवात.
- निसर्ग चक्रीवादळामुळे प्रभावित झालेल्या महावितरणच्या पायाभूत सुविधांची पुनर्स्थापना; विक्रमी वेळेत कामे पूर्ण.
- कार्यक्षम व्यवस्थापन आणि वीजनिर्मिती खर्चात बचत केल्यामुळे परळी येथील तीन वीज निर्मिती संच 'एमओडी'मध्ये नव्याने समाविष्ट. वीज वितरण कंपन्यांकडून 'एमओडी'च्या क्रमवारीनुसार वीजखरेदी.
- अपारंपरिक ऊर्जा निर्मितीस प्राधान्य देण्याहेतू नवीन धोरण आणण्याचा संकल्प. त्यानुसार पर्यावरणपूरक व स्वच्छ ऊर्जा निर्मितीस प्राधान्य देऊन जमिनीवर व जलाशयात तरंगते सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्प उभारणी. पर्यावरण संवर्धनाच्या दृष्टीने नवीन औष्णिक वीज निर्मिती प्रकल्प न उभारण्याचा निर्णय.
- विविध पारंपरिक व अपारंपरिक ऊर्जा स्रोतांसमवेत संकरित प्रकल्पांच्या निर्मितीस प्राधान्य.
- नवीन तंत्रज्ञानावर आधारित वीज निर्मितीस प्रोत्साहन.
- प्रकल्प मान्यतेचे सुलभीकरण.

## कोविड काळात दिलासा

- एकरकमी वीजबील भरलेल्या ग्राहकांना २ टक्के सूट, वीजबील भरण्यासाठी ३ हप्त्यांचा पर्याय, स्थिर आकार उशिरा भरण्याची सवलत देण्यासह वीजबील थकल्याबद्दल कोणाचीही वीजजोडणी कापण्यात आली नाही. वाढीव वीज बिलाच्या तक्रारी वेळेत सोडविण्यासाठी वीज वितरण कंपन्यांना निर्देश.
- महावितरणद्वारे कोविड–१९ कालावधीत अत्यंत प्रभावी समन्वयन करून अत्यावश्यक सेवांसह सर्व क्षेत्रांसाठीचा वीजपुरवठा अखंडपणे व सुरळीत राखण्यात यश.

# पर्यटन

- हॉस्पिटॅलिटी म्हणजेच आदरातिथ्य क्षेत्रासाठी क्रांतिकारी निर्णय. आदरातिथ्य उद्योग सुरू करण्यासाठी ७० परवानग्यांऐवजी आता १० परवानग्या तसेच ९ स्वयं प्रमाणपत्रे लागतील.
- आदरातिथ्य क्षेत्राला उद्योगाचा दर्जा. यामुळे या क्षेत्रातील व्यावसायिकांना उद्योगांसाठीचे सर्व लाभ मिळणार. राज्यातील पर्यटनास चालना मिळण्यास पूरक निर्णय.
- राज्याचे कृषी पर्यटन धोरण जाहीर. शेतकऱ्यांना कृषिपूरक व्यवसाय उपलब्ध होऊन ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना मिळणार.
- कोकणच्या विकासाला चालना देणारे बीच शॅक धोरण जाहीर. स्थानिकांना ८० टक्के रोजगाराची अट. पथदर्शी प्रकल्प म्हणून रत्नागिरी जिल्ह्यातील गुहागर, आरेवारे; सिंधुदुर्ग जिल्ह्यातील कुणकेश्वर, तारकर्ली; रायगड जिल्ह्यातील वर्सोली, दिवेआगार आणि पालघर जिल्ह्यातील केळवा व बोर्डी या आठ किनाऱ्यांवर बीच शॅक्स उभारणार.
- मुंबईत पर्यटन आणि रोजगाराला चालना देण्यासाठी मिल्स कंपाऊंड इत्यादी बिगरनिवासी क्षेत्रात रात्रजीवन (नाईट लाईफ) ला संमती.
- एमटीडीसीमार्फत 'मोटोहोम कॅम्परव्हॅन'चा शुभारंभ. हे एक चालते-फिरते घरच.


मोटोहोम कॅम्परव्हॅन

- राज्याचे कॅराव्हॅन पर्यटन धोरण निश्चित करण्यासाठी प्रक्रिया सुरू.
- राज्याचे साहसी पर्यटन धोरण निश्चित करण्यासाठी प्रक्रिया सुरू.
- एमटीडीसी आणि मुंबई क्रिकेट असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने मुंबईतील वानखेडे स्टेडिअमची सफर करण्यासाठी उपक्रम.
- मुंबई महापालिका मुख्यालय ईमारतीच्या हेरिटेज वॉकसाठी महापालिका आणि एमटीडीसीमध्ये सामंजस्य करार.

- गंगापूर (जि. नाशिक) येथे एमटीडीसी ग्रेप पार्क रिसॉर्ट आणि बोट क्लब सुरू.
- खारघर (नवी मुंबई) येथे एमटीडीसी रेसीडेन्सी पर्यटक संकूल सुरू.
- एमटीडीसीसाठी आता नवीन लोगो. नव्या लोगोमधून महाराष्ट्राच्या संस्कृतीचे दर्शन. या नवीन लोगोचे तसेच नाशिक येथील बोट क्लबचा लोगो, एमटीडीसीच्या फिडबॅक क्यूआर कोडचे अनावरण.
- राज्यातील होम स्टे पर्यटनास चालना देण्याच्या अनुषंगाने एअर बीएनबीसोबत सामंजस्य करार.
- राज्यातील पर्यटनस्थळे, तिर्थक्षेत्रे, कृषी पर्यटन, युनेस्को जागतिक वारसास्थळे, राज्यातील विमानतळे, महामार्ग, महत्त्वाचे हॉटेल्स, रिसॉर्ट्स, न्याहरी-निवास, जिल्हा पर्यटन आदींची माहिती देणाऱ्या 'महाराष्ट्र टुरिझम - समथिंग फॉर एव्हरीवन' या महाराष्ट्र पर्यटन डेटा बँक पुस्तकाचे प्रकाशन.
- 'लंडन आय'च्या धर्तीवर मुंबईत 'मुंबई आय'ची निर्मिती करण्यात येणार.
- मुंबईत आंतरराष्ट्रीय दर्जाचे मल्टिलेव्हल ॲक्वेरिअम (मत्स्यालय) करण्याचा संकल्प.



- गेट वे ऑफ इंडियासह मुंबईतील विविध स्थळांचा पर्यटनदृष्ट्या विकास करण्याचा निर्णय.
- मुंबई शहरातील पर्यटनस्थळे जागतिक पर्यटन नकाशावर आणून देश-विदेशातील पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी तसेच मुंबईत याअनुषंगाने विविध पायाभूत पर्यटन सुविधा निर्माण करण्यासाठी बृहन्मुंबई पर्यटन विकास प्रकल्प राबवण्यात येणार. त्यासाठी समन्वय व संनियंत्रण समितीची स्थापना.
- सिंधुदूर्ग जिल्ह्यातील वेंगुर्ला तालुक्यातील मौ. शिरोडा वेळागर येथे पंचतारांकित पर्यटन केंद्र उभारण्यासाठी ताज ग्रुपच्या मे. इंडियन हॉटेल्स कंपनीला ५४.४० हेक्टर जमीन ९० वर्षाच्या दीर्घ मुदतीच्या भाडेपट्ट्याने देण्याचा निर्णय. यामुळे देशी-विदेशी पर्यटक आकर्षित होऊन कोकणातील पर्यटनाला मिळणार मोठी चालना.
- चंद्रपूर जिल्ह्यातील वन्यजीव पर्यटनास चालना देण्यासाठी थ्रिविंग हॉटेल्स प्रा. लि. सोबत महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचा सामंजस्य करार.

- महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या ताब्यातील शासकीय जमिनींचा आणि मालमत्तांचा पर्यटनदृष्ट्या विकास करण्यासाठी खाजगीकरणाच्या धोरणास तत्वत: मान्यता. पहिल्या टप्प्यात गणपतीपुळे, माथेरान, महाबळेश्वर, हरिहरेश्वर, मिठबाव येथील महामंडळाचे रिसॉर्ट तसेच ताडोबा आणि फर्दापूर (औरंगाबाद) येथील मोकळ्या जमिनींचा विकास करण्यात येईल.
- छत्रपती शिवाजी महाराजांचे सरसेनापती प्रतापराव गुजर यांचे जन्मगाव भोसरे, ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांचे जन्मगाव नायगाव, हत्ती बेट – देवर्जन, श्री क्षेत्र महाबळेश्वर, महाबळेश्वर नगरपालिका क्षेत्र, पाचगणी नगरपालिका क्षेत्र या सहा पर्यटनस्थळांना ब वर्ग पर्यटनस्थळाचा दर्जा.
- वन पर्यटनाला चालना देण्यासाठी पर्यटन आणि वन महामंडळाची समिती गठीत.

## जलसंपदा व लाभक्षेत्र विकास

- बांधकामाधीन सिंचन प्रकल्पाद्वारे १७२.२०१ दशलक्ष घनमीटर पाणीसाठा. १,०४,५८६ हेक्टर सिंचनक्षमता निर्माण. ७ बांधकामाधीन प्रकल्प पूर्ण.
- सिंचनाच्या अनुशेष निर्मूलन कार्यक्रमासाठी १५०० कोटी रुपयांची भरीव तरतूद केली असून त्याद्वारे ३००३३ हेक्टर रब्बी समतुल्य सिंचन अनुशेष दूर करण्यास मदत होणार आहे.
- केंद्र शासनपुरस्कृत बळीराजा जल संजीवनी योजनेत समाविष्ट ४ अनुशेषांतर्गत १ व इतर १ अशा अमरावती प्रदेशातील ६, नक्षलप्रवण गडचिरोली जिल्ह्यातील १ असे एकूण विदर्भातील ७, तर कोकणातील ३ प्रकल्पांना सुधारित प्रशासकीय मान्यता.
- पश्चिमेकडील वाहून जाणारे पाणी दुष्काळग्रस्त मराठवाड्यास देण्याकरिता 'वळण योजना' पूर्ण करण्याच्या कालबद्ध कार्यक्रमाची अंमलबजावणी.



- कालवा सिंचन प्रणालीचे आधुनिकीकरण करण्यासाठी समितीची स्थापना.
- वॉटर रिसोर्स ग्रूपच्या (डब्ल्यूआरजी) माध्यमातून लाभक्षेत्रात पाणी वापराची कार्यक्षमता व उत्पादकता वाढवण्यासाठी 'पब्लिक प्रायव्हेट सिव्हिल सोसायटी पार्टनरशिप'नुसार नावीन्यपूर्ण पद्धतीने ५३ हजार हेक्टर क्षेत्रावर औरंगाबाद आणि नंदूरबार जिल्ह्यांमध्ये युवा मित्र व डेव्हलपमेंट सपोर्ट ग्रूप (डीएससी) यांच्यासोबत सामंजस्य करार.
- राज्यातील इतर भागातील प्रकल्पासाठी 'प्रकल्प अंमलबजावणी कक्ष' कार्यान्वित.
- लाभक्षेत्रातील शेतकरी विदा (डाटा) संग्रह तयार करण्याचे काम प्रगतिपथावर.
- रखडलेल्या प्रकल्पांच्या बाबतीत प्राधान्यक्रम निश्चित. हे प्रकल्प वेळेत पूर्ण करण्यासाठी अर्थोपाय.
- सातारा येथील नियोजित शासकीय वैद्यकीय महाविद्यालयासाठी जलसंपदा विभागाच्या ६३ एकर जागेचे हस्तांतरण करून प्रलंबित जागेच्या प्रश्नाची सोडवणूक.
- जलशक्ती मंत्रालयाकडून दिल्या जाणाऱ्या राष्ट्रीय जल पुरस्कार २०१९ मध्ये महाराष्ट्र राज्याला द्वितीय क्रमांक.
- कृष्णा भीमा नदी खोऱ्यातील पूर नियंत्रणासाठी महाराष्ट्र व कर्नाटक राज्याची संयुक्त समिती स्थापन करण्याचा निर्णय.


कृष्णा नदी

- क्षारपड जमिनीची गुणवत्ता सुधारण्यासाठी खासगी उपसा सिंचन योजनेच्या माध्यमातून सर्वेक्षण करून उपाययोजना राबवण्याचा निर्णय.
- निरादेवघर व गुंजवणी धरणाचे कालवे कार्यन्वित होईपर्यंत विनावापर राहणारे पाणी समन्यायी तत्त्वावर तात्पुरत्या स्वरूपात नीरा डावा कालवा आणि निरा उजवा कालव्यावर क्षेत्रीय वाटपांतर्गत सिंचन प्रवर्गासाठी वापरण्यास मंजुरी.
- कुकडी प्रकल्पाच्या इतिहासात प्रथमच उन्हाळी हंगाम २ आवर्तन यशस्वीपणे पूर्ण.

- तारळी पाटबंधारे प्रकल्पातून खटाव तालुक्यातील धोंडेवाडी, दातेवाडी व मायणी या गावांच्या १५४० हेक्टर क्षेत्रास प्रथमच सिंचनाचा लाभ.
- कोविड १९ च्या कालावधीत उजनी प्रकल्पाच्या उन्हाळी हंगामातील दोन्ही आवर्तने यशस्वीपणे पूर्ण. १ लाख ०९ हजार ६७८ हेक्टरचे क्षेत्र सिंचित.
- पुराच्या वाया जाणाऱ्या पाण्यातून उजनी प्रकल्पाच्या लाभक्षेत्रातील तलावांचे पुनर्भरण त्यामुळे १.६२ टीएमसी पाणीसाठा.
- कृष्णा उपखोऱ्यातील महापूराचे समन्वयाने संनियंत्रण करून पुराच्या पाण्याने आटपाडी, खानापूर, जत, मिरज, तासगाव, मंगळवेढा, कंवठेमहांकाळ व सांगोला या दुष्काळग्रस्त तालुक्यातील तलाव हे टेंभू (१.३१ टीमसी) व म्हैसाळ (१.७५ टीएमसी) उपसा सिंचन योजनेद्वारे भरून देण्याचे यशस्वी नियोजन.
- कारंबा पंपगृह व एकरुख उपसा सिंचन योजनेचे टप्पे १ व २ कार्यान्वित करून प्रथमच उजनी प्रकल्पाचे पाणी दक्षिण सोलापूर व अक्कलकोट तालुक्यातील अवर्षणप्रवण भागास उपलब्ध करून देण्यात आले.
- उजनी जलाशयातील इंदापूर तालुक्यातील ४ बुडीत बंधाऱ्यांच्या कामाच्या सर्वेक्षणास मान्यता. यामुळे पिण्यासाठी व सिंचनासाठी होणारे पाण्याचे दुर्भिक्ष कमी होणार.
- लेंडी आंतरराज्य प्रकल्पास २०३३ कोटीची सुधारित प्रशासकीय मान्यता देऊन महाराष्ट्र तेलंगणा राज्यांतर्गत असलेल्या आंतरराज्य प्रकल्पास चालना.
- प्रकल्पांच्या लाभक्षेत्रात सुमारे ४० लक्ष हेक्टर क्षेत्रावर विक्रमी प्रत्यक्ष सिंचन करण्यात आले.
- बंदिस्त वितरण प्रणालीची सुमारे ३५ हजार हेक्टर क्षेत्रावर कामे करण्यात आली तसेच बंदिस्त वितरण प्रणालीच्या हस्तपुस्तिकेस मंजुरी देण्यात आली.

# वने

- **मुंबई शहरातील वाढत्या प्रदूषणाला आळा घालण्यासाठी तसेच मुंबई उपनगरात उपलब्ध असलेला झाडोरा, वनांचे क्षेत्र याचे अधिक सक्षमपणे संरक्षण आणि संवर्धन करण्यासाठी आरे येथील दुग्ध व्यवसाय व वन विभागाच्या ताब्यातील शासकीय क्षेत्र मौजे आरे गोरेगाव व मरोल-मरोशी ता. बोरिवली, जि. मुंबई उपनगर येथील ८०८ एकर क्षेत्र राखीव वने म्हणून घोषित.**



- सामूहिक पातळीवर ठोस वृक्षारोपण, वनीकरणाचा कार्यक्रम राबवण्यासाठी ३५० कोटी रुपयांची अर्थसंकल्पीय तरतूद.
- सफेद चिप्पी या कांदळवन वृक्षाच्या प्रजातीला राज्य कांदळवन वृक्ष म्हणून दर्जा देण्याचा निर्णय. राज्य कांदळवन वृक्ष घोषित करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिलेच राज्य.
- पर्यावरणाच्या दृष्टीने कांदळवनांचे महत्त्व लक्षात घेऊन शासकीय जमिनीवरील १०२० हेक्टर कांदळवन क्षेत्र राखीव वन म्हणून घोषित.
- समुद्रीय परिसंस्थेच्या दृष्टीने महत्त्वाचे असलेल्या आंग्रीया बँक क्षेत्राला कायदेशीर संरक्षण मिळावे, यासाठी संबोधित क्षेत्र घोषित करण्यासाठी राज्य वन्यजीव मंडळाची मान्यता.
- २०१९-२० साठी पर्यायी वनीकरण निधी व्यवस्थापन प्राधिकरण (कॅम्पा)अंतर्गत कामांसाठी १५१ कोटी रुपयांची तरतूद. याअंतर्गत ग्रामीण भागातील वणवा प्रतिबंध करण्यासाठी उपाययोजना, गॅस वाटप, जलसंधारणाची कामे करणे यांना प्राधान्य. २०२०-२१ या वर्षासाठी १०४ कोटी रुपये वितरित. यातून वन चराई क्षेत्र विकास व वन जल व मृद् संधारणाला प्राधान्य.
- सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सावंतवाडी वन विभागातील कोनाळ, बांबर्डे घाटीवडे, केंद्रू ब्रु, केंद्रे खुर्द, पाट्ये, शिरंगे, ऐनवडे, हेवाळे व मेंढे ता. दोडामार्ग येथील २९.५३ चौ.कि.मी. क्षेत्र तिलारी संवर्धन राखीव वन क्षेत्र म्हणून घोषित.

- गुगामल वन विभागात निसर्गप्रेमी पर्यटकांसाठी सायकल बुकिंग केंद्र व अमझरी निसर्ग पर्यटन संकुल परिसरात होम स्टे प्रकल्प.
- वनातील आग प्रतिबंधक उपाययोजनांसाठी नवीन ॲप व संकेतस्थळाची निर्मिती.
- व्याघ्र संवर्धन प्रतिष्ठान नियामक मंडळाद्वारे व्याघ्र प्रकल्पात भरीव काम करण्याचे उद्दिष्ट. सह्याद्री व्याघ्र प्रकल्पात कुरण विकास, मेळघाट व्याघ्र प्रकल्पात स्पायडर संग्रहालय, ताडोबा व्याघ्र प्रकल्पात यू-ट्यूबवरील ऑनलाइन सफारी, पेंच व्याघ्र प्रकल्पात विद्यार्थी पर्यटक वाढीला प्राधान्य.



- जैविक वारसा क्षेत्र निर्मितीच्या निर्णयानुसार गणेशखिंड गार्डन पुणे येथील ३३ हेक्टर क्षेत्र व लांडोरखोरी, जळगाव येथील ४८ हेक्टर क्षेत्र जैविक वारसा क्षेत्र म्हणून घोषित करण्याची अधिसूचना जारी.
- प्रत्येक वनवृत्तात वन्य प्राण्यांच्या उपचारासाठी किमान एक प्राणी बचाव पथक व तात्पुरते वन्यजीव उपचार केंद्र कार्यान्वित करणार.
- चंद्रपूर जिल्ह्यातील वाघांच्या स्थलांतराचा अभ्यास करण्यासाठी अभ्यास गटाची स्थापना.
- मानव व बिबट्या सहसंबंध अधिक समजून घेण्यासाठी वन विभाग व वाईल्ड लाईफ कंझर्व्हेशन सोसायटी इंडियामार्फत संयुक्तपणे अभ्यास करण्याचा निर्णय.
- व्याघ्र प्रकल्पातील वन्यजीवांची काळजी घेणे व त्यांना योग्य उपचार उपलब्ध करून देण्यासाठी सहा पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांची नव्याने पदे भरणार.
- नगर वन उद्यान योजना व शाळा रोपवाटिका योजना राज्यात नावीन्यपूर्ण व विस्तारित स्वरूपात राबवणार. नगर वनउद्यान योजना ही महानगरपालिका क्षेत्रात वन जमिनीवर २० ते १०० हेक्टरमध्ये ही योजना राबवण्याची संकल्पना. राज्यातील ११ शहर वन उद्यानांचा प्रस्ताव.
- हरित महाराष्ट्र अभियान व वन महोत्सवाचे १५ जून ते ३० सप्टेंबर या कालावधीत यशस्वी आयोजन.
- वन विभागाच्या कार्यालयातील मृगया चिन्हे वैज्ञानिक रीतीने गोरेवाडा (नागपूर) येथे जतन करण्याचा प्रकल्प.

- स्वयंसेवी संस्था, औद्योगिक संस्था व वन विभाग यांच्या त्रिपक्षीय करारनाम्याद्वारे अवनत वन क्षेत्राचे वनीकरण करण्याचा निर्णय. या अनुषंगाने तीन स्वयंसेवी संस्थांसोबत करार.
- संजय गांधी राष्ट्रीय उद्यान विकासासाठी आंतरराष्ट्रीय दर्जाचा प्रकल्प आराखडा.
- **महिला बचतगटांसाठी नागपूर येथील सेमिनरी हिल येथे वन अमृत उपजीविका प्रकल्प.**
- आंबोली ता. सावंतवाडी जि. सिंधुदुर्ग येथील आंबोली वन विश्राम गृह व फुलपाखरू वन उद्यानाची उभारणी.
- ठाणे येथील फ्लेमिंगो अभयारण्यावर आधारित ध्वनिचित्रफितीचे तसेच फ्लेमिंगो अभयारण्यासाठी तयार करण्यात आलेल्या लोगोचे अनावरण. नागरी वन उद्यान या संकल्पनेला पूरक असणाऱ्या या अभयारण्यामुळे मुंबई – ठाणे परिसरामध्ये फ्लेमिंगो या स्थलांतरित पक्ष्यांचा अधिवास वाढला.
- मेळघाटात स्पायडरच्या साडेचारशेहून अधिक जाती व त्याची पर्यावरणातील महत्त्वाची भूमिका लक्षात घेता संवर्धनाच्या दृष्टीने तसेच अभ्यासक, पर्यटक आदींसाठी स्पायडर म्युझियमच्या विकासाचा पाच कोटी रुपयांचा प्रस्ताव.
- सागवानाचे प्रमाणित बीज ॲमेझॉनमार्फत विक्री करण्याचा निर्णय.
- सेमिनरी हिल्स वनपरिक्षेत्रातील व्हीआयपी गेस्ट हाऊसच्या परिसरात 'जारुळ वनवाटिका इमारत' उभारली.
- महाराष्ट्र राज्यातील भारतीय जलक्षेत्रातील अरबी समुद्रीय हम्पबॅक व्हेलच्या पुनरुज्जीवन प्रकल्पातील संशोधन कार्यक्रमासह राखीव वन क्षेत्रात करावयाच्या विविध कामांची शिफारस करून ती केंद्र शासनाकडे मान्यतेसाठी पाठवण्याचे निश्चित.



- चंदन वृक्षलागवडीला प्रोत्साहन देण्यासाठी शासन प्रयत्नशील. चंदन वृक्षतोड, वाहतूक व विपणनाच्या समस्या प्राधान्याने सोडवणार. त्यासाठी कायद्यात व नियमांमध्ये आवश्यक त्या सुधारणा करणार.
- बावधन (पुणे) येथे २२ एकर क्षेत्रावर वन्यप्राणी उपचार केंद्र उभारण्यासाठी ३ कोटी रुपयांचा निधी वितरित. या उपचार केंद्रामुळे पुणे व परिसरातील वन्यजीव यांना तत्काळ उपचार सुविधा मिळणार.

- माळढोक आणि तणमोर या दुर्मीळ पक्ष्यांच्या अधिवास विकासासाठी नानज (सोलापूर), वरोरा (चंद्रपूर) व अकोला वन विभागासाठी ६३ लाख रुपयांचा पहिला हप्ता वितरित.
- भिमाशंकर व राधानगरी अभयारण्य इको सेन्सेटीव झोन म्हणून जाहीर.
- मा. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या निर्देशानुसार आता दरवर्षी ५ नोव्हेंबर ते १२ नोव्हेंबर या कालावधीत पक्षी सप्ताह साजरा करण्यात येणार : या सप्ताहामुळे पक्षी संरक्षण, संवर्धन, पक्षांच्या विविध जाती, पक्षांचे स्थलांतर व पक्षांचे महत्त्व याबाबत निश्चितच नागरिकांमध्ये जागृती होण्यास मदत.
- किनारी व सागरी जैव विविधता केंद्र ऐरोली येथे 'जायंट ऑफ द सी संग्रहालय' बनवण्यात येणार आहे:प्रकल्प सल्लागार संस्थेची नेमणूक.
- समुद्री कासवे आणि इतर सागरी जिवांच्या संरक्षण उपक्रमास ८ लक्ष निधी मंजूर.
- शाळेतील मुलांसाठी 'सागरी बाल वैज्ञानिक परिषदेचे' आयोजन करण्यासाठी निधी मंजूर.
- कांदळवन प्रतिष्ठानमार्फत विविध संस्थांच्या संशोधन प्रकल्पास अनुदान मंजूर : यात डॉल्फिन व व्हेल अभ्यास (१६ लक्ष), सागरी कासवांचा अभ्यास (१० लक्ष), गोबीड मासे अभ्यास (१२ लक्ष) पाणमांजर व मगरीचा अभ्यास (६ लक्ष) निधी मंजूर.
- सी.एस.आर. निधीमधून कांदळवन लागवडीची वाढ करणार. १० हेक्टर लागवडीचा करारनामा युनायटेड वे मुंबई या संस्थेसोबत केला आहे.



- उभादांडा वेंगुर्ला येथे बहुप्रजातीय (खेकडे, कालवे, शिंपले व जिताडा) उबवणी केंद्रास मान्यता. हा प्रकल्प विविध संस्थांच्या समन्वयातून साकारणार.
- कासव संरक्षण उपक्रमासाठी रत्नागिरी व रोहा वन विभागाला २६ लक्ष मंजूर.
- कांदळवन संरक्षणासाठी ११७ सुरक्षा रक्षक आहेत. त्यात वाढ करून १८३ करण्याचा निर्णय.

- भांडुप येथील कांदळवन क्षेत्र पक्षी निरीक्षणासाठी विकसित करण्याचा निर्णय. याकरिता इंटरप्रिटेशन सेंटर व स्वागत कमान उभारणार.
- राज्यातील आंतरराष्ट्रीय महत्त्व असलेले लोणार सरोवर आता राज्यातील दुसरे, तर देशातील ४१वे रामसर पाणथळ क्षेत्र म्हणून घोषित.


लोणार सरोवर

- पर्यावरण आणि पर्यटन मंत्री आदित्य ठाकरे यांच्या पुढाकाराने वन विभागाचे ७ पर्यटन संकुल महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाकडे देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय. या माध्यमातून वन विभाग व पर्यटन विभाग यांचे समन्वयातून पर्यटकांना पॅकेजच्या स्वरूपात वन व निसर्ग पर्यटन करता येणार.
- इको बटालियन औरंगाबादच्या धर्तीवर नांदेड, बीड व हिंगोली जिल्ह्यात इको बटालियन स्थापन करणार.

## कोविड काळात दिलासा

- कोविड या आजारावर लस विकसित करण्याचे प्रयत्न केले जात आहेत. चाचणीसाठी माकडांची आवश्यकता होती ते वन विभागाने राष्ट्रीय विषाणू विज्ञान संस्थेला उपलब्ध करून दिले.

# पर्यावरण आणि वातावरणीय बदल

- आरे येथील सुमारे ३२८.९ हेक्टर (सुमारे ८१२.७ एकर) जमीन ही राखीव वन म्हणून जाहीर.
- पर्यावरणाचे जतन आणि संवर्धनासाठी राज्यात 'माझी वसुंधरा' अभियान. उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या शहरे, गावांचा जागतिक पर्यावरण दिनी होणार सन्मान.
- पर्यावरण विभागाचे नाव आता 'पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग'. निसर्गाशी संबंधित पृथ्वी, वायू, जल, अग्नी आणि आकाश या पंचतत्त्वांवर विभाग कार्य करणार. जनजागृती व शैक्षणिक कार्यक्रमांद्वारे जनमानसात त्यांच्या कृतीद्वारे भवताल अधिक समृद्ध करण्यासाठी प्रयत्न.



- शहरी भागातील पहिले खारफुटी जंगल तयार करण्यासाठी महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाकडील मुंबईतील गोराई व मनोरी येथील ५०० एकर तर रायगड येथील जिल्हाधिकाऱ्यांच्या नियंत्रणाखालील ३ हजार एकर अशी एकूण ३ हजार ५०० एकर जमीन वन विभागाकडे हस्तांतरीत करण्याबाबत निर्देश.
- वृक्ष संरक्षण व जतनासंदर्भात कायद्याचे नियमन नगरविकास विभागाऐवजी पर्यावरण व वातावरणीय बदल विभागामार्फत करण्यात येणार.
- निसर्गाशी असलेली कटिबद्धता निश्चित करण्यासाठी या वर्षी विभागामार्फत १०० कोटी रुपये निधी उपलब्ध.
- संपूर्ण महाराष्ट्र राज्य सिंगल यूज प्लास्टिकमुक्त करण्याचा निर्धार.
- मुंबईतील माहुल भागामधील प्रदूषण नियंत्रणासाठी पहिल्या टप्प्यात या भागातील ३०० घरांचे पुनर्वसन. माहुल भागातील प्रदूषण नियंत्रित करण्यासाठी पाठपुरावा.
- राज्य शासनाच्या पाठपुराव्याने ताडोबा – अंधारी व्याघ्र प्रकल्पाजवळील खाण साईटचा लिलाव रद्द करण्याचा केंद्र शासनाचा निर्णय. यामुळे वन्यजीव कॉरिडॉरचे संरक्षण साध्य.
- महामार्गाच्या कामात येणारा सांगली जिल्ह्यातील ४०० वर्षांपूर्वीचा वटवृक्ष वाचवण्याचा निर्णय. राज्याचा समृद्ध वारसा आणि पर्यावरण जतनासाठी कटिबद्ध.
- औष्णिक ऊर्जा प्रकल्पातून निर्माण होणाऱ्या फ्लाय ॲशचा वापर हा हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे समृद्धी महामार्गाच्या बांधकामात केला जाणार.

- महामार्गांचा पर्यावरणपुरक विकास करण्यास चालना. महामार्गांवर सौर ऊर्जेचा वापर, रेन वॉटर हार्वेस्टिंग, दुतर्फा तसेच विभाजकावर वृक्षारोपण करण्याच्या दृष्टीने पुढाकार.
- पर्यावरणपूरक अशा इलेक्ट्रिक वाहनांच्या वापरास चालना. राज्यात गुंतवणुकीसाठी इलेक्ट्रिक वाहन निर्मितीतील आद्य कंपनी टेस्लासमवेत चर्चा.
- सद्य:स्थितीत कोरोना संकटाच्या पार्श्वभूमीवर उद्योगांना महाराष्ट्रात उद्योग स्थापन करण्याच्या अनुषंगाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने संमतिपत्र प्रदान करण्यासाठीची कालमर्यादा कमी करण्याचा निर्णय.
- वातावरणीय बदलाच्या दृष्टीने पर्यावरण विभागातर्फे कृती आराखडा. वृक्षलागवड, अस्तित्वातील वृक्षांचे जतन व संगोपन हे मुख्य उद्दिष्ट.
- नाग नदी प्रदूषण रोखण्याच्या प्रकल्पासाठी आवश्यक निधीच्या कर्जफेडीसाठी राज्य शासनाच्या हिश्श्याच्या रकमेस हमी. प्रकल्पाच्या अंमलबजावणी आणि संनियंत्रणासाठी समन्वय समिती नियुक्त.

## बंदरे

- मुंबईतील भाऊचा धक्का ते रायगड जिल्ह्यातील मांडवा या जलमार्गावर रो-पॅक्स फेरी सेवेची सुरुवात. यामुळे प्रवाशांना आपल्या वाहनासहित बोटीतून प्रवास सोईचा. मुंबई ते अलिबागचा प्रवास फक्त एक तासात शक्य.
- आशियाई बँक पुरस्कृत सुमारे ६४३ कोटी रुपये खर्चाच्या महाराष्ट्र शाश्वत पर्यावरणपूरक समुद्रकिनारा संरक्षण आणि व्यवस्थापन प्रकल्पाच्या अंमलबजावणीचा निर्णय. पर्यावरणस्नेही उपाययोजनांमुळे समुद्र किनाऱ्यांची लाटांमुळे होणारी धूप थांबवणे शक्य.
- गेट वे ऑफ इंडिया येथून एलिफंटा, मांडवा, जेएनपीटी, हार्बर क्रुझिंग येथे जाणाऱ्या प्रवाशांची गर्दी कमी करण्यासाठी रेडीओ क्लबजवळ नवीन प्रवासी जेट्टी व इतर सुविधा उभारण्याचा निर्णय. यासाठी ९८.५७ कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित.
- रायगड जिल्ह्यातील काशिद येथे प्रवासी जेट्टी, टर्मिनल ब्रेकवॉटर व तत्सम सुविधा निर्माण करण्यासाठी ११२ कोटी रुपये खर्चाच्या कामांना मान्यता. या जेट्टीमुळे मुंबईहून बोटसेवा, रो-पॅक्स सेवा सुरू करता येईल. त्यामुळे पर्यटक व प्रवाशांची मोठी सोय.

# भाषा
# व
# संस्कृती

# सांस्कृतिक कार्य

- मुंबई आणि मुंबई उपनगरांमध्ये चित्रीकरणासाठी परवानगी देण्यात येणाऱ्या एक खिडकी योजनेचे लवकरच विस्तारीकरण. पुणे, नाशिक, औरंगाबाद, सातारा, रत्नागिरी, सिंधुदुर्ग या जिल्ह्यांतही एक खिडकी योजना सुरू करण्यात येणार.
- महाराष्ट्र वैभव – राज्य संरक्षित स्मारक संगोपन योजनेंतर्गत जळगाव येथील 'अंमळनेर वेस' अंमळनेर नगरपरिषद यांना १० वर्षांच्या कालावधीसाठी संगोपनार्थ देण्यास मान्यता.
- राज्य शासनाचा २०१८–१९चा तमाशासम्राज्ञी विठाबाई नारायणगावकर जीवनगौरव पुरस्कार गुलाबबाई संगमनेरकर, राज्य शासनाचा संगीताचार्य अण्णासाहेब किर्लोस्कर पुरस्कार मधुवंती दांडेकर, नटवर्य प्रभाकर पणशीकर रंगभूमी जीवनगौरव पुरस्कार स्व. रत्नाकर मतकरी यांना जाहीर.
- राज्य शासनाचा गानसम्राज्ञी लता मंगेशकर पुरस्कार उषा मंगेशकर यांना जाहीर.
- राज्य शासनाचा २०१९–२० चा ज्ञानोबा तुकाराम पुरस्कार ह.भ.प. बद्रीनाथ महाराज तनपुरे यांना जाहीर.
- रत्नागिरी जिल्ह्यातील १७ गावांमध्ये विखुरलेल्या इतिहासपूर्वकालीन कातळ शिल्पांच्या जतन आणि संवर्धनाच्या कामाला तत्वत: मान्यता.

## कोविड काळात दिलासा

- लॉकडाऊन काळात चित्रपटसृष्टीतील विविध कामांना मार्गदर्शक तत्त्वांसह शासनाची मान्यता; अटी–शर्तीसह चित्रीकरणासही मान्यता.
- रंगभूमी दिनी राज्यातील नाट्यगृहे/ सिनेमागृहे ५० टक्के आसनक्षमतेसह सुरू करण्यास मान्यता.
- मनोरंजन क्षेत्राबाबतचे धोरण ठरवण्यासाठी सांस्कृतिक कार्य विभागामार्फत तीन दिवसीय चर्चासत्राचे आयोजन. चर्चासत्राद्वारे समोर आलेल्या मार्गदर्शक सूचनेतून धोरण ठरणार.



# मराठी भाषा

- राज्यातील सर्व मंडळांच्या शाळांमध्ये मराठी हा विषय एप्रिल २०२० पासून अनिवार्य करण्यात आला. मराठी भाषेचे अध्यापन व अध्ययन सक्तीचे करण्यासाठी कायदा. शालेय शिक्षण विभागामार्फत कायद्याची अंमलबजावणी.
- मराठी भाषेचा सक्षमपणे सर्वत्र वापर करण्यासाठी राजभाषा अधिनियम १९६४ मध्ये सुधारणा करण्यासाठी समितीची स्थापना.
- सर्व मंत्रालयीन विभाग, त्याअंतर्गत प्रशासकीय कार्यालये, शासन अंगीकृत व्यवसाय, शासकीय उपक्रम तसेच केंद्र शासनाच्या अखत्यारीतील उपक्रम आणि बँका यांना शासन व्यवहारात मराठी भाषेचा वापर १०० टक्के करण्याबाबत सूचना निर्गमित.



# अन्न आणि आरोग्य

# सार्वजनिक आरोग्य

- **स्व. बाळासाहेब ठाकरे रस्ते अपघात विमा योजना –** राज्यात स्व. बाळासाहेब ठाकरे रस्ते अपघात विमा योजनेत महाराष्ट्रातील रस्त्यावर झालेल्या अपघातामधील व्यक्तींना लाभ मिळेल. ही व्यक्ती कोणत्याही राज्य, देशाची असली तरीदेखील त्यांना योग्य ते मोफत वैद्यकीय उपचार देण्यात येतील.
- धर्मादाय आयुक्तांकडे नोंदणीकृत खासगी रुग्णालयातील १० टक्के खाटा गरिबांसाठी मोफत आणि १० टक्के खाटा आर्थिक दुर्बल घटकांसाठी सवलतीच्या दरात उपलब्ध.
- प्राथमिक आरोग्य सुविधा बळकटीकरणावर भर, मार्चअखेर ६५०० आरोग्यवर्धिनी केंद्रे कार्यान्वित.
- कर्करोग, एच.आय.व्ही.बाधित तसेच दुर्धर आजार असलेल्या रुग्णांची विशेष काळजी घेण्यासाठी १७ जिल्ह्यांत स्थापन झालेले विशेष उपचार केंद्र 'पॅलिएटिव्ह केअर सेंटर' येत्या दोन वर्षांत उर्वरित १९ जिल्ह्यांत सुरू करण्याचा निर्णय.
- हृदयविकाराचा झटका आल्यानंतर सुवर्ण तासात (गोल्डन अवर) औषधोपचारासाठी राज्यात 'स्टेमी' (ST Elevation in Myocardial Infraction) प्रकल्प. पहिल्या टप्प्यात दहा जिल्ह्यांमध्ये प्रकल्प.
- शासकीय व अनुदानित शाळांमधील ६ ते १८ वर्षे वयोगटातील मुलांमधील दृष्टिदोष निवारण्यासाठी मोफत चष्मे.
- आशा वर्कर्स व गटप्रवर्तकांच्या मानधनात वाढ.
- शहरी भागासाठी आरोग्य सेवा संचालकांचे पद.



- ग्रामीण भागातील आरोग्य केंद्रांना मिळणार ५०० नवीन रुग्णवाहिका.



## कोविड काळात दिलासा

- राज्याचा रुग्ण बरे होण्याचा दर ९२ टक्क्यांवर.
- राज्यातील ॲक्टिव्ह रुग्णांची संख्या एक लाखाच्या आत.

## प्रयोगशाळा निदान व्यवस्थेचा विस्तार

- कोरोना विषाणूच्या रुग्ण निदानाची व्यवस्था सुरुवातीला केवळ एकाच ठिकाणी म्हणजे एन.आय.व्ही. पुणे येथे उपलब्ध होती. त्यानंतर कस्तुरबा रुग्णालय, मुंबई आणि इंदिरा गांधी मेडिकल कॉलेज, नागपूर येथे ही सुविधा निर्माण करण्यात आली. सद्यःस्थितीत, राज्यात ३५९ शासकीय आणि ११७ खासगी अशा ४७६ प्रयोगशाळांमध्ये कोरोना रुग्ण निदान व्यवस्था उपलब्ध करण्यात आली आहे.
- चाचण्यांची व्यवस्था वाढवल्याने रुग्णनिदानात गती. रुग्णोपचार सुविधांचा विस्तार.
- केंद्र सरकराच्या मार्गदर्शक सूचनांनुसार राज्यात त्रिस्तरीय उपचार व निगा केंद्रे स्थापन. यामुळे खाटांच्या व व्हेंटिलेटर्सच्या संख्येत वाढ.
- कोरोना प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर सार्वजनिक ठिकाणी तंबाखू, सुपारी, पान, पान मसाला, गुटखा तसेच अन्य तंबाखूजन्य पदार्थांचे सेवन, थुंकण्यास व धूम्रपानास प्रतिबंध करण्याचा निर्णय. सार्वजनिक ठिकाणी थुंकणाऱ्यांना दंडासह शिक्षा.

## रुग्णांच्या हिताचे रक्षण




- खासगी रुग्णालयांनी सर्वसामान्य नागरिकांची आर्थिक लूट करू नये, म्हणून या बिलांचे शासकीय लेखापरीक्षकांकडून तपासणी करण्याच्या यंत्रणेला सूचना.
- वैद्यकीय बिलांबाबत काही तक्रारी असल्यास त्या निवारण करण्याकरिता जिल्हा आणि राज्यस्तरावर यंत्रणा कार्यरत.
- शासकीय रुग्णालयात रेमडिसिव्हिर हे इंजेक्शन मोफत उपलब्ध.
- खासगी रुग्णालयात रेमडिसिव्हिर इंजेक्शनची किंमत २३६० रुपयांपर्यंत कमी.
- खासगी प्रयोगशाळांमधील कोरोना निदान चाचणी शुल्क ४५०० पासून ९०० रुपयांपर्यंत कमी.
- मास्कच्या किमतीवरही नियंत्रण.
- अतिदक्षता विभागात उपचार सुरू असलेल्या कोरोनाच्या रुग्णांसाठी विशेषज्ञांचे मार्गदर्शन आणि उपचारासाठी मुंबई, ठाणे, जळगाव, सोलापूर, औरंगाबाद, अकोला आणि जालना या ७ जिल्ह्यांमध्ये प्रायोगिक तत्त्वावर 'टेलिआयसीयू' सुविधेचा वापर.
- प्लाझ्मा बॅगसाठी दरनिश्चिती.
- रोग निदान आणि रोग उपचार यामध्ये सर्वसामान्य जनतेची आर्थिक परवड होऊ नये, याकरिता महात्मा फुले जीवनदायी योजना राज्यातील सर्व नागरिकांना.
- खासगी प्रयोगशाळांच्या तसेच सीटी स्कॅनच्या फीवर निर्बंध.

## ऑक्सिजनचा पुरेसा पुरवठा

- प्रत्येक रुग्णालयांना गरजेप्रमाणे ऑक्सिजन पुरवठा व्हावा, याकरिता ऑक्सिजन वितरण आणि पुरवठा यंत्रणेवर प्रभावी संनियंत्रण व्यवस्था निर्माण करण्यात आली आहे. त्यानुसार अन्न आणि औषध प्रशासनाच्या मदतीने राज्यात जिल्हा, विभाग आणि राज्य पातळीवर नियंत्रण समित्यांची स्थापना करण्यात आली आहे.

## मुंबई शहरासाठी उपाययोजना

- कोरोना संसर्गाच्या पार्श्वभूमीवर मुंबई शहरातील आरोग्य यंत्रणेसाठी जिल्हा नियोजन समितीमध्ये ३.६३ कोटींची तरतूद.
- मुंबईतील अतिसंवेदनशील क्षेत्र (कंटेन्मेंट झोन) मध्ये टाळेबंदीचे नियमांचे पालन करण्यासाठी व महानगरपालिका व पोलीस यांच्यात समन्वय साधण्यासाठी पालिकेच्या अतिरिक्त आयुक्तांची नेमणूक.
- कोरोनामुळे मृत पावलेल्यांना दफन करण्यासाठी कब्रस्थांनामध्ये वेगळी व्यवस्था करण्याचा निर्णय.
- मुंबईतील पी उत्तर वॉर्डातील डबेवाल्यांना २,५०० रेशन किटचे वितरण.

## माझे कुटुंब–माझी जबाबदारी

**फलनिष्पत्ती**

- पहिल्या टप्प्यामध्ये ९९ टक्के म्हणजे २.७६ कोटी घरापैकी २.७४ कोटी घरांमधील तसेच १२.४३ कोटीपैकी ११.९२ कोटी व्यक्तींशी थेट संपर्क.
- दुसऱ्या टप्प्यामध्ये ९८ टक्के म्हणजे २.७० कोटी घरे तसेच १०.०१ कोटी (८१ टक्के) व्यक्तींशी थेट संपर्क.
- प्रशिक्षित टीमद्वारे भेट दिलेल्या प्रत्येक व्यक्तीची ताप, ऑक्सिजन पातळी तपासणी आणि आरोग्य शिक्षण.
- सर्वेक्षण काळात आढळून आलेल्या सुमारे ३.५७ लाख आयएलआय/सारी (SARI) रुग्णांपैकी सुमारे ३.२२ लाख रुग्णांची कोविड तपासणी. संसर्ग झालेल्या ५१ हजार रुग्णांना वेळीच उपचार.
- सर्वेक्षण काळात घरोघरी भेटीमध्ये मधुमेह ८.७० लाख, उच्चरक्त दाब १३ लाख, हृदयविकार ७३ हजार, कर्करोग १७ हजार आणि इतर आजाराचे १ लाख असे एकूण सुमारे २४ लाख कोमॉर्बिड रुग्ण आढळले. त्यांच्या उपचाराची सोय करण्यात आली.

# अन्न व औषध प्रशासन

- सॅनिटायझरची वाढती मागणी पूर्ण करण्यासाठी अल्कोहोल उत्पादक (डिस्टिलरीज) यांना एक दिवसात परवाना मंजूर करण्याचा निर्णय.
- योग्य किमतीत अन्नपदार्थ मुबलक प्रमाणात उपलब्ध होतील, यासाठी सर्व उत्पादक व वितरकांच्या अडचणी सोडवण्यासाठी मुख्यालय व जिल्हास्तरावर नोडल अधिकाऱ्यांची नियुक्ती.
- कोविड-१९ च्या प्रादुर्भावामुळे रुग्णांसाठी ऑक्सिजन कमी पडू नये व रुग्णांची गैरसोय होऊ नये म्हणून राज्यातील इच्छुक ऑक्सिजन उत्पादकांना तत्काळ परवाना मंजूर.
- ऑक्सिजनच्या टँकरला सायरनची परवानगी देऊन ऑक्सिजन पुरवठा कालावधी कमी. कोविड रुग्णांवर उपचार करण्यासाठी आवश्यक असणारे ऑक्सिजन ८० टक्के वैद्यकीय उपयोगासाठी राखीव ठेवण्याचा निर्णय.
- कोविड प्रादुर्भाव रोखण्यासाठी लागणाऱ्या मास्कच्या किमती नियंत्रित केल्या.
- प्रत्येक जिल्ह्यात किमान दोन घाऊक वितरक, दहा किरकोळ औषध विक्रेत्यांकडे खासगी व्यावसायिकांसाठी माफक दरात पीपीई किट व एन-९५ मास्क किंवा त्या दर्जाचे इतर मास्क उपलब्ध करण्याचा निर्णय.




- कोविड-१९ प्रादुर्भाव काळात लक्षणीय कामगिरी. अन्न व औषध प्रशासनाच्या आयुक्त कार्यालयात २४ तास नियंत्रण कक्ष. जनतेच्या, रुग्णांच्या तक्रारी नोंदवून तत्काळ चौकशी करण्याची व्यवस्था.
- टाळेबंदी काळात राज्यातील सर्व दुकानांमध्ये जीवनावश्यक वस्तू पुरेशा प्रमाणात उपलब्ध होतील, याची यशस्वी खबरदारी.
- खासगी रुग्णालयांसाठी रेमडेसिवीर आणि टोस्लीझुमॅब यांचे दर कमी केले. शासकीय रुग्णालयात रेमडेसिवीर इंजेक्शन मोफत उपलब्ध.
- रेमेडिसिवीर जनऔषधी केंद्रावर उपलब्ध करून देण्याचा निर्णय.

# मदत व पुनर्वसन, आपत्ती व्यवस्थापन

- **क्यार व महाचक्रीवादळ, निसर्ग चक्रीवादळ यामुळे बाधित झालेल्या नागरिकांना एकूण ८३५६ कोटी तर गारपीट व अवेळी पाऊस, घर पडझड, शेती पिकाचे नुकसान, अवेळी पाऊस, अतिवृष्टी यामुळे बाधित झालेल्या नागरिकांना एकूण ३३९६ कोटी असे एकूण ११,७५२ कोटी रुपये वितरित.**
- **त्याशिवाय पाणीटंचाई, उपसा सिंचन योजनेची टंचाई कालावधीतील वीज देयके, कोविड-१९ चा प्रादूर्भाव नियंत्रित करण्यासाठी, भूकंप, लॉकडाऊनमध्ये अडकलेल्या मजुरांच्या प्रवासासाठी एसटीस निधी, चारा छावण्या एकूण १५४६ कोटी रुपये वितरित.**
- जून ते ऑक्टोबर २०२० या कालावधीतील अतिवृष्टी व पुरामुळे किमान ३३ टक्के नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना शेतीपिकांच्या नुकसानीसाठी १० हजार रुपये प्रतिहेक्टर व बहुवार्षिक पिकांच्या नुकसानीसाठी २५ हजार प्रतिहेक्टर या दराने २ हेक्टरच्या मर्यादेत मदत देण्याचा निर्णय. २२९७ कोटी ६ लाख रुपयांचा निधी वितरित.
- चक्रीवादळामुळे व अवेळी पावसामुळे ३४ जिल्ह्यांच्या ३४९ तालुक्यातील नुकसान झालेल्या शेतपिकांसाठी ८ हजार रुपये प्रतिहेक्टर याप्रमाणे दोन हेक्टरच्या मर्यादेत आणि बहुवार्षिक पिकांसाठी १८ हजार रुपये प्रतिहेक्टर याप्रमाणे दोन हेक्टरच्या मर्यादेत मदत करण्याचा निर्णय. यासाठी ७ हजार ६४७ कोटी ९७ लाख रुपयांची मदत वितरित.
- आपत्तीमुळे बाधित शेतकऱ्यांना जमीन महसूलात सूट, शेतपिकांचे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांच्या पाल्यांना शाळा व महाविद्यालयीन परीक्षा शुल्कात माफी.
- गारपीट व अवेळी पावसामुळे बाधित झालेल्या जळगाव व विदर्भातील सहा जिल्ह्यांतील शेतकऱ्यांना ९३ कोटी ५८ लाख रुपयांची मदत.
- निसर्ग चक्रीवादळामुळे रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यांतील नुकसानग्रस्तांना ७०७ कोटी ७५ लाख ६६ हजार रुपयांची मदत.
- रत्नागिरी व रायगड जिल्ह्यांतील स्थलांतरित व घरांच्या पडझडीमुळे मदत छावण्यांमध्ये दाखल झालेल्या नागरिकांना अन्न, पाणी, निवारा आणि वैद्यकीय सुविधा उपलब्ध.
- चक्रीवादळामुळे सार्वजनिक ठिकाणी जमा झालेला कचरा आणि इतर ढिगारे उचलून स्वच्छता करण्यासाठी तातडीने १ कोटी २५ लाख रुपयांचा निधी वितरित.

- बाधित नागरिकांना एसडीआरएफच्या दरात आणि निकषात बदल करून विशेष वाढीव दराने मदत करण्याचा निर्णय. बाधित कुटुंबांना मोफत अन्नधान्य व केरोसीनचे वितरण.
- विदर्भातील पूरग्रस्त नागरिकांना राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या दरापेक्षा विशेष वाढीव दराने १८४ कोटी ५२ लाख रुपयांची मदत वितरित.
- खरीप हंगाम २०१८ मधील चारा छावणीसाठी यावर्षी ३८६ कोटी १२ लाख रूपये वितरित.
- जुलै ते ऑक्टोबर, २०१९ मधील अतिवृष्टी मधील घर पडझड /शेती पिकांचे नुकसान व इतर बाबींकरिता या वर्षी ८२१ कोटी २८ लाख रूपये वितरित.
- पाणी टंचाईसाठी ३२६ कोटी ५६ लाख रुपये पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाला दिले.
- उपसा सिंचन योजनेची टंचाई कालावधीतील वीज देयकेसाठी १८ कोटी.
- पालघर जिल्ह्यातील भूकंपग्रस्तांना (ताडपत्री व घर पडझड) साठी या वर्षी १ कोटी ७७ लाख वितरित.
- चक्रीवादळाच्या पार्श्वभूमीवर २१ एनडीआरएफ, ६ एस.डी.आर.एफ. पथके तैनात. धोक्याची पूर्वसूचना दिल्याने समुद्रात अडकलेल्या ७००३ मच्छीमारांना आणि ७५ हजार ९४० नागरिकांना सुरक्षित स्थळी नेण्यात आले. मराठवाड्यातील व पश्चिम महाराष्ट्रातील काही जिल्ह्यात पूरस्थिती निर्माण झाल्याने नागरिकांचे स्थलांतर करतांना सोलापूर येथे २, उस्मानाबाद व पुणे येथे १ अशी एनडीआरएफची पथके तैनात. आपत्तिपूर्व व्यवस्थापनामुळे मोठ्या प्रमाणावर मनुष्यहानी टाळण्यास मदत.
- टाळेबंदीच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी आपत्ती व्यवस्थापन कायद्याचा वापर.
- कोरोनाच्या पार्श्वभूमीवर सर्व जिल्ह्यांमध्ये समुपदेशन केंद्रांची स्थापना तसेच बहुभाषिक समुपदेशन हेल्पलाईन.
- रायगड आणि भिवंडी येथे झालेल्या इमारत दुर्घटनांप्रसंगी एनडीआरएफ आणि इतर बलांच्या समन्वयातून गतिमानतेने मदतकार्य.

## कोविड काळात दिलासा

- कोविड–१९ चा प्रादुर्भाव नियंत्रित करण्यासाठी विलगीकरण कक्ष, तात्पुरती निवास व्यवस्था, अन्न,कपडे, वैद्यकीय देखभाल, अतिरिक्त चाचणी प्रयोगशाळेची स्थापना, अग्निशमन, पोलीस, स्थानिक स्वराज्य संस्था, आरोग्य सेवेतील कर्मचारी यांना वैयक्तिक संरक्षणासाठी साधनांचा पुरवठा, मदत छावण्या व इतर

ठिकाणी आश्रय घेतलेल्या स्थलांतरित कामगार, बेघर व्यक्ती यांच्यासाठी अन्न, वस्त्र आणि निवारा अशा विविध उपाययोजनांसाठी ६९७ कोटी ९२ लाख रुपयांचा निधी वितरित.

- टाळेबंदीच्या काळात उद्योग बंद झाल्याने वेगवेगळ्या शिबिरांमध्ये एकूण १८ लाख १५ हजार मजुरांची भोजन, निवास, वैद्यकीय सुविधा इ. व्यवस्था.
- राज्य परिवहन महामंडळाच्या बसेस तसेच विशेष श्रमिक रेल्वेच्या माध्यमातून परराज्यातील १२ लाख १० हजार २५५ मजुरांना त्यांच्या राज्यात पाठवण्याची व्यवस्था. यासाठी सुमारे ९७ कोटी खर्च तसेच बसखर्चासाठी एकूण ११५ कोटी रुपयांचा निधी खर्च.
- लॉकडाऊनच्या काळात नियंत्रण कक्षाचे कामकाज २४ तास सुरू. राज्यातील कोविड-१९ चा प्रादुर्भाव कमी करण्याच्या दृष्टीने लोकांना दूरध्वनीद्वारे मदत करणे, टाळेबंदी संदर्भात केंद्र शासन, राज्य शासनाच्या नियमावलीबाबत नागरिकांना माहिती देणे, केंद्र व राज्य यांच्यात आपत्तीच्या काळात समन्वय ठेवणे अशी कामे मंत्रालय नियंत्रण कक्षामार्फत पूर्ण.

# अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण

## शिवभोजन योजना



- २६ जानेवारी २०२० पासून शिवभोजन योजना सुरु. शिवभोजन थाळीचा दर शहरी भागात ५० व ग्रामीण भागात ३५ रुपये असा निश्चित. सुरुवातीला ग्राहकाला १० रुपये प्रति थाळी याप्रमाणे जेवण उपलब्ध करून. हे दहा रुपये वजा जाता शहरी भागासाठीचे ४० व ग्रामीण भागासाठीचे २५ रुपये प्रतिथाळीची उरलेली रक्कम शासनामार्फत अनुदान म्हणून शिवभोजन केंद्रांना वितरित.
- शिवभोजन ॲप्लिकेशनचा वापर करूनच शिवभोजन थाळी वितरित करणे बंधनकारक. योजनेचा विस्तार तालुकास्तरापर्यंत. राज्यात ९०७ शिवभोजन केंद्रे सुरू आहेत. सुमारे अडीच कोटींपेक्षा जास्त शिवभोजन थाळ्यांचे वितरण.

## धान व भरडधान्य विक्रमी खरेदी

- किमान आधारभूत किंमत खरेदी योजनेंतर्गत राज्यात ऑक्टोबर २०१९ ते जुलै २०२० या काळात विक्रमी धान आणि भरड धान्याची (ज्वारी, बाजरी, मका, रागी) खरेदी.
- विदर्भातील धान खरेदीसाठी मुदतवाढ मिळालेल्या शेतकऱ्यांना प्रोत्साहन अनुदानाचा लाभ. खरीप हंगामासोबतच रब्बी हंगामातही भरडधान्य खरेदी करण्याचा निर्णय.
- खरीप आणि रब्बी मिळून सुमारे ४ लाख शेतकऱ्यांकडून सुमारे पावणे दोन कोटी क्विंटल धानाची विक्रमी खरेदी झाली. तसेच खरीप आणि रब्बी हंगामात सुमारे साडे अकरा लाख क्विंटल मक्याची खरेदी.
- खरीप आणि रब्बी मिळून २८ हजार शेतकऱ्यांकडून सुमारे ७२ हजार क्विंटल ज्वारीची खरेदी. किमान आधारभूत किंमतीचे सुमारे ३४५८ कोटी रुपये तसेच प्रोत्साहनपर ८६० कोटी रुपये शेतकऱ्यांच्या खात्यात जमा.
- अन्नधान्य साठवण्यासाठी ३१,३२० मे.टन क्षमतेच्या २१ नवीन गोदामांना मान्यता. यासाठी सुमारे ५१ कोटी रुपयांचा निधीही वितरित.
- किमान आधारभूत किंमत खरेदी योजनेखाली रब्बी पणन हंगामात गहू या पिकासाठी राज्यात प्रथमच विकेंद्रित खरेदी योजना लागू.
- केरोसीन बचतीमुळे राज्य शासनाला केरोसीनमधील थेट लाभ वितरण योजनेनुसार सुमारे ३६ कोटी प्रोत्साहनपर लाभ.

## कोविड काळात दिलासा

- राज्यातील गोरगरिबांना कमी किमतीत जेवण उपलबध व्हावे, या उद्देशाने शिवभोजन थाळीचा दर २९ मार्च २०२० रोजीपासून प्रतिथाळी ५ रुपये इतका करण्याचा निर्णय. या निर्णयाला ३१ मार्च २०२१ पर्यंत मुदतवाढ.
- राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजना व शेतकरी योजनेंतर्गत समाविष्ट न झालेल्या; परंतु ज्यांचे वार्षिक कौटुंबिक उत्पन्न रुपये १ लाखापर्यंत आहे, अशा सुमारे ३ कोटी एवढ्या एपीएल (केशरी) शिधापत्रिकाधारकांना चार महिन्यांच्या कालावधीकरिता सवलतीच्या दराने अन्नधान्याचा लाभ. याचा आर्थिक भार राज्य शासनाने स्वत: स्वीकारून अडचणीच्या काळात गरीब जनतेला मदत करण्याची भूमिका स्वीकारली. यामुळे प्रत्येक व्यक्तीला प्रत्येक महिन्याला ३ किलो गहू (रु.८/- प्रतिकिलो) व २ किलो तांदूळ (रु.१२/- प्रतिकिलो) याप्रमाणे अन्नधान्य उपलब्ध.

- कोरोनाच्या पार्श्वभूमीवर प्रधानमंत्री गरीब कल्याण अन्न योजनेंतर्गत राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेच्या पात्र ७ कोटी लाभार्थ्यांना एप्रिल ते नोव्हेंबर या कालावधीत प्रतिव्यक्ती ५ किलो मोफत तांदूळ तसेच प्रतिकुटुंब एक किलो तूरडाळ किंवा चणाडाळ वितरण.
- मे आणि जूनपासून केशरी कार्डधारकांनादेखील अतिरिक्त १.५० लक्ष मे. टन धान्य वाटप केले जात असल्याने प्रतिमाह जवळपास ८.५० लक्ष मे. टन म्हणजे तीनपट धान्य वितरित करण्याचा विक्रम.
- आत्मनिर्भर योजनेंतर्गत रेशन कार्ड नसलेल्या गरजू नागरिकांना मे व जून महिन्यासाठी प्रतिव्यक्ती प्रतिमाह ५ किलो मोफत तांदूळ व प्रतिकुटुंब प्रतिमाह एक किलो अख्खा चणा वितरण.
- प्रधानमंत्री गरीब कल्याण अन्न योजना, अंत्योदय अन्न योजना व प्राधान्य कुटुंबातील लाभार्थ्यांना जुलै ते नोव्हेंबर २०२० या कालावधीत अख्ख्या चण्याऐवजी दरमहा एक किलो मोफत चणाडाळ वितरित करण्याचा.



- मास्क व हॅण्ड सॅनिटायझर या वस्तूंचा जीवनावश्यक वस्तूत म्हणून समावेश.
- कोरोना प्रादुर्भाव काळात गरजू लोकांना अन्नधान्य वितरण व अन्नछत्र चालवणाऱ्या स्वयंसेवा संस्थांना खुल्या बाजारपेठ (ओपन मार्केट स्किम) योजनेंतर्गत रु.२१/- प्रतिकिलो गहू व रु. २२/- प्रतिकिलो तांदूळ उपलब्ध.
- अन्नधान्याचा साठा व काळाबाजार रोखण्यासाठी दक्षता पथके कार्यरत.
- कोरोना प्रादुर्भाव काळात जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा सुरळीत राहण्यासाठी वस्तूंचा पुरवठा करणाऱ्या वाहनांना लॉकडाऊनमधून सूट.

# प्रशासन

## महसूल



- मुद्रांक शुल्काचा दर मुंबई आणि मुंबई उपनगर जिल्ह्यात ५ टक्केऐवजी २ टक्के आणि उर्वरित महाराष्ट्र राज्यात ५ आणि ४ टक्केऐवजी ३ आणि २ टक्के.
- स्थानिक स्वराज्य संस्था करामध्ये देखील १०० टक्के सवलत दिल्याने सर्वसामान्य, शेतकरी वर्ग यांच्यासह घर आणि स्थावर मालमत्ता खरेदी करणाऱ्यांना दिलासा.
- मागच्या वर्षाच्या तुलनेत सप्टेंबर ते नोव्हेंबर या तीन महिन्यांच्या कालावधीत राज्यातील दस्त नोंदणीत लक्षणीय अशी ३९ टक्क्यांनी वाढ.
- तलाठ्याच्या डिजिटल स्वाक्षरीने सुमारे २९ लाख खातेदारांनी घेतला सातबारा; तर सुमारे ३ लाख खातेदारांनी डाऊनलोड केले (८-अ) खाते उतारे.
- आठ दशकानंतर सातबारामध्ये होणार १२ प्रकारचे बदल. वॉटर मार्क, युनिक कोड आदी या बदलांमुळे बनावट सातबारा करण्याच्या गैरप्रकाराला आळा.
- महसूल चोरीला आळा घालण्यासाठी राज्य सरकारशी संबंधित आर्थिक व्यवहारांसाठी यापुढे पॅन क्रमांक अनिवार्य.
- आजी / माजी सैनिकांना शासकीय जमीन प्रदान करण्यासंदर्भात उत्पन्नाची वार्षिक मर्यादा १ लाख रुपयांवरून ८ लाख करण्यासाठी कायद्यात दुरुस्ती.

## वित्त

- सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम / स्वायत्त संस्था यामध्ये स्वत:ला सामावून घेतल्यानंतर एकरकमी ठोक रक्कम स्वीकारलेल्या शासकीय कर्मचाऱ्यांचे उर्वरित २/३ निवृत्तिवेतन पुन:स्थापित करणे व त्यांचे निवृत्तिवेतन सातव्या वेतन आयोगानुसार सुधारित करण्याबाबतचा निर्णय घेण्यात आला आहे.
- कोविड-१९ च्या पार्श्वभूमीवर तात्पुरते निवृत्तिवेतन / कुटुंब निवृत्तिवेतन मंजूर करण्याचे अधिकार विभाग प्रमुखास एक विशेष बाब म्हणून प्रत्यार्पित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.
- कोविड-१९ संबंधित कर्तव्य बजावताना कोविडमुळे मृत्यु होणाऱ्या कर्मचाऱ्यांना रुपये ५० लाख विमा कवच / सानुग्रह साहाय्य लागू करण्यात आले आहे. तसेच यास ३१ डिसेंबर २०२० पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.



- केंद्र शासनाच्या धर्तीवर राज्यात कोरोना साथीच्या प्रादुर्भावामुळे राज्यातील शासनाची कामे करणाऱ्या कंत्राटदारांना चालू कंत्राटाबाबत सोसाव्या लागत असलेल्या अडचणींसंदर्भात उपाययोजना व साहाय्य याबाबत सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. तसेच पूरकपत्रही निर्गमित करण्यात आले आहे.
- १५ जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका आणि प्रादेशिक ग्रामीण बँक यांना शासकीय बँकिंग व्यवहारास मान्यता.
- नाशिक-पुणे रेल्वे मार्गाच्या कामाला महाराष्ट्र रेल्वे पायाभूत विकास कंपनीमार्फत गती देण्याचा निर्णय.
- महाराष्ट्र वस्तू व सेवा कर अधिनियमात सुधारणा-मत्स्य आहार, बिगर शेती अवजारांना करांमध्ये सूट देण्याचा निर्णय.
- एशियन डेव्हलपमेंट बँकेच्या सहकार्याने शिक्षण व आरोग्य क्षेत्राचे बळकटीकरण.

# नियोजन

- राज्याच्या वार्षिक योजनेंतर्गत पहिल्यांदाच १ लाख कोटी रुपयांपेक्षा अधिक निधीची तरतूद.


## आमदार स्थानिक विकास कार्यक्रम

- आमदार स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत उपलब्ध होणाऱ्या निधीतून लोकप्रतिनिधींना स्थानिक गरजा विचारात घेऊन लोकोपयोगी कामे करता यावीत म्हणून २०२०-२१ या आर्थिक वर्षापासून २ कोटी रुपयांच्या निधीत वाढ करून ३ कोटी रुपये करण्याचा निर्णय.
- आमदार स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत आता दरवर्षी ११०० कोटी रुपये एवढ्या रकमेची लोकोपयोगी कामे करता येणार.

### कोविड काळात दिलासा

- जिल्हा वार्षिक योजना, आमदार स्थानिक विकास कार्यक्रम, डोंगरी विकास कार्यक्रम इ. कामांना प्रशासकीय मान्यता देऊन निधी वितरण, कामांच्या प्रगतीचा आढावा घेणे तसेच संनियंत्रण करणे याकरिता Integrated Planning Office Automation System - iPAS ही कागदविरहित (Paperless) संगणकीय प्रणाली राज्यात २०२०–२१ पासून लागू.

### महाबळेश्वर– पाचगणी विकास आराखडा



- राज्यातील महाबळेश्वर – पाचगणी येथे मोठ्या संख्येने पर्यटक येत असल्यामुळे महाबळेश्वर– पाचगणी परिसराचा नियोजनबद्ध विकास करण्यासाठी १०० कोटी रुपयांचा विकास आराखडा.

## राज्य उत्पादन शुल्क



- कोणत्याही परिस्थितीत राज्यातील गड किल्ल्यांचे पावित्र्य मद्यपींकडून भंग होणार नाही, यासाठी दारुबंदी कायद्याखाली कडक कारवाई करण्याचे आदेश.
- साखर/साखरेचा पाक/ऊसाचा रस/बी–हेवी/सी–हेवी मळीपासून जलरहित मद्यार्काचे उत्पादन घेण्यास परवानगी देण्यासाठी सुधारित धोरण निश्चित केल्याने निर्मिती, विक्री यामध्ये अधिक सुलभता.
- नोंदणी शुल्क तरतुदीऐवजी परदेशातून आयात होणाऱ्या मद्यावर वाहतूक शुल्क वाढवण्याच्या निर्णयामुळे राज्याचा महसूल वाढण्यास मदत.
- मद्यनिर्मिती व मद्याची घाऊक विक्रेते व किरकोळ विक्रेते यांच्याकडे होणारा प्रवास राज्य उत्पादन शुल्क विभागाने विकसित केलेल्या सप्लाय चेन प्रणालीद्वारे नियंत्रित केल्याने अवैध विक्रीला आळा.
- अवैध मद्यनिर्मिती वाहतूक, विक्रीविरुद्ध नागरिकांना तक्रार करता यावी, यासाठी नियंत्रण कक्ष.

# संसदीय कार्य

- कोरोनाच्या पार्श्वभूमीवर राज्याची आर्थिक परिस्थिती लक्षात घेता राज्यातील सर्व विधिमंडळ सदस्य, लोकप्रतिनिधींच्या वेतनात एप्रिल २०२० पासून एप्रिल २०२१ पर्यंत ३० टक्के कपात करण्याचा निर्णय.

# सामान्य प्रशासन

- सर्वसामान्य जनता त्यांचे दैनंदिन प्रश्न, शासन स्तरावर असुलेली कामे, या संदर्भात त्यांचे अर्ज/निवेदने घेऊन मुख्यमंत्री सचिवालय, मंत्रालय मुंबई येत होती. तथापि, सर्वसामान्य जनतेला निवेदने देण्यासाठी मुंबईत येण्याची गरज पडू नये, तसेच ही प्रक्रिया अधिक लोकाभिमुख, पारदर्शक व गतिमान व्हावी, या हेतूने कोकण, अमरावती, पुणे, नाशिक, औरंगाबाद व नागपूर या सहा विभागीय आयुक्त कार्यालयांमध्ये मुख्यमंत्री सचिवालय कक्ष सुरू. या ६ कक्षांकडून ऑक्टोबर, २०२० पर्यंत एकूण ५२२१ अर्ज/निवेदनांवर कार्यवाही.
- महिलांचे प्रश्न व समस्या सोडवण्यासाठी तसेच त्यांच्यासाठीच्या योजनांना गती देणे आणि सध्याच्या योजनांतील अडचणी दूर करणे, नवीन योजना आखणे यासाठी मुख्यमंत्री कार्यालयात विशेष कक्ष स्थापन करण्याचा निर्णय.
- माजी सैनिक, विधवांकरिता घरपट्टी, मालमत्ता कर माफीसाठी 'बाळासाहेब ठाकरे माजी सैनिक सन्मान योजना'.
- छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी), पुणे यांना भरीव निधी व मनुष्यबळ. १३० कोटी रुपये निधीची तरतूद.
- अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाच्या बेरोजगार तरुणांसाठीच्या व्यावसायिक कर्ज योजनेसाठी भागभांडवल ४०० कोटी रुपयांची वाढ.
- मराठा क्रांती मोर्चामधील आंदोलकांवरील दाखल करण्यात आलेले गुन्हे मागे घेण्याबाबतची कार्यवाही सुरू.
- महाराष्ट्र – कर्नाटक सीमाप्रश्नी दोन कॅबिनेट मंत्र्यांची सीमाभाग समन्वयक मंत्री म्हणून नेमणूक.

- औरंगाबाद विमानतळाचे ‘छत्रपती संभाजी महाराज विमानतळ, औरंगाबाद’ असे नामकरण करण्याबाबत केंद्र शासनाकडे शिफारस.
- विभागीय स्तरावर मुख्यमंत्री सचिवालय कक्षांची स्थापना.
- उच्च व तंत्रशिक्षण विभागामार्फत डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह योजनेंतर्गत शासकीय व इतर इमारती आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांकरिता वसतिगृह चालवण्यासाठी नोंदणीकृत संस्थांना देण्याची योजना अधिक गतिमान करण्यात येईल.




- राज्यातील शासकीय कार्यालयांसाठी पाच दिवसांचा आठवडा लागू.

# माहिती तंत्रज्ञान

## कर्जमुक्ती योजना

- ‘महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना २०१९’च्या अंमलबजावणीसाठी ऑनलाइन पोर्टलचा विकास. विनासायास कर्जमुक्ती योजनेची अंमलबजावणी.
- या पोर्टलचा वापर करून बँकांमार्फत ३४ लाखांहून अधिक कर्ज खात्यांच्या रेकॉर्ड/नोंदी अपलोड; ३१ लाखाहून अधिक कर्ज नोंदीवर प्रक्रिया पूर्ण.
- आतापर्यंत ३० लाखांहून अधिक शेतकऱ्यांकडून आधार प्रमाणीकरण पूर्ण; नोडल बँकेद्वारे ३० लाखाहून अधिक कर्ज खात्यात १९ हजार ४७४ कोटी रकमेचे वितरण.
- योजना व निर्णयांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी ‘सीएम डॅशबोर्ड’ ही प्रणाली राज्यात कार्यान्वित. यामध्ये २० विभागांच्या ३७ योजना समाविष्ठ. यामुळे विभागांच्या विविध स्रोतांतून माहिती मिळवणे, तपशील घेणे सोयीचे.
- शहरी महानेट प्रकल्पांतर्गत शहरी भागातील शासकीय, निमशासकीय, सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम अशा २५ हजार शहरी कार्यालयांना पुढील एक वर्षात जोडणार.
- कुशल, अर्धकुशल आणि अकुशल कामगारांची औद्योगिक मागणी पूर्ण करण्यासाठी महाआयटीकडून उद्योग, कामगार व कौशल्य विकास विभागासाठी महाजॉब्स पोर्टल आणि मोबाइल ॲप विकसित.

- ग्रामपंचायती उच्च क्षमतेच्या फायबर नेटवर्कने जोडण्याच्या ग्रामीण महानेटच्या दुसऱ्या टप्प्याची अंमलबजावणी सुरू. त्यात १२ हजार ७४० ग्रामपंचायती जोडल्या जाणार. यामुळे ग्रामीण भाग इंटरनेटच्या माध्यमातून जगाशी जोडला जाईल. नवी मुंबई येथे यासाठी नेटवर्क ऑपरेटिंग सेंटर उभारणी.
- २३ व्या राष्ट्रीय ई – गव्हर्नन्स परिषदेचे ७ आणि ८ फेब्रुवारी २०२० रोजी मुंबईत आयोजन. या परिषदेमध्ये सर्व राज्ये, या क्षेत्रातील संस्था यांच्या ई– गव्हर्नन्स उपक्रमांचे सादरीकरण.
- महाराष्ट्र सिक्युरिटी ऑपरेशन सेंटर आणि सी.ई.आर.टी. या सेंटरमुळे सायबर सुरक्षिततेच्या अनुषंगाने ३०० हून अधिक संकेतस्थळे व ॲप्लिकेशनवर नजर ठेवण्याची प्रणाली विकसित.
- सायबर हल्ले व इतर घटना यामुळे उदभवणाऱ्या जोखमीवर लक्ष वेधण्यासाठी, शासनाच्या महत्त्वपूर्ण माहितीच्या सुरक्षिततेसाठी महाराष्ट्र संगणक आपत्कालीन प्रतिसाद पथक स्थापन करण्याचा निर्णय.



- शेवटच्या लाभार्थीपर्यंत थेट लाभ वितरणासाठी डी.बी.टी. पोर्टल महाआयटीकडून विकसित; १० विभागांच्या ४५ पोस्ट मॅट्रिक लाभ योजना सक्रिय; ७३०० कोटीपेक्षा जास्त रुपये. थेट ३१ लाख लाभार्थींना वितरित. आता कृषी विभागाच्या १३ योजना थेटपणे पोर्टलवर उपलब्ध. त्यासाठी आतापर्यंत ५ लाखांपेक्षा जास्त शेतकऱ्यांनी ऑनलाइन अर्ज भरले आहेत.

## कोविड काळात दिलासा

- कोरोना प्रादुर्भावामुळे महा ई–ऑफीस प्रणाली टप्प्याटप्प्यात सुरू. यामुळे शासकीय नस्त्या, पत्रे, व इतर दस्तऐवज यांच्या सुरक्षिततेत वाढ. कामकाज गतिमान होण्यास मदत. आतापर्यंत १२ मंत्रालयीन विभागांकडून ही प्रणाली वापरण्यास सुरुवात.



# संत गाडगेबाबांची दशसूत्री

भुकेलेल्यांना • अन्न
तहानलेल्यांना • पाणी
उघड्यानागड्यांना • वस्त्र
गरीब मुलामुलींना • शिक्षणासाठी मदत
बेघरांना • निवारा, आश्रय
अंध, पंगू, रोग्यांना • औषधोपचार
बेकारांना • रोजगार
पशुपक्षी, मुक्या प्राण्यांना • अभय
गरीब तरुणतरुणींचे • लग्न
दु:खी व निराशांना • हिंमत

"गाडगेबाबांच्या या शिकवणीनुसार आमचे शासन काम करणार आहे."

उद्धव ठाकरे, मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य


प्रकाशक – माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन





www.mahasamvad.in | Follow : /MahaDGIPR | Subscribe : MaharashtraDGIPR